॥ ॐ ऱ्हीं श्रीं बाळकृष्णाय नमो नमः ॥



# श्री परमहंस बाळकृष्ण महाराज चरित्र

॥ ॐ – भवबंद विमोचनाय ॥

श्री परमहंस बाळकृष्ण महाराज, संभाजीनगर (औरंगाबाद)

**।।श्री।।**

## अध्याय १ ला

श्री गणेशाय नमः । श्री सरस्वत्यै नमः । श्रीगुरूभ्यो नमः । श्री गोपाल कृष्णाय नमः । जयजयाजी पुराणपुरूषा । ब्रह्मांडनायका विश्वेशा । पुंडलीक वरदा पंढरीशा । ब्रह्मानंदा जगद्गुरो ।।१।। त्रिलोकी पाहता तुज वाचून । नसे की दुसरे अधिष्ठान । ऐसा तू एक जगजीवन । सर्वत्र भरलासी ।।२।। तूचि शेषशायी नारायण । क्षीरसागरीचे निधान । नारदादि सर्व ऋषिगण । स्तवन तुझेचि करिताती ।।३।। तूं दीनदयाळ आनंदकंदा । कृपे पुरविशी भक्तछंदा । भक्त संकटी उडी गोविंदा । घालुनी रक्षिसी निजांगे ।।४।। धर्म जाता लयासी । दुर्जनें पीडिता संतासी । अवतार घेऊनी ऋषीकेशी । निर्दाळिशी निजांगे ।।५।। मत्स्य कच्छादि अवतारी । नाना रूपें धरूनी मुरारी । असुरांचा तो संहार या परी । केलासी भक्तांकारणे ।।६।। यापरी करूनी अकर्ता म्हणविसी । सगुण की निर्गुण हे नकळे कवणासी । तवगुण महिमा ऋषीकेशी । व्यासादिकांही कळेना ।।७।। वर्णिता शेषही भागला । परि न त्यासी अंत कळला । शेवटी तल्पक होऊनी राहिला । पायातळी तुझ्याची ।।८।। जो जैशारीती तुज ये शरण । घडे तया तैसेचि तुझे दर्शन । जो तो या रीती समाधान । करूनी घेई आपुले ।।९।। योगियां योगेंचि साधिला । संती भक्तिमार्गे आकळिला । भोळे भाविक ते भजनीं देखिला । ऐसेची स्वानंदे बोलती ।।१०।। परी उपाधीरहित जहालीयाविण । न घडे कल्पांती दर्शन । जेवि न जायची अंध:कार पूर्ण । दीपावेगळा

सर्वथा ।।११।। तयाचे हे दर्शन कैशारीती । यासी उपमा देईन निश्चिती । जेवी काष्टाचा तो ऐरावती । आणुनी उभा केलासे ।।१२।। मग बोलाऊनी जन्मांधमेळा । दाविती तो ऐरावती सकळां । जयानें ज्याठायी स्पर्श केला । वाटे ऐरावत तोचि त्या ।।१३।। जयानें स्पर्शिले शुंडेप्रती । त्यांसी वाटला तोची ऐरावती । पुच्छ जयाचे आले हाती । तो म्हणे ऐरावती हाचि हा ।।१४।। असो यापरी जयानें जो भाग स्पर्शिला । त्यांसी वाटे हाची ऐरावत देखिला । अज्ञानेची म्हणती आम्ही पाहीला । ऐरावत सत्यची ।।१५।। अंधत्व गेलियाविण । ऐरावत न जाणवेचि पूर्ण । सत्य स्वरूपाचे आम्हां दर्शन । याच रीतीं गोविंदा ।।१६।। तव माया ही अति अति अनिवार । सुचोनेदी काही विचार । ब्रम्हादि काळी न कळे पार । महिमा इयेचा अदभुत ।।१७।। मायेनेची ब्रम्हांड सकळ । निर्मिता जहालाशी तू गोंपाळ । हिच्या योगें तू तमालनील । ब्रम्हा विष्णू म्हणविशी ।।१८।। सकळ दैवताचा होशील निर्माता । हिचेनि योगे तू पंढरीनाथा । यालागी कार्यारंभी ठेविला माथां । चरणयुगुली तुझियां ।।१९।। तुझ्याची स्वरूपा आठवून । आता वंदिन गजवदन । जो विघ्नहर्ता पार्वती नंदन । स्वामी सकळ विद्येचा ।।२०।। कार्यारंभी वरदायक । तू अससी विनायक । यालागी सुरासुर सकळिक । तुझेचि चिंतन करिताती ।।२१।। कुयोग जितुके असती । तुझ्या चिंतेने मंगळ होती । म्हणूनिया हे मंगळमूर्ती । नाम विराजे तुझेची ।।२२।। अंतरी इच्छा धरूनी जाण । गजवदना तुज मी आलो शरण । बुद्धिहीना जाणूनी आपण । बुद्धिदाता होई तूं ।।२३।। मी तो असे बुद्धिहीन । नाही भक्ती ना

ते ज्ञान । परी संतकथा लिहावी जाण । अंतरी इच्छा असे कीं ।।२४।। निर्विघ्नपणे कामना पूर्ण । व्हावयां देई आशिर्वचन । सत्भावें येवढेचि प्रार्थून । चरणीं माथा ठेविला ।।२५।। आता वंदु ब्रम्हनंदिनी । जे कां सकळ विद्येची स्वामिनी । पूर्ण अवतार नारायणी । आदि माया सरस्वती ।।२६।। माये तव कृपा व्हावी म्हणून । व्यास वाल्मीकादि करून । तैसेची सुरासुर ऋषिगण । नित्यप्रार्थिती तुजलागीं ।।२७।। तू कृपेची केवळ सरिता । ओसंडे येऊनी माझिये माथां । तव कृपा जहालिया तत्वतां । होईन कृतार्थ निश्चयें ।।२८।। माते तव कृपा होताची जाण । मग निश्चये करीन ग्रंथ लेखन । परी पाहिजे ते अधिष्ठान । अंतरी तुझेची सर्वथा ।।२९।। तरी तूं जिव्हाग्री राहून । बोलवी आता निरूपण । जेकां बोल बोलशी जाण । लिहीन तेची निश्चयें ।।३०।। ऐसी प्रार्थुनी आदिमाता । आता वंदिन कुलदैवता । नृसिंह अवतार प्रसिद्ध चवथा । निजभक्ता कारणें ।।३१।। सत्य करावया भक्तवचन । बाहेर आलासि स्तंभातून । निज भक्त रक्षियला पूर्ण । नाना संकटी निजांगे ।।३२।। ऐसा तूं भक्त सखा निर्धारी । दैत्यांतकानरहरी । मस्तक ठेविलें चरणावरी । कृपादृष्टी रक्षी कां ।।३३।। चराचर वस्तु समस्त । एक भरलासे पंढरिनाथ । ज्ञानदृष्टी पाहतां निश्चिंत । अन् दुसरे नसेची ।।३४।। ऐसा आठव होतां चित्तीं । तो प्रत्यक्ष देखिला सद्गुरू मूर्ती । दृष्टी देखता अतिप्रीती । पायी मिठी घातली ।।३५।। काकासाहेब सद्गुरूनाथ । परंपरा यांची जी म्हणवित । त्यामाजीं श्रीगुरूरंगनाथ । स्वामी माझा असे कीं ।।३६।। मूळपुरूषा पासूनी समस्तां । दंडवत घालीन आता । की जो पदार्थ दृष्टी देखतां ।

तुजवीण अन्य नसेची ।।३७।। असो ज्याचे उदरी पावलो जनन । आणिक ही सृष्टी देखिली जाण । तैसाची हा आजि सुदिन । ज्याचेनी हा देखीला ।।३८।। तो ऋग्वेदी द्विजकुल भूषण । पिता माझा लक्ष्मण । माता सुंदराबाई जाण । प्रेमे वंदिली उभयतां ।।३९।। व्यास वाल्मिक आदीकरूनी । वसिष्ठ आणि नारदमुनी । जे कां श्रेष्ठ कवी या त्रिभुवनीं । महिमा अपार जयांचा ।।४०।। आणिक तैसे सकळ संत । ज्याही ओळखिला भगवंत । ओळखून साठवला ह्रदयात । भावबळें आपुल्या ।।४१।। त्या सकळांचे चरणीं माथा । ठेऊनी होईन त्या प्रार्थितां । कार्यसिद्धी ती तत्वता । व्हावी व्हावी म्हणवूनी ।।४२।। असो सकळाशीं तूं अधिष्ठान । एक अससी कीं रूक्मिणीरमण । यालागीं ते श्रोतयां नमून । सावधान म्हणे परियेसा ।।४३।। मज पाहूनिया मंदमती । तुम्ही उदास न व्हावे चित्तीं । वदविता असे तो रूक्मिणीपती । निश्चय मानसी असो द्या ।।४४।। पूर्वी माझिया निमित्येची जाण । नवरत्नाचे करूनी लेखन । तुम्हां श्रोतयां अमृतपान । तेणेचि करविलें निजांगे ।।४५।। ऐसा विश्वास मानसीं ठेऊन । तुम्हांस केले मी पाचारण । होऊनिया आता सावधान । श्रवणालागीं बैसावे ।।४६।। दक्षिण देशी ते प्रसिद्ध जाण । खडकी नामें अति प्राचीन ।। जिल्ह्याचें मुख्य ठिकाण । जाणती लोक सर्वही ।।४७।। काळपरत्वेची ते नामाभिधान । औरंगाबाद ऐसे म्हणजी जन । याच प्रांती बाबरे म्हणून । ग्राम एक असे कीं ।।४८।। यजुर्वेदी द्विज सात्विक । नाटूभट्ट या नामे वैदिक । भारद्वाज गोत्रीचा कुलदीपक । वास्तव्य करी येथेची ।।४९।। आवडी बहु धर्मावरी । विहितधर्मे कर्म करी । सत्यासत्य तो

विवेक अंतरीं । ठेऊनी काळ क्रमी जो ।।५०।। जयाचे उपास्य दैवत । गजवदन जो का गौरीसुत । कार्यारंभी जया सतत । सुरासुर प्रार्थिती ।।५१।। त्या मंगळमूर्तीचे पूजन । आदरेची करी रात्रंदिन । नाटु भट्टजीचे भावपूर्ण । कुळदैवत म्हणवूनी ।।५२।। भट्टजीचे नित्यकर्म जाण । स्नान संध्यादि देवतार्चन । यथाशक्ती षट्कर्म पूर्ण । आचरी अती प्रीतीने ।।५३।। वडिलोपार्जितची तया प्रती । जोपासणाची ती असे वृत्ती । यालागी सकळ जन प्रीतीं । भट्टजी ऐसेचि बोलती ।।५४।। जयांची जी कां असे वृत्ती । तैशारीती ते ती नामें पावती । जनाचार हा असे निश्चिती । विदित असे कीं श्रोतयां ।।५५।। असो उपजीविकेचे साधन । याहूनी आन नसेची जाण । यालागी वैदिक विषयी अध्ययन । केले असे साक्षेपे ।।५६।। भोळा भाविक हा ब्राम्हण । सकळासि आवडे प्राणाहून । साह्य करिती आपण होऊन । प्रपंच तो चाले या रीतीं ।।५७।। प्रसंगी तयाची कांता । ललिताबाईनामें पतिव्रता । गृहकाजीं ती ठेऊनी दक्षता । उणें भासू नेदीच ।।५८।। आणिक ती पतिसेवातत्पर । ललिताबाई असे की निरंतर । पतिसेवेविण । अन्य विचार । नाहीच मनीं सर्वदा ।।५९।। भट्टजीचे ते सुकृत म्हणूनी । ऐशी लाधली ती कामिनी । एका विचारेची निशिदिनीं । प्रपंची वर्तती उभयंता ।।६०।। पतिपत्नीचे एकचित्त । ज्या गृहीं असेल निश्चित । तेथें तो रूक्मिणीकांत । उणे पडो नेदीच ।।६१।। गृहस्थाश्रमीचे मर्म जाणून । उभयंता वर्तती रात्रंदिन । ललिताबाई सावधपूर्ण । राखी मन भट्टजीचें ।।६२।। सत्य पाहता स्त्रियांप्रती । दैवत असे आपुला पती । त्याविण तया सद्गती । कल्पांतीही मिळेना ।।६३।। हे तत्व ठेऊनी

मानसीं । ज्या स्त्रिया वर्तती अहर्निशी । त्याहीं बांधिला हृशीकेशी । शक्तिबळेची आपुल्या ।।६४।। असो ललिताबाई सावधान । अंतरी असे की रात्रंदिन । एक पतीआज्ञा ती प्रमाण । अन्यसाधना ती नेणेची ।।६५।। आधी पतीआज्ञा ती पाळून । मग ती आचरी व्रतादी पूर्ण । तैसेची पतिव्रताधर्म लक्षून । वागे निरंतर संसारी ।।६६।। इकडे भट्टजीचे ते पाहतां ज्ञान । वृत्तीनुसार जहालेसे अध्ययन । ऐसे असूनी त्या सकळजन । मान देती तेथीचे ।।६७।। म्हणती अल्पसंतोषी हा ब्राम्हण । व्यवहारी वर्ते सम समान । कार्य करितां हा थोर कीं सान । नेणेची जो सर्वथा ।।६८।। ऐसा हा भोळा द्विजवर । ललिताबाईस वाटे की ईश्वर । स्वानंदेची पतिसेवातत्पर । निरंतर असे जी ।।६९।। साध्वीची देखूनिया ऐसीवृत्ती । सकळ स्त्रिया त्या धन्यवाद देती । कितीएक त्या साक्षेपें भेटती । येऊनिया सदनी तियेच्या ।।७०।। नित्य ज्या स्त्रियां ऐशारीती । भेटावया त्या तिजलागी येती । तितुक्याहि सन्मानुनी प्रीतीं । क्षेम कुशलादि पुसताती ।।७१।। आणिक त्या गोड बोलें बोलून । सन्मार्गाची दावी सकळांलागून । म्हणे हा संसार आहे कठीण । सावधान येथे असा कीं ।।७२।। आम्हां स्त्रियासि येथे निश्चिती । दैवत असेकी तो आमूचा पती । त्याविण ती तुम्हां सग्दती । कल्पांतीही मिळेना ।।७३।। संसार म्हणजे दु:खसागर येथें न सांडावा विचार । विचारेची हा सुखसागर । होईल जाणा निश्चये ।।७४।। ललिताबाई ऐसे बोलतां । आनंद वाटे सकळांचे चित्तां । धन्य म्हणती ती पतिव्रता । धन्य संसार तियेचा ।।७५।। असो गृहस्थाश्रमीचे मर्म जाणून । भट्टीजी वर्तती रात्रंदिन । ललिताबाई अनुकूल पूर्ण

। प्रपंची तया ते सर्वदा ।।७६।। पुढे ललिताबाईपासून । तीन पुत्र आणि कन्या दोन । ऐशी ही अपत्ये पांच जण । सुलक्षणी ।।७७।। अनुक्रमेची त्या नामाभिधान । सदाशिव आणि बाळकृष्ण । रावजी नामे तैसाची जाण । सुपुत्र तिसरा असे की ।।७८।। पूढे पार्वती नामेकरून । मागुती ते सोनाबाई जाण । कन्या त्या जहाल्यास दोन । अनुक्रमेची त्यालागी ।।७९।। आपल्यामाजी तो बाळकृष्ण । सकळाशी आवडे प्राणाहुन । शांत मुद्रा ती सुहास्य वदन । देखुनी आनंद वाटे की ।।८०।। याच बाळकृष्णाचे वर्णन । तुम्ही ऐकावे आता येथून । यापरी श्रोतयालागी प्रार्थून । प्रथमाध्याय संपविला ।।८१।। पुढील अध्यायी जन्म कथन । बाळलीला त्या कराव्या श्रवण । माझ्या निमित्येची तो नारायण । सांगेन तुम्हासी परियेसा ।।८२।। इति श्री बाळकृष्ण कथामृतसार । वदतां वदवितां तो रूक्मिणीवर । वासुदेव तो तयाचा किंकर । दासानुदास तुमचा ।।८३।।

**इ. श्री. बा. कथामृत प्रथमोध्यायः ।**

**श्रीकृष्णार्पणमस्तु । हरयेनमः ।**

## ।। श्री ।।

# अध्याय २ रा

श्री गणेशाय नमः । जयजयाजी मधुसूदना । विश्वपालका मनमोहना । राजीव नयना देवकी नंदना । यदुकुलभूषणा यदुपते ।।१।। तू असूनिया निराकार । बळेची तुज म्हणती साकर । निरूप असतां तू जगदीश्वर । स्वरूप तुझे वर्णिती ।।२।। परी यासी कारण माया केवळ । इचेनी भुलले ब्रम्हांड सकळ । सत्य स्वरूप तूं असतां गोपाळ । कांहीकेल्या नुमजेची ।।३।। जगन्नायका जगदीश्वरा । हा तो सर्व मायेचा पसारा । ऐसे असूनिया सर्वेश्वरा । कर्ता हर्ता तुज म्हणताती ।।४।। आकारासी ते साकार । किं निर्गुणासी गुणसागर । निर्विकाराशी ते विकार । इचेनियोगें तुजलागी ।।५।। ब्रम्हा विष्णु महेश । होऊनी तूं जगदीश । उत्पत्ति स्थिति आणि लयास । कारण इचेनी तूं गोविंदा ।।६।। ऐशी हे माया दुस्तर । सुचोनेदी सत्यविचार । विचार नाही तो दुःख अपार । इचेनि योगें सर्वदा ।।७।। तू विवेकभानू माझिया अंतरी । प्रगटूनि घाली हे माया दूरी । जेणे सत्यासत्य विवेक निर्धारी । कळो लागे सहजची ।।८।। सत्‌चिदानंद तू जगत्‌जीवन । नामरूपादि ते माया जाण । सत्य असत्याशीं अधिष्ठान । तूचि असस़ी जगदात्मा ।।९।। तुजविण सर्वथा काहीं । कोणीही न करू शके कांही । यालागी ते पुढे लवलाही । चरित्र बोलवी दयाळा ।।१०।। जरी माझियां शब्दें मी बोलतां । तरी वीट वाटेल श्रोतयांचे चित्ता । तरी येऊनिया जगन्नाथा । पाठी राखावी येथुनी ।।११।। जरी मृंदगातुनि निघे ध्वनी । परी त्या

वाजवितां पाहिजे कोणी । तैसाचि तू आतां चक्रपाणी । अंतरी असाव माझिया ।।१२।। असो तूम्ही सकळ श्रोतेजन । आता व्हावेजी सावधान । करावे ते कथामृतपान । बोलवितां श्रीहरी म्हणवोनी ।।१३।। गताध्यायीचे कथन । भट्टजीचे जे का पुत्रसंताना । सांगितली तयांची नामाभिधाने । अनुक्रमेची सर्वही ।।१४।। संतानामाजी तो द्वितीयसुत । बाळकृष्ण नामें हा विख्यात । ज्याचे चरित्र हेची कथामृत । सांगेन तुम्हासी परियेसा ।।१५।। पती पत्नीचे एकचित्त । ज्या गृहीं असेल निश्चित । तेथें संत आणि भगवंत । वास करिती साक्षेपें ।।१६।। धन्य त्या नाटुभट्टजीचे सुकृत । उदरी आलासे महासंत । जो वैराग्यपुतळा अति विरक्त । चरित्रनायक येथीचा ।।१७।। शके सतराशे चवतीस । भाद्रपद शुद्ध अष्टमी दिवस । सतेज ऐशा ह्या सुपुत्रास । जन्म दिधला मातेनें ।।१८।। प्रसूत होताचि ते वेल्हाळा । आनंद जहालासे तो सकळां । किं एकदाची सुखसिंधु लोटला । प्रसूतिमात ऐकताची ।।१९।। वायुवेगेची सत्वर गती । वार्ता ही कळली समस्तांप्रती । येरयेरासी ते चला म्हणती । समाचार पाहू तेथीचा ।।२०।। आप्त इष्टादि सकळ जन । धाव घेती आपण होऊन । नाटूभटाशी ते भेटून । क्षेम कुशल पुसताती ।।२१।। जे का असती वैदिक ब्राम्हण । करिताती ते मंत्र पठण । जोतिषी ते पंचांगे काढून । जन्म नक्षत्रादि सांगती ।।२२।। ब्राम्हाणालागी ते यथाशक्ति । दक्षिणा ती सदभावे समर्पिती । तैसीच ती शर्करा वाटिती । वाद्य गजरेची समस्तां ।।२३।। इकडे ललिताबाई लागूनी । सकळ भेटताती नितंबिनी । बालक ते पाहावया नयनीं । धांव घेती एकदाची ।।२४।। आजानुबाहू सुहास्य वदन । बालक

ते दिसे दैदीप्यमान । सकळांचे ते मनीं समाधान । वाटे तयासी देखतां ।।२५।। असो जनाचार जो का ज्या रीती । पुत्रोत्सव तो केलासे तैशारीती । दान धर्मादी ते यथाशक्ती । केलासे तो सहजची ।।२६।। पाहूनिया पुत्राचे वदन । आनंदें ते मातेचे मन । तैसाचि तो पिता ये धाऊन । पुत्र वदन पहावया ।।२७।। निज पुत्रातें विलोकिता । आनंद वाटे उभयांचे चित्ता । संगोपनी ही ती माता पिता । दक्ष असती सर्वदा ।।२८।। असो समयोचित पाहून सुदिन । बाळाचे ते ठेविले नामाभिमान । तेव्हापासूनि ते सकळ जन । बाळकृष्ण म्हणताती ।।२९।। बाळाची ती शांतवृत्ती । देखुनिया त्या सकळ घेती । कोणीही त्या घेतल्या ऐशारीती । हास्य करी तो सर्वदा ।।३०।। ललिताबाई सुस्वभावी म्हणून । अनेक स्त्रिया त्या येती आपण होऊन । बाळकृष्णाची वृत्ती पाहून । उचलोनी घेती तयाते ।।३१।। कित्येक त्या बाळाशी सत्वरी । स्वानंदेची नेती निजमंदिरी । घालूनिया त्या पालखा माझारीं । खेळविती त्या प्रीतीनें ।।३२।। मागुती ते त्या आणून । ललिताबाईंचे करिते स्वाधीन । धन्य म्हणती हा बाळकृष्ण मनमोहन आमुचा ।।३३।। बाळाते रूदन करिता कोणीही । कधीही देखिले कीं ऐकिले नाहीं । मातेशीं तो विस्मय पाही । वाटे बाळासी देखतां ।।३४।। चार पांच मास ते ऐसे लोटतां । बाळ तो रांगु पाहे तत्वतां । देखुनिया ऐसी ही चपळता । आनंद वाटे सकळासी ।।३५।। बाळाची ती चंचलवृत्ती पाहून । माता पिता त्या जपती रात्रंदिन । ऐशा रीतीने संगोपन । निज पुत्राते करिताती ।।३६।। आठनऊ महिन्यांचे आंत । बाळ तो भिंतीस लाऊनी हात । हलकेंची तो पाऊल टाकित । आधार भिंतीचा तो घेउनी

।।३७।। यापरी तो कधी कधी चालतां । झोक जाऊनी पडे तत्वतां । परी तो तैसाची चपलत्वे मागुतां । उभा राहेची कौतुकें ।।३८।। जरी का पडता त्या देखिले कोणी । तरी ते तात्काळची येती धाऊनी । बाळकृष्णासी त्या पोटी धरूनी । कुरवाळिती प्रीतीने ।।३९।। लडिवाळपणें ते त्यासी बोलतां । गद्‌गदा हासेची तो त्या देखतां । विस्मय वाटे तो सकळांचे चित्ता । चंचल वृत्ती ते पाहुनी ।।४०।। ऐसा हा बाळकृष्ण । सकळाशी आवडे प्राणाहून । ओवाळू म्हणती त्याहून प्राण आमुचा सर्वदा ।।४१।। असो बाळकृष्णाचिये वयातें । वर्षही ते नाही जहाले पुरते । तोचि सुरस शब्द येती मुखातें । तुरळक ते बाळाच्या ।।४२।। प्रथमारंभीच ते मुखांतून । राम ही अक्षरे निघाली दोन । जी का वेदशास्त्रांचे बीज पूर्ण । सर्वज्ञची ते जाणती ।।४३।। पुढे पुढे राम शब्दाविण । कोणतेही न करी तो भाषण । बाबा म्हणतां रामबाबा म्हणून । हाक मारीत पितयाते ।।४४।। ऐशाच रीती मातेशी बोलतां । बाळकृष्ण म्हणतसे देवी माता । राम पिता नि देवी माता । बोलता तो ऐसे बोलेची ।।४५।। ऐकुनिया ते ऐशा रीती । आश्चर्य वाटे सकळांप्रती । बाळाशी ते शिकऊ म्हणती । परि तो नायकेची सर्वथा ।।४६।। नाना रीती सांगती समजाऊन । राम देवी ह्या शब्दाते सांडून । सरळ ऐसे ते करावे भाषण । जे का इच्छिती सर्वहि ।।४७।। कधिकधी तो पिता क्षोभून । निज पुत्रासी करीतसे ताडण । म्हणे कैचा नि कोणता उपाय या लागून । करावा तो कळेना ।।४८।। जयासि वाटे जैशा रीतीं । बाळकृष्णाते समजाविती । राम देवी ऐसे न वदावे म्हणती ।। विपरीत जे का वाटे समस्तां ।।४९।। ऐशापरि तो करिता यत्न ।

परी तो व्यर्थची जाहलासे शीण । पुढेही तो राम देव ह्या शब्दाविण । भाषण न करीच सर्वथा ।।५०।। मग येरयेरासी म्हणती सर्वही । बाळ तो नायके कोणाचे काही । किती एक म्हणती जाऊद्या व्यर्थ ही । खटपट आम्हासि कासया ।।५१।। अविद्यायोगें सकळजन । बाळाशीच ते देती दूषण । सत्यासत्य न कळेची त्यांलागून । प्रारब्धची म्हणती भटजीचे ।।५२।। आणिक जे कां असती सज्ञान । धन्य म्हणती भटजीचे प्राक्तन । पूर्व जन्मीचे सुकृत म्हणऊन । सुपुत्र उदरी आलासे ।।५३।। नाटूभट तो भोळा ब्राम्हण । आणिक कर्मामाजी गेलासे गढून । यालागी पुत्राचे ते वर्तन । विपरीत वाटे त्या सहजची ।।५४।। कर्मापासूनी ज्ञानप्राप्ती । कधीही न होय कल्पांती । वासिष्टीचे हे प्रमाण निश्चिती । शंका न घ्यावी मानसी ।।५५।। असो प्रसंगी तयाचे विवरण । येईल ते आपण होऊन । अज्ञानसागरीं जो कां गेला बुडोन । सत्य स्वरूप त्या कळेना ।।५६।। अविद्या योगेची सकळजन । नेणूनिया बाळकृष्णाचे महिमान । भट्टजीचे करूनिया समाधान । म्हणती अज्ञानची बाळ असे हा ।।५७।। पुढे तो ऐशापरी लोटता काळ । पांच वर्षाचा तो जहालासे बाळ । पिता तो म्हणे त्यासी शिकऊ सकळ । निजकर्म जे कां आपुले ।।५८।। मग विजयादशमी पाहुनी मुहूर्त । वक्रतुंडादिक ती ध्याने समस्त । शिकवितां तो त्या हर्ष बहुत । वाटे पितयाचे मानसी ।।५९।। आणिक तयासी ते एक । शिकविले ते अन्नपूर्णा अष्टक । अट्टाहासेची त्या तो बाळक । म्हणतसे की सर्वदा ।।६०।। श्रीहरीची ती ध्याने म्हणता । हर्ष वाटे बाळकृष्णाचे चित्ता । तैसाचि तो पिता पूजनी बैसतां । उल्हास वाटे मानसी ।।६१।।

नित्य पूजासमयीं तो बैसून । पितया जैसे ते करी अनुकरण । देव्हारा तो पृथकची मांडून । पूजन करी निजप्रीती ।।६२।। कोणतीही ती वस्तू घेऊन । देव्हारीं तो मांडी आणून । तयाचेची मग तो करूनिया पूजन । नमस्कारीत सत्भावें ।।६३।। प्रसंगी त्यांसी जेकां मिळे अन्न । तैसे तो त्या ताटीं घालून । साजुक अथवा शिळे नेणून । नैवेद्य दावित तयाचा ।।६४।। मागुती तो मातेसी हाका मारी । म्हणे ओ देवाते नमस्कार करी । नमस्कार करिताची निज अंतरी । सुख वाटे तयाच्या ।।६५।। तोचि न करितां नमस्कार । विव्हळ होतसे तयाचे अंतर । अंगची तो टाकूनि मग धरणीवर । रूदन करीत आक्रोशें ।।६६।। मग माता त्या समजाऊनी । नमस्कार करीतसे त्या देवालागुनी । ऐसे निज दृष्टी तो पहाताक्षणी । हास्य करीत स्वानंदे ।।६७।। कधी कोठे खेळतां कोणीही । बाळकृष्णाते देखील नाही । भजन पूजनादिक हे सर्वही । खेळ असती तयाचे ।।६८।। असा आठवे वर्ष वयासी लागतां । व्रतबंधन करूनिया मग तो पिता । वेदाध्यन करावयासि तत्वतां । गुरूगृहीं त्या पाठवी ।।६९।। याच गावीं दशग्रंथी ब्राम्हण । नारायणबुवा नामें अति विद्वान । बाळकृष्णाते तयाच्या स्वाधीन । करूनिया ठेविले तेथेची ।।७०।। नित्य गुरूसेवा परायण । राहूनी केलेसे वेदाध्ययन । गुरूजीचे ही ते असे मन । बाळकृष्णावरी सर्वदा ।।७१।। आधीच बाळकृष्ण तो बुद्धिमान । गुरू त्या भेटला प्रत्यक्ष नारायण । येथे वेदाध्ययन तें झालिया पूर्ण । नवल यात नसेची ।।७२।। बाळकृष्णाचिया समवयस्क । गुरूगृही ते विद्यार्थी अनेक । असती जे त्यामाजी विशेष देख । बाळकृष्णची वाटे समस्तां ।।७३।। बाळ मूर्तीचे या

तेज बहुत । विद यार्थियामाजी ते झळकत । कीं मूर्खांमाजी तो पंडित । झाकिता न झाकेची सर्वथा ।।७४।। ऐसा हा आमुचा बाळकृष्ण । गुरूजीस आवडे प्राणाहून । साक्षेपेची जप त्या करावया लागून । गायत्रीमंत्र शिकविला ।।७५।। रवि आराधना ती तैसीच जाण । शिकवोनी बाळा ते सांगितली खूण । म्हणे गायत्री जप आणि आराधना येथून । नित्य नेमेचि करावी ।।७६।। यापरी ऐकताचि गुरूचे वचन । बाळकृष्ण घाली त्या लोटांगण । म्हणे तुमची आज्ञा ही मज प्रमाण । नियमानें पाळीन येथूनी ।।७७।। परिसूनि बाळाचे नम्र वचन । तोषले गुरूचें ते अंत:करण । देऊनिया मग त्या आर्शिवचन । हृदयी धरिले त्या निजप्रीतीं ।।७८।। म्हणे धन्य तू बाळ आणि तुझी जननी । धन्य तो पिता नि धन्य वंश तुझेनी । उभयकुळासी ते उध्दरूनि । नेशील ऐसे वाटते ।।७९।। असो वेदाध्यनाते सारूनी । बाळकृष्ण तो परतलासे सदनीं । कथाभाग तो इतुका सांगुनी । द्वितीयाध्याय संपविला ।।८०।। पुढील अध्ययी कथा सुरस । किं अमृताहूनी गोड विशेष । वासुदेव तो प्रार्थी श्रोतयांस । म्हणे परिसा ते आवडी बैसुनी ।।८१।।

**इ. श्री. बा. क. सा. द्वितीयोध्याय: श्री कृष्णार्पणमस्तु ।।**

**हरये नम: ।।२।।**

॥ श्री ॥

## अध्याय ३ रा

श्रीगणेशाय नमः । जयजयाजी कमळलोचना । कमलासना । असुरांतका मुरमर्दना । देवकीनंदना कंसारे ॥१॥ सांडुनि आपुले श्रेष्ठपण । गवळ्याघरी राहिलासी येऊन । यालागी तुज नंदनंदन । सकळ जन म्हणताती ॥२॥ ब्रम्हादिक आणि ऋषिमुनी । नित्य प्रार्थिती तुजलागुनी । तो तू गोपवेष धरूनी । गोकुळीं नांदसी गोविंदा ॥३॥ सकळ ब्रम्हांडाचा तू निर्मिता । असूनिया ती तूज यशोदामाता । कडिये उचलोनिया घे तत्वता । सांभाळ करी प्रीतीने ॥४॥ तुझ्यास्मरणें भवबंधन । तुटोनि जाय न लागता क्षण । त्या तुज यशोदा नंद येऊन । बांधू म्हणती उखळाशी ॥५॥ नित्य तृप्त असता तू जगज्जीवन । माता ती शिदोरी देतसे तुज बांधून । ती तूं वनीं गोपासमवेत बैसून । स्वानंदेची भक्षिसी ॥६॥ अगम्य त्या तुझ्या लीला देखून । गोकुळीचे ते सकळजन । होऊनिया ते तुझेचि ध्यान । सदा सर्वकाळ करिताजी ॥७॥ जैशी कां असे ती जयाची दृष्टी । त्यां तू तैसाचि दिससी जगजेठी । नित्यचि रक्षिसी तया संकटी । उडी घालूनि रमेशा ॥८॥ युगायुगीं तू ऋषीकेशी । भक्तांकारणे अवतार घेसी । स्वधर्माचे ते रक्षण करिसी । संहारिसी त्या दुर्जनां ॥९॥ असो तव गुण वर्णु पाहतां । ब्रम्हादिकाही न कळेची सर्वथा । तेथे ही माझी बुद्धिमत्ता । चाले नवल नसेची ॥१०॥ परी सकळांचा तू बुद्धिदाता । एक अससीं की रूक्मिणीकांता । तवगुण तूची आता । वर्णवी दयाळा येथुनी ॥११॥ ज्या ग्रंथी

नाही तुझे वर्णन । व्यर्थची तो जहालासे शीण । लवणाविण ते जैसेका भोजन । सुग्रास असूनिया व्यर्थची ।।१२।। असो सर्वांतरी असता तूं जगज्जीवन । कोणाचे कोणी करावे वर्णन । दीन दयाळा कृपें येथून । कथामृत बोलवी ।।१३।। गताध्यायीं जहालेसे कथन । किं बाळकृष्णाचे ते वेदाध्यन । पूर्ण होताचि गुरूगृहाते । सांडून । गृहीं तो पातला ।।१४।। वैदिक कर्मांमाजी निपुण । बाळकृष्ण तो गृहीच राहून । स्नान संध्यादि देवतार्चन । नित्य करीतसे आपण होऊन । न सांगता ते सर्वही ।।१६।। त्याविण प्रपंची तो आणिक पाही । कोणतेही कार्य न करी काही । अशाश्वत जाणुनी सर्वही ।।१७।। बाल्यावस्थेपासून । स्वछंदी असे हा बाळकृष्ण । ह्या समयी तो उदास पूर्ण । प्रपंची वर्ते सर्वदा ।।१८।। कोठेही जाऊनिया बैसावे । मिळेल तेंची अन्न खावे । आसन वसनविण झोपावे । ऐसा नेम असे की बाळाचा ।।१९।। शीत उष्णादि हे किंचितही जाण । नेणेची ते बाळकृष्णाचे मन । जो देहभाव गेलासे विसरोन । विकार त्या कैसे भासती ।।२०।। असो द्वादश वर्षे ती वयाची लोटतां । विचार तो करिती माता पिता । सत्वरची तो करू म्हणती आता । विवाह बाळाचा येथुनी ।।२१।। तेजस्वी ही बाळमूर्ती जाण । सकळां ती आवडे प्राणाहून । विद्वता नी ती वृत्ती पाहुन । येर येरासी बोलती ।।२२।। एक म्हणे तो दुज्या लागून । माझी कन्या ती बाळास देईन । तों तिजा म्हणे ऐका वचन । अंतरी जे का असे माझियां ।।२३।। हुंड्यासहित बाळकृष्णासी । कन्या देईन निश्चयेसी । चला म्हणे जाऊ भटजीसी । कळऊ मात सर्वही ।।२४।। ज्या ज्या वाटे तो गृही जाऊन । यापरी भटजीस सांगे वर्तमान ।

म्हणती इच्छित आमुचे करावे पूर्ण । पदरी आपुल्या घेऊनी ।।२५।। ऐशिया वचनाते ऐकुनी । भटजीस तो आनंद वाटे मनीं । तो तात्काळची ललिताबाईस सांगुनी । समाधान व्यक्त करीतसे ।।२६।। असो जो जो यापरी येऊन । म्हणताचि करिती तयाचे समाधान । म्हणती ईश्वरी सुत्रे जे कां असेन । होईल तैसेचि निश्चयें ।।२७।। असो याचि काळावधीत । काशीनिवासी द्विज विख्यात । ज्योतिष्यरत्न महापंडित । बाबरे ग्रामीं तो आलासे ।।२८।। वार्ता ती ऐकुनी ऐशा रीती । सकळजन येऊनि तया भेटती । भविष्यवार्ता त्या साक्षेपें पुसती । आपल्या परीने ।।२९।। नाटूभट तो भोळा ब्राम्हण । ज्योतिष्यावरी तो ज्याचा विश्वास पूर्ण । अपत्याचा त्या पत्रिका घेऊन । निघे तयासि भेटाया ।।३०।। दृष्टी देखताची द्विजवर । नाटूभट त्या करी नमस्कार । क्षेम कुशलादि समाचार । येर येरा ते पुसती ।।३१।। मग सकळ पत्रिका काढून । द्विजकरीं त्या दिधल्या आपण होऊन । धन्य म्हणे हा असे की सुदिन । स्वामींच्या दर्शनें आजिचा ।।३२।। सर्वचि त्या पत्रिका पाहून । कथियले जैसे का जयाचें लक्षण । परि बाळकृष्णाची ती पत्रिका विलोकून । स्तब्धचि राहिला क्षणभरी ।।३३।। मागुती बोले भटजी लागून । ऐकावे हे द्वितीय पुत्राचे लक्षण । कुलउद्धारक हा बाळकृष्ण । होईल वंशी तुमच्या ।।३४।। पूर्वजन्मीचे होते सुकृत । म्हणूनी पोटा आलासे महासंत । कुलदीपक हा वंशी निश्चित । द्वितीय पुत्र तुमचा ।।३५।। परी ती अठरा पासून वर्षे वीस । वयाते जैं होती बाळकृष्णास । इतुकाची काळ हा अनिष्ट तयास । गृहमानेचि असे कीं ।।३६।। येवढे टळलियाते गंडांतर । मग तो लोटेल

सुखाचा सागर । अर्थ इतकाची तो साचार । पत्रिकेचा असे की ।।३७।। परिसताची ते ऐसे वचन । भटजीचें दचकले मन । अंत:करण ते गेलेसे गहिवरोन । शब्द न बोलवेचि बोलता ।।३८।। सत्वरची माघारा परतोन । घरा आलासे हा भोळा ब्राम्हण । स्वपत्नीशी तो समाचार पुर्ण । स्फुंदस्फुंदोनि कथियला ।।३९।। एकचि जहालासे हाहा:कार । कोणी न देती कोणास प्रत्युत्तर । सुकृतसिंधु तो आमुचा पार । सूकून गेलासे म्हणताती ।।४०।। नयनी अश्रुधारा । त्राही त्राही रे म्हणती गौरीकुमारा । आम्हासि तो तुजविण थारा । अन्य नसेची सर्वथा ।।४१।। अमुचे कुलदैत विघ्नहरण । तूचि अससी कीं गजानन । ऐसे असता ही विघ्ने धाऊन । न कळे कैसी ती येताती ।।४२।। की कामधेनु असे ती ज्याचे घरी । दारिद्य त्यावरी स्वारी करी । कि दंदशुंक धाऊनि सुपर्णावरी । भक्षू म्हणती देखतां ।।४४।। असो दु:खाचा तो येऊनि गिरि । कोसळू पाहे तो बाळावरी । तारी तू वज्र होऊनिया निर्धारी । धाव घेई आताची ।।४५।। तुजविण कवणाशी दातारा । शरण जावे ते लंबोदरा । रक्षूनिया बाळाते पार्वती कुमारा । ब्रीद आपुले कुलदैवता । प्रार्थिती पतिपत्नी उभयतां । तोचि कर्णोपकर्णी ही सकळवार्ता । गुरूगृहातें पातली ।।४७।। विद्यागुरू तो नारायण । बाळकृष्ण आवडे ज्या प्राणाहून । गडांतराची ती वार्ता परिसून । दु:खित जहालसे मानसीं ।।४८।। म्हणे काही तरी उपायानी । कार्य न घडेचि सर्वथा ।।४९।। तरी स्नानसंध्यादि आचरण । बाळासी आवडे मनापासून । यालागीं ते केले पाचारण । तात्काळची तो पिता आणि बाळकृष्ण । गुरूगृहा त्या पातले ।।५१।। देखताची भटजीशी क्षेमालिंगन ।

देताची उभयतांचे गहिवरले मन । अश्रु वाहती नयनांतून । शब्द न बोलवेची बोलतां ।।५२।। तोचि बाळकृष्ण आला धाऊन । गुरूचरणा घालितां लोटांगन । निजकरेचि मग त्या आपण । निजांगेचि उठवी ।।५३।। मग बाळाते ह्रदयीं धरून । सप्रेमें दिधले त्या आशिर्वचन । नारायणबुवा ते नेत्र संकेत करून । समाधान करिती भटजीचे ।।५४।। आणि तयासी एकांती नेऊन । समाचार तो कथियेला मनीचा पुर्ण । भटजींचे त्या मिळताची अनुमोदन । पाचारिले मग त्या बाळासी ।।५५।। शब्द गुरूचा पडताचि कानीं । बाळकृष्ण तो आलासे तेथें धाउनी । स्नेहेचि मग त्या कुरवाळोनी । मागुता ह्रदयी धरियेला ।।५६।। म्हणे रे बाळा गायत्रीपुरश्चरण । करावे वाटते तुझे हातून । ज्यायोगे हे अरिष्ट पूर्ण । न राहेचि सर्वथा ।।५७।। परिसताचि ऐसे गुरूवचन । म्हणे स्वामींची आज्ञा मज प्रमाण । आज्ञेपरी ते शुद्धाचरण । करीन निश्चयेचि सर्वदा ।।५८।। बोलूनिया ऐशापरी । मस्तक ठेविले चरणावरी । कृपा हस्त तो बाळाचें शिरी । ठेविला गुरूने सहजची ।।५९।। मग भटजीलागे ती महती । पुरश्चरणाची सांगितली रीतीं । म्हणे बाळातें रक्षील रूक्मिणीपती । निश्चय मानसीं असो द्या ।।६०।। या परी करूनिया समाधान । निरोप दिधला भटजीलागुन । पिता पुत्र दोघे जण । निजगृहासी पातले ।।६१।। बाळासी त्या निजदृष्टी देखतां । धाऊनी आली ललिता माता । भविष्याचा आठव होता । दु:खित जहालीसे मानसीं ।।६२।। नेत्रीं वाहती अश्रुधारा । न बोलवेची ते काही येरयरां । नाटूभट तो सांगे त्या समाचारा । जो कां घडलासे गुरूगृही ।।६३।। पुरश्चराणादिकाचा तो विचार । ऐकूनी तोषले मातेचे अंतर

। म्हणे हो आता न लाविता उशीर । इच्छित करावे ते सर्वही ।।६४।। मग बाळाते बारावर्षे
होताची वयास । पाहूनि मुहूर्त आणि उत्तम दिवस । गायत्रीच्या त्या पुरश्चरणास । प्रारंभ केलासे
सत्भावे ।।६५।। आधीच बाळकृष्णाचे ते शुद्धमन । आणिक अंतरी तो सत्भाव पूर्ण । शुचिर्भूत
राहूनिया रात्रंदिन । पुरश्चरणाते आचरी ।।६६।। ऐशा रीती पुरश्चरणें दोन । अष्टवर्षामाजीं केली
ती पूर्ण । मध्यकाळ तो अठरावे वर्षी जाण । अनिष्ट गेलासे बाळासी ।।६७।। अठरावर्षे ही होता
वयास । ज्वरे त्या पीडिले बाळकृष्णास । देखुनिया ऐसे मातापित्यास । दु:ख अपार जहालेसे
।।६८।। म्हणती रे जगदीशा दयाळा । येऊनी रक्षी आमुच्या बाळा । तुजविण आम्हासी गोद्विजपाळा
। रक्षिता अन्य नसेची ।।६९।। उभयतां पतिपत्नीसह भक्त साचार । धर्ममार्ग वर्तती निरंतर ।
म्हणूनिया त्यापाठी ईश्वर । नित्य उभा असे रक्षाया ।।७०।। ईशकृपा ती होताची तात्काळ ।
बाळाचा तो संपलासे अनिष्ट काळ । आनंदले ते देखुनिया जन सकळ । धन्यवाद तो देती
बाळाते ।।७१।। अनिष्ट काळ संपताचि जाण । एकविस वर्षाचे वयमान । पुरश्चरणे ती जाहलीसे
दोन । ब्रम्हचर्याचे तेज पूर्ण । झळके मुखावरी बाळाच्या ।।७३।। तेजस्वी आणि दैदिप्यमान ।
येथूनि दिसे हा बाळकृष्ण । नित्य ठेऊनिया शुध्दाचरण । सत्य सर्वदा वर्ते जो ।।७४।। पुढे ते
बाळकृष्णाचे कर्म जाण । नित्यस्नानसंध्यादि देवतार्चन । तैसेची भजन पूजनादि देवदर्शन । नित्य
नेमे चालेची ।।७५।। समयोचित हाचि जाणोन । कांता बोले ती भटजीलागुन । म्हणे तो
नष्टकाळ आता पूर्ण । प्रभुकृपेची गेलासे ।।७६।। तरी आता बाळकृष्णाचा लग्न सोहळा ।

पहावा वाटते माझिये डोळा । यालागी पाहूनि ती कुलवधु बाळा । कार्य सत्वरी साधावे ।।७७।। ऐकूनिया स्वपत्नीचे वचन । न करीओ म्हणे ती चिंता जाण । हुंड्यासह त्या वधु आपणहोऊन । येऊ लागल्या बाळातें ।।७८।। पैकी त्या एकादी कुलवधु पाहुन बाळकृष्णालागी ती घेऊ करून । पुढील मासीं मी हे कार्य करीन । विश्वास मानसीं असो दे ।।७९।। माता पित्याचे भाषण । ऐकूनी बाळाचे ते दचकले मन । म्हणे सावध करावे ते पित्यालागून । मातेसही ते आताची ।।८०।। मग मातेजवळी त्या येऊनि सत्वरी । मस्तक ठेविले चरणावरी । म्हणे ओ माते माझिये अंतरी । विचार एक आलासे ।।८१।। मनीं आकांक्षा ती असे येथून । कीं करावे यापुढे ते तीर्थाटन । तरी ती आज्ञा तुमची देऊन । निरोपावे मज आताची ।।८२।। निज बाळाचे ते शब्द ऐकून । विव्हळ जहाले ते मातेचे मन । कीं तो एकदाची पर्वत येऊन । वाटे अंगावरी कोसळला ।।८३।। म्हणे रे बाळ प्रभूकृपेकरून । संकटाचे ते जहालेसे निवारण । ज्याचेनि तो हा आजि सुदिन । प्रारब्धेंची देखिला ।।८४।। म्हणे रे वत्सा यापरी विपरीत । बोलू नये ती यापुढे मात । उपभोग ते सर्वची सतत । भोगावे आता येथुनी ।।८५।। आणि तुझारे लग्न सोहळा । पाहीन म्हणते मी माझिया डोळा । तो दुसरचि हे विघ्न आणूनि बाळा । पुढे ठेविशी कैसा तूं ।।८६।। ऐकुनिया ऐसे मातृवचन । बाळ तो करी तियेचे समाधान । म्हणे विपरीत जे कां वाटे तुम्हालागून । विपरीत नव्हेची ते सर्वथा ।।८७।। सकळ स्त्रिया त्या मजलागून । माते असती कीं तुझे समान । मग कवणाशी तें करावे लग्न । सांगसांग ओ मजलागी

।।८८।। शब्द ऐसा तो श्रवणी पडतां । निचेष्टित पडलीसे होऊन माता । पिता परिसताची ऐशी वार्ता । दु:खानळी पडिलासे ।।८९।। मग सर्वची मोहपाश सांडून । सायंकाळसमयीं तो बाळकृष्ण । करावयालागी ते देवदर्शन । सदनाबाहेर पडियेला ।।९०।। देवदर्शनादि कर्म सारून । किंचित विचार केला जैसे करून । बाहेर तो पडलासे ग्रामातून । मार्ग लक्षुनी चालिला ।।९१।। गेला तो एकदाचि निघून गेला । पुन्हां मागुता नाहीं कीं परतला । तृतीयाध्याय तो संपविला । कथा भाग येवढा सांगुनी ।।९२।। पुढील अध्यायी सुरस कथा । कीं केवळ अमृताची ते सरिता । सेवनालागी ती तुम्हां आता । वासुदेव प्रार्थी निजप्रीती ।।९३।।

इ. श्री. बा. क. सा. तृतीयोध्याय: श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

हरये नम: ।।३।।

**|| श्री ||**

## अध्याय ४ रा

श्रीगणेशाय नमः । जयजयाजी परमानन्दा । पूर्ण परेशा आनंदकंदा । पंढरीवासी बा गोविंदा ।। भक्तप्रियकरा कमलापते ।।१।। भक्ताचे करावया सत्यवचन । विटेवरी तूं नारायण । अद्यापीही उभा राहून । भक्तवचना पाळिले ।।२।। भक्ताचिया काजासाठी । अचल उभा तूं भीमातटी । नित्य तयासी द्यावया भेटी । तिष्ठत उभा आहेस की ।।३।। भक्त संकटी पडता जाण । धाव घेशी तूं आपण होऊन । निवटूनिया ते संकट पूर्ण । निजभक्तां रक्षिसी ।।४।। भक्त दामाजी संकटी पडता । धाव घेऊनिया तूं पंढरिनाथा । अत्यंज वेष तो धरूनिया तत्वतां । उडी घातलीसे दयाळा ।।५।। सांडूनि आपले थोरपण । दरबारी तूं वाकविलीस मान । यवनालागी तो मुजरा करून । चाकर सांगसी की पंताचा ।।६।। तैसाचि संकटी पडता सेना । धोकटी घेऊनिया जगजीवना । नापिक वेष तूं मन मोहना । धरिलासि भक्ताकारणें ।।७।। ब्रह्मादिक तुझेपायीं । तो तूं केलीस की यवन डोई । येणेपरीं तूं संकटसमयीं । येऊनि रक्षिसी सर्वदां ।।८।। असो प्राणाहूनि तुज भक्त आवडती । ऐश आहे तुझी ख्याती । तरी भक्तकथामृत आता पुढती । बोलवी दयाळा येथुनी ।।९।। करावयालागी तीर्थाटन । बाळकृष्ण निघालासे ग्रामातून । गत कथार्थ तो इतूकाचि जाण । श्रोती सावधान परिसावे ।।१०।। पायी चालतां बाळकृष्ण । नित्य मुखीं ते नामस्मरण । करूनिया तो मार्ग क्रमून । उत्तर हिंदुस्थानीं प्रवेशला ।।११।। मग ती

एकापाठी एक जाण । लहान थोर तीर्थे ती संपूर्ण । सर्वचि ती पायीं चालून । यथाविधी केलीसे ।।१२।। यापरी परिसताची जाण । साशंकित होईल श्रोतयांचे मन । कीं बाळकृष्ण हा कफल्लक पूर्ण । असतां घडले कैसे हे ।।१३।। तरी शंका न घ्यावी मानसी । पाठी असतां ऋषीकेशी । उणे न पडेची काही त्यासी । अर्थ इतुकाचि येथिचा ।।१४।। ईशचिंतनीं जो का सदा निमग्न । त्याचा योगक्षेम सर्वची पूर्ण । चालवितसे तो रूक्मिणीरमण । न सांगताची सर्वही ।।१५।। जो ब्रह्मांडाचा निर्माता । आणिक कर्ता हर्ता पोषिता । तयानें ही तीर्थ करविली म्हणतां । नवल यांत नसेची ।।१६।। असो सहा संवत्सरे तो ऐशा रीती । हिंडता घालविलीसे तीर्थोतीर्थी । या उपरि तो वाराणशीप्रती । येऊनिया राहिला ।।१७।। तेथेही शुचिर्भूत राहून । गायत्रीचे ते पुरश्चरण । यथाविधी करूनिया पूर्ण । कृष्णार्पण ते म्हणोनिया ।।१८।। पुढती तो दक्षिणपंथ लक्षून । बाळकृष्ण निघालासे तेथून । मार्गी चालतां नामस्मरण । मुखीं घेता सर्वदा ।।१९।। ऐशापरी भ्रमण करिता । दक्षिणदेशी तो जहालासे येता । भाग्यनगर ते दृष्टि देखता ।। ग्रामाभीतरीं प्रवेशला ।।२०।। भाग्य नगर ही थोर वस्ती । अनेक जातींचे लोक जेथें वसती । प्रत्यक्ष तो असे तेथें नृपती । मुख्य अधिकारी राज्याचा ।।२१।। कालमानेची यापुढे नगराप्रतीं । हैद्राबाद ऐसे त्या सकळ म्हणती । बाळकृष्णानेही ती पुढे वस्ती । येथेचि केलीसे सर्वदा ।।२२।। कोणी एक आप्तसंबंधी गृहस्थ । बाळकृष्णाचे ते होते येथे राहत । तयांचेची गृहीं तो बाळकृष्ण सतत । राहू लागला सहजची ।।२३।। नित्य स्नानसंध्यादी देवतार्चन । आणिक तैसे पुराणादि श्रवण मनन

। सायंसंध्या आणि देवदर्शन । नित्य नेमेची आचरी ।।२४।। केव्हां केव्हा तो तेथेवि राहून ।
तीर्थयात्रेस जाई आपण होऊन । ऐसा तो काळ बारा वर्षे पूर्ण । येथेची राहुनी क्रमियेला
।।२५।। काळ तो द्वादश वर्षे पर्यंत । बाळकृष्ण या रीती येथे क्रमित । इकडे माता विरहानलांत
। होरपळून गेलीस सर्वथा ।।२६।। ललिता माता रात्रंदिन । धाय मोकलून करीतसे की रूदन ।
म्हणे रे वत्सा मज सांडून । कैसा गेलासि आजपरी ।।२७।। पूर्व जन्मीचें ते पातक म्हणून ।
मुकले कीं मी माझ्या बाळालागून । कां पूर्वी मी हरिणीपासून पाडसा वेगळे केलेसे ।।२८।। कां
एकादी बाळहत्या माझिये हातून । न कळता आलीसे ती घडून । ज्या योगें हे संकट ओढून ।
आले असे की मजवरी ।।२९।। जीवनाविण जैसा कां मीन । तैसी ती माता तळमळे रात्रंदिन ।
काही केल्याही तो विरह जाण । न साहेची सर्वथा ।।३०।। धबधबा ती घेतसे ह्रदय पिटून ।
आकांत करीतसे ती रात्रंदिन । ज्या योगे ते पंचप्राण । गोळा होताति सर्वही ।।३१।। या परी ही
चिंतासागरी । बुडून गेलीसे ललिता सुंदरी । तैसीच ती धरणीवरी । अंग टाकुनिया पडेचि
।।३२।। मग ती पडता निचेष्टित । घाबरून जाताती लोक समस्त । ऐशी स्थिती ती पाहून
चिंताग्रस्त । नाटूभट तो होय सर्वदा ।।३३।। मग तो कांतेजवळी बैसून । यथोचित करीतसे की
समाधान । म्हणेगे होणारे न चुके सर्वथा जाण । चिंता ती मग कासया करावी ।।३४।। आणिक
तो तियेचे करूनिया सांत्वन । म्हणे हे सर्वचि आहे ईश्वराधीन । तो जैशारीती ठेवी आपणालागून
तैसेचि आपण राहावे ।।३५।। या परी समाधान करीत असतां । तो अवचित मिळालीसे ती

वार्ता । की बाळाची न करावी चिंता । सुखी असे की तो सर्वदा ।।३६।। मग एक परिचिताकडून । साकल्य वृत्त आलेसे कळून । की भाग्यनगरीं तो बाळकृष्ण । येऊनिया राहिला ।।३७।। ऐसी पडताचि मात कानीं । आनंद जहालासे सकळांचे मनीं । म्हणती आजिचा हा सुदिन आम्हालागुनी । निज भाग्येचि लाधला ।।३८।। ललिताबाई ती बोलता वचन । ह्रदय आलेसे तियेचें भरून । प्रेमाश्रु ते वाहती नयनांतून । शब्द न बोलवेची बोलता ।।३९।। मग भटजीलागी ते एकांती बैसून । माता ती बोले स्फुंदस्फुंदोन । म्हणे पाहिजे ते आता करोन । भेटवा बाळ तो मजलागी ।।४०।। त्याविण मजसी एक क्षण । वाटे कीं तो युगासमान । तरी तुम्ही भाग्यनगरी जाऊन । घेऊन यावे बाळासी ।।४१।। ऐकूनी कांतेचे वचन । भटजी ते तात्काळ निघती तेथून । भाग्यनगराप्रती ते येऊन । निजपुत्राशी त्या देखिले ।।४२।। निज पुत्राचे पाहता वदन । तेज:पुंज हा दिसे बाळकृष्ण । वृत्ती सर्वदा पुर्ण । अपपर तो काही नेणेची ।।४३।। नाना यत्नें त्या समजाऊन । म्हणे स्वग्रामीं चलावे आता येथून । तुझी ती माता विव्हळपुर्ण । जहालीसे तुज भेटाया ।।४४।। करूणस्वरे तो बोले पिता । म्हणेरे बाळा जरी का विलंब होता । तरी तनुत्याग करील ती तुझी माता । वियोगे सत्यचि तुझिया ।।४५।। ऐकूनिया ऐसे पितृवचन । तात्काळ निघालासे बाळकृष्ण । मग पितापुत्र दोघे जण । स्वग्रामासी ते पातले ।।४६।। बाळकृष्णासी नयनी देखतां । धाव घेई ती भेटावया माता । निज पुत्रासी ते पोटी धरिता । आनंद वाटे मातेसी ।।४७।। नयनी वाहती प्रेमाश्रुधारा । तो सकळ धाव घेताति सामोरा । बाळकृष्णासी ते देखुनी

येरयेरा । धन्य धन्य म्हणताती ।।४८।। वनवासाचे ते संपताची दिन । कौसल्येसी भेटला रघुनंदन । तेवी माता भेटे बाळकृष्णालागून । आनंद न मायेचि अंतरी ।।४९।। कीं यमुना डोहीं बुडता देवकीनंदन ।। मागुती आलासे जेव्हा परतोन । यशोदा माता त्यातें धाऊन । भेटे जैसीकां निजप्रीती ।।५०।। यापरी निजपुत्रासी भेटतां । आनंदली ती ललिता माता । जैसी कां जन्मांधासि ती दृष्टी येता । सुख न माये त्या अंतरी ।।५१।। कीं द्रव्यकूप सांपडतां दरिद्रयाला । जैसा कां तो आनंद होतसे त्याला । तैशारीती ललिता मातेला । अत्यानंद जहालासे ।।५२।। असो माता पिता आपुले मनीं। आनंद मानिती निशिदिनी । इकडे बाळकृष्ण तो ईश्वरभजनीं । निमग्न असेचि सर्वदा ।।५३।। अशाश्वत हे सर्वचि जाणून । उगास असे हा बाळकृष्ण । नित्य स्नानसंध्यादि देवतार्चन । करीतसे की निजप्रीती ।।५४।। पुढे अल्पची काळ लोटता एके दिनी । सायंसंध्यादि कर्मादि सारूनी । बाळकृष्ण तो निघालासे देवदर्शनी । नित्यनेम हा साराया ।।५५।। तोचि दाराजवळी येताक्षणी । महापुरूष एक देखिला नयनी । की तो प्रत्यक्ष कैलासाहूनी । वाटे शंकरची पातला ।।५६।। मूर्ति दिसे दैदिप्यमान । नव्वदाचे वरी असे वयमान । विशालभाळ आणि आकर्ण नयन । यष्टिका करी ती शोभे ज्यां ।।५७।। जटाभार तो विराजे शिरीं । दाढी रूळे ती तैसी पांढरी । झोळी असे ती कांखेभीतरी । खडावा पायीं त्या साजिऱ्या ।।५८।। भस्म चर्चिले से सर्वांगाला । गळा शोभती रूद्राक्षमाळा । कटी लंगोट तो तैसा लाविला । स्वेच्छेनेचि साजिरा ।।५९।। कानी रूद्राक्ष कुंडलं शोभती । जिनांबर तैसे अंगावरती । पांघुरलासे ते

अतिप्रीती । शोभायमाना दिसे जे ।।६०।। असो यापरी देखताचि येरयेरा । उभयतांचे नेत्रीं त्या प्रेमश्रुधारा । अखंडत्वेचि वाहती ऐकसरा । कोणी न कोणा बोलती ।।६१।। मग ते पुढती पुढती जाऊनि धाऊन । उभयता भेटती कडकडून । नाटूभट तेथेची आड बैसून । प्रकार हा सर्वचि विलोकी ।।६२।। मग तो महापुरूष यावनी भाषेतून । बाळकृष्णाशी जे कां बोलिला वचन । ते सर्वचि आता राष्ट्र भाषेतून । सांगेन तुम्हासि परियेसा ।।६३।। म्हणे रे बाळा पायी चालून । आजवरीते केलेसि तीर्थाटन । कवण फळ ते पावलासी जाण । सांग सांग मजलागी।।६४।। आणिक तू मायाजाळी भुलून । गेलासी मजलागी विसरून । तुझी भेट ती व्हावी म्हणून । वाट पाहिलीसे आजवरी ।।६५।। परी शेवटी नाना कष्ट सोसून । येथवरी आलासे पायी चालून । तरी तू आता येथूनी सावधान । अंतरी असावे सर्वदा ।।६६।। बारे आता सांडूनी सुखोपभोग । करावा तो आपुला कार्यभाग । मागुती ऐसा हा सुयोग । येणार नाही तो सर्वथा ।।६७।। बाळा मी तुज सांगतो उघड । कोणाचीही ती न आम्हासि चाड । रात्रंदिन ती करावी धडपड । इष्ट हेतू तो साधावा ।।६८।। ऐशा परी ते बाळाशी बोलून । न कळे कायसे वस्तू घेतली झोळीतून । मग बाळाचा तो हस्त धरून । त्यां हाती दिधलि ती सर्वही ।।६९।। विलंब न लावता किंचित । बाळ तो सर्वची ती घाली मुखांत । तोचि बाळाचे कर्णी न कळे ती मात । काय सांगितली ती कळेना ।।७०।। महापुरूषाचे ते शब्द कानीं पडतां । खदखदा हसिन्नले ते उभयतां । नेत्र संकेत करूनिया तत्वतां । धाव घेती उभयतां ।।७१।।

एके धाव घेतली पश्चिमेस । तो दुसरा पळे पुर्वभागास । देखूनिया ह्या सर्व प्रकारास । नाटूभट तो मार्गी पातला ।।७२।। हांक मारूनिया ती बाळाला । सैरावैरा ता त्या पाठी धाविन्नला । मुखी म्हणतसे की चालिला । सांगरे बाळकृष्ण मजलागी ।।७३।। परि आतां कैचा बाळकृष्ण । दृष्टीआड जहालासे न लागतां क्षण । न पाहेची तो मागे परतोन । पुनरपि मागुता नयेचि ।।७४।। निराश होऊनिया भटजी जाणा । परत आलेसे आपुल्या सदना । ललितामाता आणि त्या सकळजना । घडला प्रकार कथियेला ।।७५।। विस्मय पावती ऐकूनी सकळ । किती एक ते करितात हळहळ । एकची जहालासे हलकल्लोळ । आकांत मातेने मांडिला ।।७६।। म्हणेरे बाळा कैसा तू निष्टुर । होऊनी गेलासि मागुता दूर । नवमास उदरी कष्ट अपार । सोसूनी सार्थक नाव्हेची ।।७७।। कैचा कोठूनी आलासे महापुरूष । घेऊन गेला तो माझिया बाळास । पूर्वजन्मीचा हा वैरी उदयास । न कळे तो आलासे कोठुनि ।।७८।। नाना प्रयत्ने करून माझिया बाळा आले ते घेऊन । परी व्यर्यची सर्व हा आलासे शीण । अकस्मात घाला पडियेला ।।७९।। जसे कां प्रयासे मिळविता धन । तो अकस्मात तस्करे घाला घालून न्यावे त्यापरि महापुरूष तस्कर येऊन । बाळकृष्णधन घेऊनि गेलासे ।।८०।। यापरी विलाप करिता । आक्रंदे बहू ती ललिता माता । तैसाचि तो भोळा आणिक सात्विक पिता । दु:खानळी पडिलासे ।।८१।। यापरी लोटता सप्तदिन । वार्ता आली ती औरंगाबाद येथून । की बाळकृष्ण हा सुखरूप येऊन । पोहचला असे येथेची ।।८२।। श्रोती ऐकावे सावधान । विष्णु भट नामे करूनी ब्राम्हण । आप्तसंवधी असोनि

भटाचा पुर्ण । औरंगाबादवासी जो असे की ।।८३।। तयानेंची ही सुवार्ता । बाबरे ग्रामी पाठविली तत्वतां । परि इकडे इहलोकातें सोडुनी ललिता माता । सत्वरचि पुढे गेलीसे ।।८४।। धन्य धन्य ती ललितामाता । महासाध्वी आणि पतिव्रता । लख-लखित सौभाग्यनिशी तत्वतां । परलोकवासी जहालीसे ।।८५।। असो या पुढे बाळकृष्ण । पिशाच्चवृत्ति करूनिया धारण । औरंगाबाद येथेची स्वच्छे राहून । काळक्रमित स्वानंदे ।।८६।। कथा भाग इतुकाचि सांगून चतुर्थाध्यायीचे संपविले लेखन । पुढील अध्यायी जे कां वर्णन । येईल सुरस परियेसा ।।८७।। संत चरित्र असे ते गहन । परि वदविता तो एक नारायण । वासुदेव हा त्या निमित्त्यचि जाण । सांप्रत येथें असे की ।।८८।।

**इ. श्री. बा. क. सार. चतुर्थोऽध्याय: कृष्णार्पणमस्तु ।।**

**हरये नमः ।।४।।**

॥ श्री ॥

## अध्याय ५ वा

श्रीगणेशाय नमः । जयजयाजी माधवा मधुसूदना । असुरांतका मुरमर्दना । मदन ताता मन मोहना । प्रल्हादरक्षका नरहरे ॥१॥ जो जो ज्या रीती तुज ये शरण । तैसेचि तू त्याचे करिसी रक्षण । तो थोर अथवा आहे की सान । ऐसे न पाहसी सर्वेशा ॥२॥ अल्पवयी असूनिया तो प्रल्हाद भक्त । धावलासि तू त्यासाठी जगन्नाथ । उडी घालूनिया तू त्या संकटांत । परोपरी त्या रक्षिले ॥३॥ त्याचे करावया सत्यवचन । शुष्क स्तंभी प्रगटला तू नारायण । वधुनिया हिरण्यकश्यपु दैत्य जाण । निज भक्त राज्यी स्थापिला ॥४॥ याच परी तो ध्रुवबाळासी । अढळपद दिधले ऋषीकेशी । एक शुद्ध भाव तो आवडे तुजसी । आनंद पाहसी तू गोविंदा ॥५॥ मग तो आहे थोर की सान । उच्चवर्ण अथवा यातिहीन । तैसाचि श्रीमंत अथवा दरिद्री नेणून । रक्षिसी निजांगे ॥६॥ परी शुद्ध भाव आहे जयाचे जवळ । तयानेची बांधले की तुज वनमाळी । तयाची तू पुरवावया आळी । तत्पर अससी सर्वदा ॥७॥ असो बहु बाली ती कासया । भावबळेची बांधिले तुज पंढरि राया । शुद्ध भावविण त्या अन्य उपाया । हाता न येशी तूं सर्वथा ॥८॥ तरी शुद्धभाव ओळखून माझा पूर्ण । करवावे ते पुढे ग्रंथ लेखन । तुजविण सर्वेशा हे कार्य कठिण । होणे अशक्य माझेनी ॥९॥ मी तो असे की विद्याहीन । शुद्धाशुद्ध नेणेची माझे मन । तेथे या लेखनाचा अभिमान । व्यर्थ कासया मजलागी ॥१०॥ तरी तू सर्वथा अंतरी बैसून । कथामृत

बोलवी पुढें येथून । गताध्यायीं जे का जहालेसे कथन । श्रोती सावधान परिसावे ।।११।। औरंगाबादेस बाळकुष्ण । भ्रमन करिता राहिलासे येऊन । पिशाच्चवृत्ति ती करूनिया धारण । राहिला स्वेच्छे तो येथेची ।।१२।। कर्ममार्ग तो अवघाची येथून । सहज सुटलासे मुळापासून । स्नानसंध्यादि देवतार्चन । सर्वचि खुंटले येथुनी ।।१३।। पुढे बाळकृष्ण कधी कोणापासून । न मागेची अन्न आणि जीवन । कोणी काही दिधल्या आपण होवून । घेई तो स्वइच्छेचि आपुल्या ।।१४।। नित्यचि तो ग्रामाभीतरी । हिंडे सारखा स्व इच्छेपरी । कोणीही त्या बोलतां मार्गावरी । धाव तो घेई त्या माराया ।।१५।। मग तो नर अथवा नारी नेणून । दु:शब्देचि त्या करीतसे ताडण । केव्हा केव्हा तो मारहाण । करीत धाऊनि कोणाही ।।१६।। मार्गी चालता बाळकृष्ण । कोणाहि करीतसे गालिप्रदान । औरंगाबादवासी ते सकळ जन । त्रासून गेलेसे यापरी ।।१७।। म्हणती हा वेडाबावळा पिसा । कोठून आलासे न कळे कैसा । कुठवरी सोसावे ते या त्रासा । उपाय न कळेचि तो सर्वथा ।।१८।। मग ते अवघे येथिचे जन । विचार तो करिती सर्वचि मिळून । उपाय तो यालागीं काहीं शोधून । काढावा म्हणती सर्वही ।।१९।। नाही तरी एखादा विपरीत । न कळे तो होइल अपघाता आधी उपाय त्वरित । करणें उचित असे कीं ।।२०।। ऐशी आहे लोकरीती । पाण्याआधीं वळण बांधिती । मग ते ग्रामाधिकाऱ्यासी भेटती । जाऊनि सर्वचि एकदा ।।२१।। सांगुनी त्या सकळ वृत्तांत । उपायलागी ते त्या प्रार्थित । नाही तरी तो एखादा अपघात । येईल तो न कळे कोणावरी ।।२२।। बिदो बिदी हिंडे हा बाळकृष्ण । न कळे तो

केव्हा येईल कोठून । बायामुलासि ते मार्गावरून । वागणे अशक्य जहालेसे ।।२३।। यापरी ऐकून वृत्तांताला । ग्रामाधिकारी ते म्हणती सकळां । सत्वरची आता आम्ही बाळकृष्णाला पाठऊ येथूनि कोठेही ।।२४।। यापरि मिळताचि आश्वासन । सकळांचे ते जहाले समाधान । येरयेराशी म्हणती ते कठीण । संकट आमुचे हे टळलेसे ।।२५।। ऐशारीती बोलती परस्परा । मग जातातिं आपापुल्या घरा । इकडे ग्रामाधिकारी मिळूनि सारा । विचार करिती ऐकांती ।।२६।। मग सर्वांनुमतेची जाण । बाळकृष्णाशी ते आणिले धरून । आणिक दुसरे जे कां बंदिवान । आणुनिया ठेविले त्यामाजी ।।२७।। प्रसंगेची पुढे त्यालागी सत्वरी । दुसरे बंदिवानांचे बरोबरी । पाठविलेसे ते जालनापुरी । कारागृही ते तेथिच्या ।।२८।। अल्पची काळ तो कारागृही वास । घडलासे तो येथे बाळकृष्णास । पुढे तो न कळताची कवणास । बाहेर निघालासे तेथूनी ।।२९।। इतुके रक्षक असता जाण । न कळे कैसा केव्हा निघाला तो तेथून । पूर्वस्थळाशी हा बाळकृष्ण । येऊनि सुखरूप पोहचला ।।३०।। औरंगाबादवासी सकळजन । विस्मय पावती त्यांसी देखून । म्हणती हा पिसा बावळा बाळकृष्ण । मागुती येथे आलासे ।।३१।। येरायेरामाजी ते बोलती । मागुती आम्हां हा पीडील म्हणती । तरी यालागी तो उपाय सत्वरगती । सर्वानुमतेची योजावा ।।३२।। कित्येक म्हणती आता त्वरीत । अधिकाऱ्याशी सांगावी जाऊनि मात । जेणे का सुख होय आम्हा सतत । उपाय ऐसाचि करावा ।।३३।। मग ग्रामाधिकाऱ्याशी जाऊन । सकळ ते सांगती वर्तमान । म्हणती हा वेडा पिसा बाळकृष्ण । मागुती येथे हा आलासे ।।३४।।

पुनरपि हा येथे आल्यापासून । मार्गी फिरणे ते जहालेसे कठीण । तरी महाराजा कृपाकरून । सत्वरचि उपाय करावा ।।३५।। देखुनिया ऐशी लोकस्थिती । अधिकारी ते आश्वासन त्यालागी देती । म्हणे शांत असावे हो तुम्ही चित्ती । उपाय करू तो आताची ।।३६।। ऐकुनिया ऐसे वचन । सकळिकांचे जहाले समाधान । मग ते निघती एकदाचे तेथून । स्वगृहाते जावया ।।३७।। इकडे अधिकारी सेवकालागून । आज्ञा ती करिती की बहु तीक्ष्ण । की जेथे जैसा तो सापडे बाळकृष्ण । धरूनि आणा त्या वेगेसी ।।३७।। आज्ञा ती पडताचि ऐशी कानी । सेवक ते तत्काळ निघाले तेथुनी । शोधित निघाले ते बाळकृष्ण - लागुनी । ग्रामाभीतरी सर्वही ।।३९।। बिंदाबिंदीं ते दूत हिंडती । बाळकृष्ण कोठे तो दावा म्हणती । कित्येक ते येऊनिया त्या सांगती । आताची तो गेला म्हणती येथुनी ।।४०।। तैसाची मग ते मार्ग लक्षून । पाठी धावती न लागता क्षण । परि कोठे ही न दिसे तो बाळकृष्ण । निराश होऊनिया मग ते बैसती ।।४१।। तोचि दुजा येऊनिया सांगे मात । बाळकृष्णासी पाहिले मी एका बिंदीत । वृक्षातळी तो बैसलासे शांत । जाऊनिया विलोका आताचि ।।४२।। ज्या स्थळीची सांगितली खूण । दूत त्या स्थळी ते पहाती येऊन । परी न दिसे तो कोठे बाळकृष्ण । निराश मागुता ते बैसती ।।४३।। नेणूनि बाळकृष्णाचा अधिकार । अज्ञानेची त्या धरू म्हणती सत्वर । अहोरात्र ते श्रम अपार । करिती त्यालागी ते धराया ।।४४।। परी नाना प्रयत्न करून । हाता नयेचि तो बाळकृष्ण । निराश होऊनिया ते सेवकगण । निज स्थाना जाऊनि बैसती ।।४५।। सकळ

वृत्तांत त्यालागी ते सांगती । बाळकृष्ण हा येथे जे आला म्हणती । असत्य वाटेकी ते निश्चये ।।४६।। यापरी ऐकताचि दूत वचन । अधिकारी होऊनिया तो क्रोधायमान । म्हणे ज्या कोणी हे दिधले असत्य वर्तमान । धरूनिया आणा त्या वेगेशी ।।४७।। जेणे कां दिणली ही असत्य मात । शिक्षा त्या लाऊ आताचि त्वरीत । तोचि लोकसमुदाय येऊन समस्त वर्तमान सांगती जेका परियेसा ।।४८।। म्हणती हो महाराजा बाळकृष्णाशी । धरूनि आणावे ते वेगेसि । त्रास तो त्यापासून आम्हासी । अहर्निशी तो होतसे ।।४९।। परिसताची ऐसे लोक वचन । अधिकाऱ्याचे गोंधळून गेलेले मन । सत्यासत्य प्रकार त्यासी जाण । काही केल्या नुमजेची ।।५०।। परी कर्तव्य आपुले म्हणून । अंगेची उठला धरावया लागून । करूनिया मनी ते ईशचिंतन । गृहाबाहेर पडियेला ।।५१।। तोचि सामोरा आपण होऊन । येऊनिया ठाकलासे बाळकृष्णासी । तंद्री भास तो अधिकाऱ्यासी । क्षणभरी कैसा तो जहालासे ।।५३।। सकळाशी पाहतां विलोकून । अधिकाऱ्याशी तो दिसे बाळकृष्ण । आपणासी पाहता आपण । बाळकृष्ण अवघा दिसेचि ।।५४।। सहज पाहतां मागे परतोन । तो अधिकाऱ्यासी दिसे बाळकृष्ण । पुढे पाहता ते सेवकगण । बाळकृष्ण अवघे दिसताती ।।५५।। ह्या परी ते व्हावया काय कारण । प्रसंगेची करू ते तयाचे विवरण । परि या ठाई ते हरिविषयीचे प्रमाण । अल्पचि सांगेन परियेसा ।।५६।। कंसासि लागता कृष्णध्यान । तो त्यासी ते दिसे कृष्णरूपपूर्ण । अंतर्बाह्य ते त्या कृष्णाविण । आन ते काही दिसेना ।।५७।। ज्या वस्तूचा ध्यास जयालागून । आणिक तद्रूपची जहालिया

तयाचे मन । दुजें ते काही न दिसे त्यालागुन । अर्थ इतुकाचि येथिचा ।।५८।। असो मागील पहावे अनुसंधान । अधिकाऱ्याशी तो दिसे बाळकृष्ण । जितुके कां त्या ठायीं मिळालेसे जन । अवघे बाळकृष्ण दिसताति ।।५९।। तंद्रीभास तो ऐसा होता जाण । भांबाऊन गेले ते अधिकाऱ्याचे जन । या परी ते विलोकताची बाळकृष्ण । खदखदा तो हासिन्नला ।।६०।। हास्य करिती बाळकृष्ण । भानावरी आले ते सकळजन । म्हणती हा तो आलासे आपण होऊन । धरा हो धरा त्या वेगेसी ।।६१।। सकळांची ती ओरड ऐकून । देहावरी आलासे अधिकारी पूर्ण । अश्रु वाहती ते नयनांतून । बाळकृष्णासी त्या देखतां ।।६२।। क्षण एक ऐसा लोटता जाण । विसरला तो अवघाची प्रकार पूर्ण । अविद्यासागरीं गेलासे बुडोन । मागुती काय बोलिला ।।६३।। धरा हो धरा म्हणे या बाळकृष्णासी । जेणे का त्रासिले ते समस्ताशी । बंधन करूनिया सत्वर त्यासी । कारागृही त्या ठेवावे ।।६४।। मग अनुचर त्या वेगे धाऊन । आणून । पायी घालती तयाच्या ।।६५।। परी ती घालताची तयाचे पायी । तुटून जातसे की ती लवलाही । देखूनिया विस्मय पावती सर्वही । स्तब्धचि ठाकती ते त्यापुढे ।।६६।। मागुती नाना प्रयत्न करितां । बेडी ती न टिकेचि पायीं घालितां । निरूपाय म्हणू त्या बेडीविण तत्वता । कारागृहीं त्या पाठविती ।।६७।। अज्ञानडोही ते बुडालेसे जन । नेणती त्या बाळकृष्णाचे महिमान । एका वेड्यापिशासि आम्ही बंधन । करविले आजि म्हणताती ।।६८।। संसारबेडी ती अति कठीण । ती जयाने तोडिली न लागता क्षण । तेथे ही लोह बेडी ते कितीसी जाण । काय बापुडी ती त्यापुढे ।।६९।। असो

कारागृही ही बाळकृष्ण । स्वैर वृत्ती ती करूनिया धारण । कारागृहीच्या त्या नियमाते झुगारून । वागे निजछंदेची सर्वदा ।।७०।। नित्य निशीमाजी ते जागरण । करूनिया करीतसे ते मंत्रपठण । तो कधी कधी ते ईश्वर भजन । निजछंदेची करितसे ।।७१।। कधी तो आरडे ओरडे भयानक । ज्यायोगे ते दचकती रक्षक । बंदिवान तैसेची ते अनेक । त्रासून गेले ते सर्वही ।।७२।। अनेकांची ती वस्त्रे घेऊन । फाडी फेकी बाहेर आणून । किती एकासी तो मारहाण । निर्भय रीत्या करीतसे ।।७३।। बंदीवानासमवेत भोजन । कधी न करी हा बाळकृष्ण । बहिर्दिशादि कृत्ये जाण । न करी तो आणिक सांगाते ।।७४।। कोठेही बहिर्दिशेस बैसावे । मना येईल तैसेचि वर्तावे । इच्छेपरी ते वाटल्या अन्न खावे । निर्भयपणेची सर्वदा ।।७५।। बाळकृष्णाचे ते यावरी वर्तन । देखुनी या त्रासले रक्षकजन । लाथा - बुक्यादि उपचारे पूजन । करिती बाळकृष्णाचे सर्वही ।।७६।। आणिक तैसे अन्न आणि जीवनविण । रक्षक ते ठेवती त्यालागून । यावरी ते दिवस दोन दोन । अन्न पाण्याविण जाताति ।।७७।। परि ते बाळकृष्णासी खंत । न वाटे की त्याची किंचित । सदा सर्वदा राहुनी मनी शांत । चाळे न सोडी तो आपुले ।।७८।। मग रक्षकजन त्रासून । अधिकाऱ्यासी ते सांगती वर्तमान । म्हणती यालागे ते आणिक बंदिवान । त्रासून गेलेसे सर्वही ।।७९।। नाना उपाय आम्ही ते करिता । परि तो नायकेची सर्वथा । सत्यासत्य पहावे ते तत्वता । निजांगेचि ते येऊनिया ।।८०।। रक्षकजनांचे ते परिसताचि वचन । अधिकारी ते निजांगेची आपण । कारागृही ते पाहती येऊन । सत्य की असत्य म्हणोनिया ।।८१।। दूर्ती जे जे

का सांगितले । त्याहूनी अधिक प्रत्ययासि आले । आरडाओरड करिता ते देखिल । बाळकृष्णासी ते निज दृष्टी ।।८२।। अधिकाऱ्यासि पहाता बाळकृष्ण । निर्भयपणेची तो करी गलिप्रदान । रक्षकजनावरी तो धाऊन । येतसेकी माराया ।।८३।। बाळकृष्णाच्या त्या पाहूनि कृत्यास । अधिकारी बोलती रक्षकास । म्हणती सत्वरची करू त्या उपायास । चिंता न करावी मानसी ।।८४।। पुढे तो ऐसाचि लोटता काळ काहीं । मुख्य अधिकारी जो का तेथिचा पाही । संकटामाजी पडता त्या उपाय काही । अंतरी न सुचेचि सर्वथा ।।८५।। संकट देखूनिया मानसी । चिंताग्रस्त राहे कीं तो अहर्निशी । दीनदयाळ म्हणतसे ऋषीकेशी । संकटी उडी घालीकां ।।८६।। भक्तासखा तू नारायण । तूज असे की मी अनन्य शरण । यालागी शरणागताचे रक्षण । करावे निजांगेची येउनी ।।८७।। यापरी प्रार्थना करून । निद्रा सागरी तो गेलासे बुडोन । तोंचि स्वप्नी येऊनिया बाळकृष्ण । उपाय तो त्यासी कथियेला ।।८८।। म्हणेरे दिवस ते लोटता तीन । संकट ते जाईल तुझे निरसोन । आतातरी हो सावधान । पुढता पुढती असावे ।।८९।। मग अधिकारी तो होऊनिया जागृत । स्वप्नीचा तो भास आठवी मनांत । म्हणे न कळे काय तो ईश्वरी संकेत । कांही केल्या नुमजेचि ।।९०।। पुढे ते यापरी लोटता दिवस तीन । संकट तें समुळ गेलेसे निरसोन । आनंदले ते अधिकाऱ्याचे मन । स्वप्न भास सत्य म्हणोनिया ।।९१।। मग तात्काळची कारागृही येऊन । निजदृष्टी पाहता तो बाळकृष्ण । प्रेमाश्रु ते वाहती नयनांतून । शब्द न बोलवेचि बोलता ।।९२।। अधिकाऱ्याची ही ती अंतरी खूण । प्रत्यया आलीसे सर्वही

।।९३।। मग तो माघारा स्वगृहा परतोन । वरिष्ठ अधिकाऱ्याशीं ते कळवी वर्तमान । की बाळकृष्णासि ते द्यावे सोडून । ऐसेची मजलागी ते वाटते ।।९४।। आम्ही हा वेडा पिसा म्हणून । कारागृही त्या ठेविले आणुन । परि हा अधिकारी असे हा पूर्ण । अनुभवसिद्ध असे कीं ।।९५।। तोचि वरिष्ठ अधिकाऱ्याकडून । आज्ञा ती जहाली न लागता क्षण । कीं बाळकृष्णासी ते द्यावे सोडून । इच्छेपरी त्या तुमच्या ।।९६।। ऐशी त्या आज्ञा देखता क्षणीं । कारागृही तो अधिकारी आलासे धाऊनी । बाळकृष्णासी त्या देखताची नयनी । चरणी मस्तक ठेविले ।।९७।। आणिक त्या निजकरेची धरून । मुक्त केलासे हा बाळकृष्ण । मागुती त्याते सन्मानून । निरोप दिघला प्रीतीने ।।९८।। पुढे तो पूज्यबुद्धि व्हावया लागून । हेचि एक जहाले कारण । कित्येक ते बाळकृष्णाचा सन्मान । आपण होऊन करिताती ।।९९।। दिवसें दिवसे ती याच रीती । बाळकृष्णाची होतसे ख्याती । अधिकाऱ्यास जैसे त्या लोक म्हणती । महाराज ऐसेची सर्वदा ।।१००।। जरी का बंधमुक्त केले महाराजा लागून । परि ते कारागृही जाती आपण होऊन । नित्य त्या फेऱ्या ऐशा किती म्हणून । कारागृही ते करिताती ।।१०१।। कथाभाग इतुकाची सांगुनी । संपविला अध्याय तो पांचवा येथुनी । पुढील अध्यायीं सुरस कथा श्रवणी । सादर श्रोती परीसावे ।।१०२।। कथामृत वदविता जाण । एक असे की तो नारायण । वासूदेव हा केवळ निमित्त पूर्ण । लेखनालागी असे कीं ।।१०३।।

**इ. श्री. बा. कथामृतसार पंचमोध्यायः । श्रीकृष्णार्पणमस्तु ।।५।।**

**हरयेनमः ।**

।। श्री ।।

## अध्याय ६ वा

श्री गणेशाय नम: । जयजयाजी रूक्मिणीकांता । पंढरपुरवासिया पंढरीनाथा । भक्तप्रियकरा त्रिभुवनत्राता । यदुकुलभूषण जगत्पते ।।१।। अगम्य जो तुझा महिमा जाण । नकळे की तो एका भक्तवाचुन । कीं भक्तमहिमा तो तुजविण । न कळे कवणासी सर्वथा ।।२।। विभक्त नाही जो तुजपासून । भक्त तोचि म्हणवी तुझा पूर्ण । पूर्ण परेशा तू त्याचेच आधीन । होऊनि राहसी सर्वदा ।।३।। नाना उपाय करून । तुज आकळू पाहती सर्वजन । परि ते उपाय व्यर्थचि जाण । शुद्धभावा तो नसता सर्वही ।।४।। उत्तमकुळी पावला जनन । आणिक ती नाना शास्त्रे केली पठण । परि त्या एका शुद्धभावाविण । नावडेचि तुज सर्वथा ।।५।। शुद्धभाव असेकी जयाचा पूर्ण । मग तेथे न पहासी गुणावगुण । सान थोर अथवा हा यातिहीन । न पहासी तूं गोविंदा ।।६।। विदुराचा तो अंतरभाव जाणून । तेथे तूं गेलासि आपण होऊन । कण्या जैसें ते कदान्न भक्षून । तृप्त जहाला तूं श्रीहरी ।।७।। भिल्लिणीची ती उष्टी बोरे । सेविलीसकी तूं ती रमावरे । सुदाम्याचे ते पोहे निजकरे । घेऊनि भक्षिसी स्वानंदे ।।८।। यासि पाहता सत्य कारण । एक असेकी तो शुद्ध भाव पूर्ण । शुद्धभावाविण ते उपाय आन । व्यर्थचि जाण सर्वथा ।।९।। तुझेभक्त जे जे बोलती । तैसेचि तू वर्तसी की रमापती । भक्तकाज ते करावया निश्चिती । तत्पर अससी की निजांगे ।।१०।। हाचि आशय ठेऊनी मानसी । शरण आलो की मी तुजपासी । दीनदयाळ

ऋषीकेशी वदवी येथूनी कथामृता ।।११।। इच्छा ती असेकीं मज दारूण । कथामृत पुढे ते लिहावे म्हणून । परि शब्दाची तो नाठवे जाण । काही केल्या येथुनी ।।१२।। तरी सर्वव्यापक तू श्रीहरी । तुझेचि तू आता वर्णन करी । अभिमान उठोनेदी माझिये अंतरी । कृपाळा जगदीशा ।।१३।। जो अभिमानडोहीं बुडला । सर्वस्वी तो परमार्था मुकला । परमार्थ नाही ज्या तो परदेहाला । येऊनिया माता शिणविली ।।१४।। तरी सत्यप्रकाश तू नारायण । माझिये ह्रदय आकाशी प्रगटून । रिपु माझा हा अभिमान । समूळ दवडी की सर्वेशा ।।१५।। समूळ गेलिया हा अभिमान । दृष्टी ती होय समसमान । समदृष्टी होता मग मी तू पण । मावळे तेव्हा सहजची ।।१६।। आत्मनिवेदन भक्तीचे हे लक्षण । प्रसंगे ते करू तयाचे विवरण । सांप्रत पहावे ते अनुसंधान । गताध्यायीचे येथुनी ।।१७।। पुढे दिवसेंदिवस अधिकाअधिक । बाळकृष्णाचे ते गुण सकलिक । गाउनी म्हणती आम्ही सकळ लोक । आजवरी विन्मुख या झालो कीं ।।१८।। आता तरी म्हणती सावधान । पिसा बावळा या न म्हणावे येथुन । जेणे केलासे आपुले आधीन । तो जगतज्जीवन जगदात्मा ।।१९।। सकळांचा तो यापरी भावपूर्ण । होऊनिया ते बाळकृष्णालागून । महाराज ऐसेचि म्हणती आपण होऊन । येरयेरामाजि ते सर्वदा ।।२०।। सर्वचि ते नित्य दर्शन । महाराजांचे इच्छिती मनापासून । किती एक ते अन्न आणि जीवन । द्यावया त्यापाठी लागती ।।२१।। परि महाराजांचे ते वर्तन । स्वेच्छाचारी असेकी रात्रंदिन । किंचतही ती उपाधि म्हणून । महाराजांलाही नसेचि ।।२२।। किती एक समयीं ते मार्गावरून । चालत असता करिती

मंत्रपठण । विदेही वृत्ती ती या परिपूर्ण । सदा सर्वदा असेकीं ।।२३।। अद्वैतपणेसर्वदा जाण । महाराज करिती वेद पठण । कधी कधी ते सामवेद गायन । यथोचित करिताती ।।२४।। ऋग्वेद यजुर्वेद सामवेद पुर्ण । तैसाचि चतुर्थ वेद अथर्वण । जेव्हा जैसे का इच्छी महाराजांचे मन । तेव्हां तैसेचि गाताती ।।२५।। तो कधी ते गीता भागवत यातील निवडक । म्हणताति तैसे ते अनेक श्लोक । अर्थ सांगतो जैसे कां पुराणिक । त्या परी स्वइच्छे बोलती ।।२६।। परि स्वछंदी हे महाराज अति । इच्छेपरी ते कोठेही बैसती । कधी तो मंत्रघोष अथवा कधी गाती । निज छंदेची आपुल्या ।।२७।। अंतरी इच्छा होताचि जाण । करीत बैसती ईश्वर भजन । टाळमृदंगादिका जैसे साधन । चाड त्या किंचित नसेची ।।२८।। निरपेक्ष जो का करी भजन । ईश्वरा आवडे तो प्राणाहून । त्याचे करावया संरक्षण । तिष्ठत तो सर्वदा श्रीहरी ।।२९।। पुराणप्रसिद्ध यासी प्रमाण । विटेवरी तो रूक्मिणीरमण । पुंडलिकाची ती इच्छा म्हणून । उभा तेथे तैसाची ।।३०।। निरपेक्ष भक्त गोरा कुंभार । संकटी देखुनी त्या सारंगधर । धाऊनिया तेथे घट ते अपार । घडी गोविंद निजांगे ।।३१।। असो सत्य मर्म जाणुनिया चित्ती । उपाधिरहित महाराज वर्तती । एक भरलासे तो जगत्पती । अन्य त्या किंचित भासेना ।।३२।। यापरी जहालिया जयाचे मन । भेदभाव तो जाय मुळीहून । अभेदपूर्ण तयाचे वर्तन । होता नवल नसेची ।।३३।। त्याची वर्णाश्रमधर्मादि कृत्ये जाण । नारायणस्वरूपीं गेलीसे मिळून । मग ते तयाचे तैसेचि वर्तन । होता विपरीत दिसेकी ।।३४।। महाराजांचे ते ऐशाच रीती । सदा सर्वदा स्वछंदे

वर्तती । अज्ञानी ते पाहता तयाप्रती । विपरीत मानसी सहजची ।।३५।। द्विज समूहाठायी प्रसंगेचि जाता । मंत्र घोष करिती महाराज तत्वतां । शास्त्री पंडीतादिकांसी प्रसंग पडता । गीता भागवतादि बोलती ।।३६।। गीरवाणभाषीं ते बोलता जाण । आश्चर्य पावती ते विद्वत्जन । वेद मंत्रामाजीं ते पदे, क्रम, जटाघन । ऐकता विस्मय पावती ।।३७।। महाराजांची दृष्टी समसमान । न वाटे कोणी थोर सान । कीं हा उंच नीच यातिहीन । नेणूनि वर्तती सर्वदा ।।३८।। यालागी सर्वचि इच्छती आपुले मनी । की महाराज यावे आमुच्या सदनी । किती एक ते नाना पक्वान्ने रांधुनी । त्यापाठी लागती द्यावया ।।३९।। ऐशापरी ते यत्न करितां । परि महाराज न येती कधी हाता । क्षुधा तृषा ती महाराजा भागवितां । कष्ट न होती किंचित ।।४०।। तृषा लागतां महाराजालागून । तात्काळ कोठेही बैसती मोरी पाहुनी । हरहर गंगे म्हणूनिया जीवन । तेथील प्राशती स्वानंदे ।।४१।। क्षुधा ती लागलिया महाराजाप्रति । कवणापाशी होते शिळे पाके मागून घेती । अर्धविभाग तो श्वानादिका ते टाकिती । शेष तो भक्षिती मागुतां ।।४२।। परी कोठेही शांतचित्तें बैसून । महाराजानी केले नाही ते भोजन । आणिक ते अन्न असाक्षी म्हणून । घेतले नाही कधीही ।।४३।। किती एकाचा तो अंतरभाव जाणून । महाराज त्याकडे जाताति आपण होऊन । कु शब्दे त्या करिती आधी ताडण । मागुती बोलती तयासी ।।४४।। अंतरिचा जो का असे त्यांचा हेतु । तैसेची ह्याप्रति महाराज बोलत । साश्चर्य होतसे तयाचे चित्त । बोल ते यापरी ऐकतां ।।४५।। अंतरीची पटता खूण । अश्रु येती नयनांतून । धन्य साक्षात्कारी महाराज

पूर्ण । अंतरी ऐसे तो बोलेची ।।४६।। ऐशारीती औरंगाबादवासी जन । महाराज चरणी जहालेसे लीन । किती एक ते महाराजांचे दर्शन । नित्य घेऊ इच्छिती ।।४७।। परि महाराज हे स्वछंदी पूर्ण । चक्राकार हिंडती ग्रामातून । कोणत्याही त्या उपाधीवाचून । वर्तती स्वछंदेची आपुल्या ।।४८।। बिदो बिदी हिंडता मंदिर देखून । जाऊनिया घेती ते देवदर्शन । कधी ते प्रसंगे मशीदीवरून । जाता तेथेचि ठाकती ।।४९।। यवन समुदाय पाहुनी नयनीं । मशीदीमाजी प्रवेशती आपण होऊनि । नमाजादि कृत्ये ती उरकुनी । यवनासवे ते येती माघारी ।।५०।। नमाज पढता महाराजांचे बोल । ऐकूनिया करिती यवन नवल । अरब्बी फारसी आणि कलमादि सकळ । ऐकूनि आश्चर्य होताती ।।५१।। काजी मौलवी पुढे होऊन । महाराजांचा ते करिती सन्मान । कुराण बोस्ता गुलिस्तावरी चर्चा पूर्ण । महाराजासवें करिताती ।।५२।। कितीएक आयाती मुखोग्दत । बोलता विस्मय पावती यवन समस्त । धन्य म्हणती महाराज आणि त्यांचा पंथ । धन्य वंश तयांचा ।।५३।। असो यापरी भेदाभेद सांडून । महाराज वर्तती रात्रंदिन । एकत्वे सकळांचा तो भाव पूर्ण । महाराजावरी जडलासे ।।५४।। या योगें ते सकळजन । मग तो हिंदु अथवा असो की यवन । साक्षेपें ते नाना पदार्थ आणून । सत्भावें महाराजा अर्पिती ।।५५।। महाराज ही तो सत्भावे देखुनी । घेऊनिया तात्काळ टाकित वाटुनी । पूर्ववत् मागुता मोकळे होऊनी । इच्छे परी ते जाती निघोनिया ।।५६।। आक्षेप घेतील श्रोतेजन । की महाराज कोठे जाती निघून । कोठे आहे ते त्यांचे सदन । वास्तव्य कोठे ते असेकीं ।।५७।। तरी आता ऐकावे

सावधान । ब्रह्मरूपी वृत्ती जयाची जाण । गेलीसे ती सकळ मिळून । लवण जळीं जैसेकां ।।५८।। मग तो सत् चित् आनंदरूप पूर्ण होऊन । विसरे आपणास आपण । ऐशी जहालिया मग त्या ठाव ठिकाण । कैशारीती शोधावे ।।५९।। देहभावाची जयाचा गेला । कासया पाहिजे सदन तयाला । याच रीती तो अन्य उपभोगाला । न जाणेचि सर्वथा ।।६०।। प्रारब्ध म्हणूनिया तो देह चाले । ये-हवी ते असती सदा मोकळे । सहजा सहजी ते डोले । वायुसवे जैसेकां ।।६१।। याचरीती महाराजांची वृत्ती । असूनिया ते अलिप्तपणे वर्तती । उपभोगादि ते सर्व त्यागती । गेल सहजचि एकदां ।।६२।। मना येईल तैसे वर्तावे । सहजासहजी मिळे ते खावे प्यावे । प्रसंग येईल त्या भाषेमाजी बोलावे । अव्दैतपणे ते सर्वदा ।।६३।। भाषा तरी त्या महाराजांप्रती । न कळे कवणाते त्यां येती किती । जो जो का भेटे जैशारीती । बोलती त्याप्रती तैसेची ।।६४।। किती एक विद्वान ते साक्षेपे येऊन । महाराजां भेटती आपण होऊन । नाना विषयी ती प्रश्नोत्तरे होता जाण । समाधान पावती सर्वही ।।६५।। महाराजांची ती विद्वता पाहून । आश्चर्य करिती सकळ जन । म्हणती नेणो इतुके अध्ययन । केव्हां कोठे केलेसे ।।६६।। परी शांतचित्ते कधी बैसून । कवणाशी ते केले नाही भाषण । भाषण केलिया ते गलिप्रदान । सहजा सहजी करिताती ।।६७।। निमिषमात्र वृत्ती ती नसे शांत । कधी कधी ते एकादाची सुटती पळत । देखूनिया ग्रामीचे लोक समस्त । पाठीलागती सर्वही ।।६८।। जयाची दृष्टी जैशारीती । महाराजा पहाती ते तैशारीती । सुजन तितुके नित्य बोलती । महापुरूष असे

कीं ।।६९।। दुर्जन तितुके कुचेष्टा करिती । वेडा पिसा हा बावळा म्हणती । पोरा बाळासि ते त्यापाठी लाविती । पीडा त्यां द्यावया कारणें ।।७०।। परि महाराजांची दृष्टी समसमान । एकरूप भासती त्यां सज्जन दुर्जन । मग सुख: दुखाचा तो भास म्हणून । होणे अशक्य सर्वथा ।।७१।। असो सुजन ते महाराजां भजती । अज्ञानी तितुके ते पीडा देती । महाराजा ते ती उभयतांची खंती । किंचित नसेची मानसी ।।७२।। श्रोतीं ऐकावे ते सावधान । करीन एक वृत्तांत ऐसाचि कथीन । जो का महाराजांचा सद्‌भक्त पूर्ण । प्रसिद्ध असेकी येथिचा ।।७३।। सद्‌भक्तामाजी जो अति विख्यात । औरंगाबादवासीचा प्रेमळ भक्त। जमीनदार घराणे ज्यासी समस्त । सान थोर जाणती ।।७४।। कूपामाजी ते असतां गोड जीवन । वरी काढिता ते तसेची जाण । तैसे घराण्यामाजी या सदाचारी पूर्ण । एकाहुनी एक जहालेसे ।।७५।। तेज: पुंज उगवता रविमंडळ । आकाश ते शोभे सहजचि सकळ । तैसे घराण्यामाजी राय मन्नुलाल । जन्मा आले सहजची ।।७६।। अंत:करणजयाचे सात्विक पूर्ण । पाठी सर्वदा त्या नारायण । उदया पावे जैसे का चंडकिरण । तैसा सुपुत्र उदरी आलासे ।।७७।। राय छोटेलाल त्या नामामिधान । ठेविले पित्यानें ते आदरेकरून । सर्वतो मुखी हे सर्वदा जाण । प्रसिद्ध नाम जहालेसे ।।७८।। प्रारब्धेची लाधली सुशील कांता ।। नानकदेवी नामे ती पतिव्रता । पतिसेवेमाजी जी दक्षता । ठेवी स्वांगेची सर्वदा ।।७९।। प्रपंची उभयता सावधान । नित्य करिती धर्माचरण । आतिथ्यादि सन्मानपूर्ण । स्वानंदेचि ठेविती ।।८०।। मागील पहावे ते अनुसंधान । जे जे का सत्भक्त असती महाराजा जाण । त्या माजी

रायसाहेब श्रद्धालू पूर्ण । अति सात्विक असे कीं ।।८१।। रायसाहेब जे आपण होऊन । महाराजाकार्यी ते सर्वदा लीन । दक्षता ती ठेऊनि समाधान । सेवेमाजी मानिति ।।८२।। समाधी कार्यादिक जे जहाले पूर्ण । रायसाहेबांचे त्यामाजी होते मन । सामर्थ्या ऐसे साह्य करून । सेवा ती नित्य केलीसे ।।८३।। लालखां नामें तो अधिकारी यवन । कूपावरी ताबा तो केलासे पूर्ण । ज्या वादामाजीं रायसाहेब होऊन । पडता यशस्वी जहालेसे ।।८४।। पतिपत्नीचे ते एकचित्त । संतभक्ती ती अंतरी सतत । तेथे वसता लक्ष्मीकांत । आश्चर्य नोहेचि सर्वथा ।।८५।। श्रीहरिची कृपा ती पूर्ण । वरी संत कृपेचे कोंदण । पुत्र जहालासे तो दैदिप्यमान । प्रारब्धेची श्रीमंता ।।८६।। कृष्णलीलेचा तो आठव म्हणून । किसनप्रसाद ते ठेविले नामाभिधान । कायदेपंडितामाजीं हा उत्तीर्ण । यथा समयीं जहालासे ।।८७।। व्यवसायीं ती दक्षता ठेऊन । पितृसेवेमाजी जो सर्वदा तल्लीन । पितृ आज्ञा ती वचनाप्रमाण । मानूनी वर्तत संसारी ।।८८।। पूर्वसुकृतसंचय म्हणून । सुशील लाधली ती कांता पूर्ण । सोनिदेवी ऐसें ते नामाभिधान । ठेविले जिये ते सकळीकीं ।।८९।। नित्य पतिसेवा परायण । राहूनि वर्ते रात्रंदिन । ईशकृपा ती जहालीसे म्हणून । सुपुत्र उदरी आलासे ।।९०।। ज्याचेनी कुळ प्रकाशित म्हणून । नाम ठेविले कुलभूषण । कुळीचा हा कुलदीप पूर्ण । आवडे समस्ता सहजची ।।९१।। असो यालागी सर्वथा जाण । असावे देवभक्तासी शरण । त्यायोगे इह परलोक कल्याण । होईल जाणा निश्चयें ।।९२।। अनेक ते सत्भावे महाराजांस । आपूले कार्यार्थ करिती नवस । पुढील अध्यायी ती

कथा सुरस । प्रसंगे येईल परियेसा ।।९३।। बाळकृष्णचरित्र हेचि उद्यान । तुम्ही यावे ही येथे सकळ सज्जन । चरित्रसुमनाचा मकरंद पूर्ण । सेवन करा की साक्षेपें ।।९४।। उद्यानी जी जी कां पुष्पे विखरून । पडलीसी तितुकी घेऊन वेचून । प्रेमतंतूमाजीं त्यां गोऊन । अर्पण तुम्हासी करीन मी ।।९५।। परि तो बुद्धिदाता नारायण । सूमनहार हा त्याचा तोचि गोविन । वासूदेव हा त्यासी निमित्त जाण । जाणा निश्चये व्यर्थची ।।९६।।

इ. श्री. बा. कृ. कथामृतसार । षष्टामोध्याय: । श्रीकृष्णार्पणमस्तु ।।६।।

हरयेनम: ।

**।। श्री ।।**

## अध्याय ७ वा

श्री गणेशाय नमः । जयजयाजी लक्ष्मीरमणा । आदिपुरूषा । नारायणा । अर्जुनसखया मधुसूदना । कंस कंदना कंसा रे ।।१।। तूं ब्रम्हांडचालक जगत्पती । तुझा अंत न लागे कवणाप्रती । मायायोगे ती उत्पती आणि स्थिती । लया तूं नेसी गा श्रीहरी ।।२।। ऐसे असूनिया अकर्ता म्हणविसी । ब्रम्हांडनायका ऋषीकेशी । हा तव मायेचा गोंधळ कवणांसी । काहीं केलिया नुमजेचि ।।३।। तव माया ही अति अनिवार । असत्या भासवी सत्य प्रकार । जेवि स्वप्नीचे जेका अवडंबर । असत्यची सत्य वाटे कीं ।।४।। तुज एक जाणती संतभक्त । जेकां तुजपासोनी नसति विभक्त । चराचर हे जग समस्त । तुझ्याच रूपी पहाती जे ।।५।। तुजविण सर्वचि पदार्थ । ते न जाणती कदा किंचित । याकारणे ती दृष्टी समान मानिती । दुजाभाव तो किंचित जगत्पती । अंतरी ज्यांच्या नसेची ।।७।। संत भक्ताचे ते मन । तुझे रूपीं गेलेसे विरोन । जेवी जीवनामाजी ते घालिता लवण । अभिन्नपण ये त्या सहजची ।।८।। ऐशी जहालिया जयाची वृत्ती । माया मोहादि ते त्यां न बाधती । संतभक्त जेव्हा सुखी दिसती । कारण त्या हेचि असेकीं ।।९।। असो ऐसे जे कां संतभक्त जाण । त्यालागी तूं अवतार घेसी नारायण । कष्ट सोसिशी दारूण । स्वइच्छेचि आपुल्या ।।१०।। तयाचा योगक्षेम तो सर्वची जाण । नित्य चालविसी तू आपण होऊन । आणिक तयाचे ते सत्य वचन । करावया पाठी राखिसी ।।११।।

भक्त कथा त्यां तूज आवडती । नित्य तिष्ठतोसी त्याकारणे तू रमापती । यापरी शास्त्रादिक ते ग्वाही देती । स्पष्टोत्तराची सर्वदा ।।१२।। कोठे काही किंचित जाण । न घडे की श्रीहरी तुजवाचून । ऐसा तूं श्रेष्ठ जगज्जीवन । संताधीन जहालाशी ।।१३।। संत कथा त्या अनिर्वाच्य गहन । परि वदवितां तूं नारायण । माझ्या निमित्येची पुढे येथून । ग्रंथ बोलवी दयाळा ।।१४।। गताध्यायीचे ते कथन । महाराजांची दृष्टी ती समसमान । विवर्तरूप हे जग संपूर्ण । आन त्या किंचित दिसेना ।।१५।। महाराज ते रात्रंदिन । नित्य फेऱ्या त्या करिती ग्रामांतून । परि त्यांचे ते ठिकाण म्हणून । निश्चित कोठेही नसेची ।।१६।। परि किती एक ती ठिकाणे ऐसी असती । किं महाराज त्या ठायीं होऊनी जाती । श्रोतीं ऐकावे ते सावधान चित्ती । नामाभिधानें ती त्यांची ।।१७।। श्रीनिवास नामेकरून । सतभक्त असे कीं एक ब्राम्हण । महाराजांवरी श्रद्धा पूर्ण । सत्य सर्वदा असेकीं ।।१८।। आपुले सदनीं पृथकची जाण । एक जागा ती ठेविलीसे राखून । तेथे करूनिया ठेविले उत्तम आसन । वसनादि तैसेचि सर्वही ।।१९।। त्याठायीं महाराजाविण । कोणीही ते न जावे म्हणून । दक्ष असेकी हा ब्राम्हण । मनापासूनि सर्वदा ।।२०।। त्रिकाळज्ञानी महाराज पूर्ण । द्विजाचे जाणुनी ते अंत:करण । नित्य तो फेरा आपण होऊन । सदनी तयाच्या करिताती ।।२१।। याचपरी ते दुजे ठिकाण । पाणदरींब्या माजी ते प्रसिद्ध दुकान । अप्पा हलवाई या नामें करून । मालक तेथिचा असेकीं ।।२२।। आप्पाचे तें ओळखूनि मन । महाराज बैसती दुकानी येऊन । महाराज पाहताची आप्पाचे मन । आनंदित होय सर्वदा ।।२३।। साध्वी गेंदाबाईचे

सदन । सराफ्यामाजीं ते असे जाण । श्रोती जाणावें हे तिसरे ठिकाण । महाराजालागीं असेची ।।२४।। राजाबाजारी ते जाण । चवथे हे महाराजांचे ठिकाण । पाराजी नामें भक्त पूर्ण । महाराजांचा असे कीं ।।२५।। महाराजातें देखतांची नयनीं । आनंद न समायेची त्याचिये मनी । धाऊनिया ठेवी तो मस्तक चरणीं । महाराजांच्या प्रीतीने ।।२६।। परस्पर दृष्टादृष्ट होता पाही । कडकडून भेटती एकमेकाही । मग शांतचित्ते निजगुज सर्वही । येरायेरा बोलती स्वानंदे ।।२७।। महाराज ते कवणाशीच ऐशारीती । सरळरीत्या कधीही न जे बोलती । उभयतांचा तो ऋणानुबंध कवणाप्रती । न कळे काय तो असेचि ।।२८।। इतराते महाराज वेडेपिसे दिसती । तैसे नोव्हेचि पाराजीप्रती । देवबाप्पा हे आहेत ऐशाच रीती । हाकारूनिया सांगे तो समस्तां ।।२९।। पाराजीचा तो भाव पूर्ण । महाराज आज्ञा ती शिरींलागून । देई मिठाई ती आताचि करून । निजकरेंची आपुल्या ।।३१।। महाराज आज्ञा ती शिरी वंदून । मिठाईचे मग ते काढले दुकान । त्यांमाजीच ती भरभराट होऊन । सुखी तो सर्वदा जहालासे ।।३२।। माळी हा । असुनी जातीचा । व्यवसाय करी तो हलवायाचा । निका भक्त हा महाराजांचा । म्हणूनि प्रसिद्ध असेकी ।।३३।। जरी कारणपरत्वें महाराजांप्रती । गाठू म्हणूनि कीतीएक यत्न करिती । परि ते एका पाराजीवाचुनी निश्चिती । हाता न येती कवणाच्या ।।३४।। भलत्याही वेळी जरी कां पाराजीलागून । वर्तमान विचारले कीं ते महाराज कोठे म्हणून । तरी अचूक सांगे तो ठाव ठिकाण । ज्या ठायीं महाराज असती कीं ।।३५।। जैसे कां पाराजी लागून । महाराज जाती त्यां नित्य सांगून । आणिक ते

आपूले ठाव ठिकाण । सांगुनिया जाताती ।।३६।। तरी ऐकावे सावधान । महाराज हे स्वैरवृत्तीचे पूर्ण । कासाया सांगतील ते येऊन । कवण कारण त्या सांगाया ।।३७।। मग पाराजीस ते ठाव ठिकाण । महाराजांचे कळावया काय कारण । तरी हे संतभक्ताचे महिमान । जाणे एक श्रीहरी ।।३८।। असो महाराज अंतरज्ञानी पूर्ण । निजभक्ताचे करावया सत्यवचन । तो जे जे कां सांगे ठाव ठिकाण । महाराज राहती तेथेचि ।।३९।। परी महाराजांची ती निस्पृह वृत्ती । विदेहीपणे ते सदा वर्तती कवणाचेही काही जे कधी न ऐकती । न सांडती मार्ग तो आपुला ।।४०।। सत्भावे जरी कोणी काही अर्पिले । तरी ते तात्काळ वाटूनि होती मोकळे । मागुता फिरती उपाधिवेगळे । निज छंदेचि आपुल्या ।।४१।। कोठेही महाराज शांत चित्ते बैसले । ऐसे कोणी देखिले ना ऐकले । किं निशीमाजी ते शांत निजले । पाहिले नाही कधीही ।।४२।। आक्षेप घेतील श्रोतेजन । कीं कैसे हे महाराजांचे वर्तन । नाही कोठे ते ठाव ठिकाण । उपाधि किंचित नसेची ।।४३।। तरी ऐकावे आता सावधान । निस्पृह ते महाराजांचे मन । अशाश्वत हे सर्वची म्हणून । पाठी न लागती तयाच्या ।।४४।। वासनेचे बीज ते संपूर्ण । केव्हाच गेले ते सर्व जळून । निरिच्छ सर्वदा महाराजांचे मन । होऊनिया वर्तती तैसेचि ।।४५।। जेणें ओळखिला नारायण । उंच नीच नेणेचि त्याचे मन । वर्णाश्रम धर्मादि कृत्यें पूर्ण । त्याची ती जाती लयाते ।।४६।। सुखदु:खादि तो नेणेची जाण । तैसेची न कळे त्यां मानापमान । जग हे सर्वचि मिथ्या म्हणून । पाठी न लागे तो तयीच्या ।।४७।। ऐशी जहालिया जयाची वृत्ति । मग कासया पाहीजे त्यां धनसंपति । धनसंपति

तो आपुले चित्ती । मृत्तिकासम मानी सर्वदा ।।४८।। महाराजांची ती वृत्ति जाण । ऐशाच रीती ती जहालीसे म्हणून । कोठे नाही केला तो मठ स्थापन । किं शिष्य समुदाय तो तैसाची ।।४९।। विपरीत वाटे हे समस्तासी । वेडा पिसाचि म्हणती महाराजांसि । असुनिया महाराज ज्ञानराशी । अज्ञानी ते वाटती समस्तां ।।५०।। ऐसे व्हावया काय कारण । ते एक असे की आपुले मन । जैसे जयाचे असे अंत:करण । तैसे त्यां सहज भासेची ।।५१।। पुराणप्रसिद्ध यासी प्रमाण । पंडूनंदन तो धर्मात्मा धर्म पुर्ण । सभेमाजी त्यां घुंडिता दुर्जन । न मिळेची कदा तो कल्पांती ।।५२।। तेचि सभा दुर्योधनाशी दाखवितां । सज्जन तो न मिळे अट्टाहसे पहातां । याच रीती महाराज ते समस्तां । अज्ञानी दिसती सहजचि ।।५३।। प्रारब्धेचि नरदेहा येऊनी करावे सार्थक । विवेकें ओळखावा ब्रम्हांडनायक । नाही तरी त्यां जन्ममरण पंक्ती अनेक । न चुकती कल्पांती ।।५५।। असो जे कां अज्ञानी जन । अज्ञानीच म्हणती महाराजांलागून । सज्ञानी ते महाराजां ओळखून । धन्यवाद महाराजां देताति ।।५६।। महाराजांलागी ते समसमान । नोळखती ते सज्जन किं दुर्जन । आपुला तो पथ आणि होऊनि । मुलें ती सर्वची थोरसान । पाठीं लागती तयांच्या ।।५८।। किती एक किंकाळ्या ठोकिती । महाराजातें बळे हाकारीती । तों कितीएक ते घेऊनि खडे माती । महाराजावरी फेकिती ।।५९।। परी त्याची महाराजां खंत म्हणून । नसेचि कैशी ती किंचीत जाण । मार्गक्रमितां ते मागे परतोन । कधी कधी पाहती ।।६०।। तो बाळसमुदाय पाहून । आनंद वाटे महाराजां लागून । धन्य म्हणती हा जगज्जीवन । कैश्यारीती

नटलासे ।।६१।। महाराज मागें परतोन पाहता । मुले ती जागची थांबती तत्वतां । येरयेराशीं ते म्हणती आता । पळ काढारे येथुनी ।।६२।। भयभित होऊनी बालक । पळता ते पडती किती एक । तो महाराज गद्‌गदा हासती देख । पाहूनि प्रकार या रीती ।।६३।। मागुता तयासि हाकां मारिती । यारे यारे ऐसे ते सकळां म्हणती । हस्त संकेते त्यां बोलाविती । पळत सुटती सवेची ।।६४।। यापरी तो महाराजांचा स्वर । ऐकूनी मुले ती सानथोर । महाराजापाठी ती धावती सत्वर । सैरावैरा सहजची ।।६५।। मग महाराज पेठेमाजीं शिरती । मिठाईच्या त्या दुकाना जाती । बाळा समुदाया ते हाकारिती । यारे यारे म्हणोनिया ।।६६।। बालकांच्या मनीं तो उल्हास पुर्ण । त्या माजीं महाराज बोलाविती आपण होऊन । तेथे बाळ समुदाय होता विस्तीर्ण । नवल किंचित नसेची ।।६७।। इच्छेपरी ज्या दुकानांतून । महाराज स्वकरें ती मिठाई घेऊन । वाटिती सकळाशीं ती बाहेर आणून । निज करेचि आपुल्या ।।६८।। जोवरी जहालीसे न दिसे तृप्ती । तोवरी मागुता महाराज वाटिती । सकळासि ते घ्या घ्या म्हणती । इच्छेपरी ते आपुल्या ।।६९।। सकळासि पाहूनी तृप्त पूर्ण । आनंद होतसे महाराजां लागून । मग मागुती करिती पलायन । इच्छेपरी ते आपुल्या ।।७०।। यापरी अनेक दुकानावरती । नित्य ते महाराज येती जाती । पाहिजे ती वस्तु निजकरे घेती । देऊनी टाकिती आणिकां ।।७१।। आणिक सकळ वस्तु त्या घेऊन । अस्ताविस्त टाकिती महाराज करून । तैसेचि निघतां कुशब्दें ताडण । मालका करिती ते तेथिच्या ।।७२।। परी कोणेही व्यवहारी तो पुढे होऊन । महाराजा न देचि कधी दूषण । शब्द

तैसाची एकही म्हणून । न बोलेचि महाराजां ।।७३।। महाराजांचे ऐकुनी यापरी वर्तन । साशंकित होतील श्रोते जाण । किं इतुका त्रास तो व्यवहारी जन । कासयां सहन करिताती ।।७४।। तरी ऐकावे आता सावधान । संत भक्तांचा तो कैवारी रूक्मिणीरमण । पाठीराखेची न सांगता आपण होऊन । भक्तमहिमा तो ऐसा असेचि ।।७५।। ज्या दुकानी जहालीसे महाराजांची फेरी । सायंकाळी तो हिशोब पहाती व्यवहारी । शिल्लक मिळविता ती निर्धारी । द्विगुणित होय सर्वदा ।।७६।। यापरी देखुनी हर्षभरित । व्यवहारी ते होताती सतत । धन्य म्हणती महाराजांचा हस्त । स्पर्शतां ऐसे हे घडेची ।।७७।। ऐसा अनुभव आला असे ज्यालागूनी । साक्षेपे वाट ते पहाती प्रतिदिनीं । किं महाराज ते यावे आमूचे दुकानीं । अंतरी इच्छिती सर्वदा ।।७८।। ज्या पेठी महाराजांची वार्ता । आले म्हणूनी कळेकी समस्तां । तो सांडूनी व्यवहार सर्वची तत्वतां । तात्काळ मार्गी येतसे ।।७९।। तों एकचि होतसे गोंधळ । महाराजापाठी ते बाळगोपाळ । पहावया ते धावती सकळ । सोहळा सहजची तेथिचा ।।८०।। जो तो इच्छी आपुले मनीं । किं महाराज ते यावे माझिये दुकानीं । दुर्जन जे कां परस्परांलागुनी । काय वचन बोलती ।।८१।। म्हणती हो कोणत्या दुकानाला । जाऊनि पडेल हा आजिचा घाला । पुढे होऊनिया ते पाहू चला । मौज क्षणभरी आताचि ।।८२।। यापरि परस्परांमाजी बोलून । महाराजांपाठी ते धावती दुर्जन । इकडे व्यवहारी ते कर जोडून । महाराजांलागी ठाकती ।।८३।। परि महाराज ते मार्ग लक्षून । इच्छेपरी ते जाती निघोन । व्यवहारी ते निराश होऊन । ठायीच्या ठायीं बैसती ।।८४।।

जरी कां कोणी म्हणता आपुलें मनीं । किं प्रयत्ने आणू महाराजां दुकानीं । तरी प्रयत्न करणें हे व्यर्थ म्हणूनी । अनुभवा आलेसे समस्तां ।।८५।। लहर आलिया महाराजांलागून । मग जाती ते दुकानीं आपण होऊन । स्वेच्छाचारी ते सदावर्तन । महाराजांचे असेकी ।।८६।। महाराजांची दृष्टी समसमान । कोणीही न दिसे थोर सान । जो कां दुकानें मार्गावरून । दिसता ते तेथेचि बैसती ।।८८।। वाणियांचे दुकानीं शिरतां । नारळादि वस्तु जे कां येतील हातां । कोणाशी ही हाका मारूनी तत्वतां । घ्या घ्या म्हणूनि फेकिती ।।८९।। असो ज्या ज्या का जाती दुकानास । तेथील जी कां वस्तु ये हातास । उचलोनिया ती अनेकास । देऊनि टाकिती तात्काळ ।।९०।। परी जेथे महाराजांचा हस्त लागला । तेथे द्विगुणित लाभ होय त्याला । या मार्गे ते सकळ जनांला । विस्मय वाटे तो सहजची ।।९१।। देह हा प्रारब्धा आधीन म्हणूनि सुखदु:खादिका ते समान । मानुनी वर्तती रात्रंदिन । महाराज अंमरी सर्वदा ।।९२।। विकार तितुके देहाप्रती । आत्मा तो सच्चिदानंदरूप निश्चिती । कटु आम्लादि पदार्थ तीक्ष्ण । एकसरेची असे ते महाराजांलागून । अन्य भाव तो नसेची ।।९४।। शीतउष्णादि काळातून । दिगंबर मूर्ती ही महाराजांची जाण । नसे किंचित जवळी आसन वसन । उपाधि सर्वथा नसेचि ।।९५।। आण्णासाहेब नामे गृहस्थ जाण । नाथ संस्थानी जे कां कारभारी पूर्ण । प्रसंगेची औरंगाबाद येथे येऊन । निजकार्यार्थ राहिले ।।९६।। तो प्रात:काळी एके दिनी । महाराज फिरत देखिले नयनीं । थंडी ते कडाक्याची त्या दिनीं । ऋतुमानेचि पडलीसे ।।९७।। इतुके शीत कडाक्याचे असुन ।

महाराज फिरती वस्त्राविण । मुखे बोलती पाजी हे थंडी जाण । पाहु आताचि कैसी हे ।।९८।। यापरी स्वयेचि बोलूनी आपण । अण्णाचे ते धूतवस्त्र घेऊन । शीतजीवनी ते तत्काळ भिजऊन । अंगावरी घेतलेसे तैसेचि ।।९९।। यापरी ते एक प्रहर पर्यंत । महाराज बैसले ते ऐश्या स्थितीत । स्वमुखे तो रूद्र त्वरित । म्हणू लागलेचि स्वानंदे ।।१००।। मागुतां वस्त्र ते दिले झुगारून । पळताची सुटले त्या बिंदीतून । अण्णालागी ये या रीती पाहून । आश्चर्य वाटले सहजची ।।१०१।। उष्णकाळींही ऐशा रीती । अनवाणी ते स्वानंदेची फिरती । कोणी वसनादि वस्तु दिधल्या घेती । परी ते देऊनि टाकिती आणिकां ।।१०२।। रस विषयांमाजी ते याच रीती । कटु आम्लादि ते नेणूनी चित्तीं । प्रसंगापरी ते तैशाच रीती । ग्रहण करीती स्वानंदे ।।१०३।। किती एक ते अट्टाहासे दुर्जन । कटू कारले ते साक्षेपे रांधून । ठेवती महाराजांपुढे आणून । भक्षा भक्षा म्हणताती ।।१०४।। परिसताची ऐसे दुष्ट वचन । महाराज ते तात्काळ करिती ग्रहण । शब्द न ठेविती त्यालागून । निघोनि जाती सेवेची ।।१०५।। देखुनिया प्रकार तो ऐशा रीती । दुर्जन तितुके लज्जित होती । पश्चात्तापेंची मग येरयेरां म्हणती । धन्यवाद देती ते महाराजां ।।१०६।। एकदां तो ऐसाची एक यवन । पदरीं ती तंबाखू दीडपाव बांधून । दुकानीं असतां महाराज येऊन । पुसती काय हे त्यां साक्षेपें ।।१०७।। थट्टेचि तो महाराजांप्रती । म्हणे खावया देऊ का ही तुम्हाप्रती । परि सर्वची खावी लागेल निश्चिती । साक्षी ठेऊनिया ते समस्तां ।।१०८।। होकार मिळताची महाराजांकडून । तंबाखू ती ठेविला यवने सोडऊन । महाराज ती घेती पुढे ओढून ।

भक्षिती एकदाची सर्वही ।।१०९।। चमत्कार पाहुनी ऐशा रीती । ओशाळूनिया तो यवन चित्तीं । पश्चात्तापेची खेद निश्चिती । करू लागला सहजची ।।११०।। याच परी ते पुढे दिनीं । महाराज चालिले बिंदीतुनी । तोंची एक दुर्बुद्धि पुढे सरसाऊनी । महाराजा बोलत साक्षेपें ।।१११।। म्हणे हो महाराज हटी जाऊनि । ओल्या मिरच्या त्या आलो घेऊनी । तुम्हां खावया त्या द्याव्या म्हणुनी । तिष्ठत ऐसा मी येथेचि ।।११२।। बोलूनी ऐशा रीती जाण । मिरच्या त्या ठेविल्या पुढे आणून । महाराज ही त्या न देता प्रतिवचन । खाऊनिया टाकती सर्वची ।।११३।। दुर्बुद्धि तो ऐसे देखताची सकळ । बडऊनिया घेत आपुले वक्षस्थळ । गहींवरूनी बोले हा संतछळ । कारण नसतां मी केलासे ।।११४।। असो या परी जेजे का महाराजा छळिती । ते ते तात्काळ पश्चात्ताप पावती । शुद्ध मनेंची मग महाराजांवरती । प्रेम करिती सर्वदा ।।११५।। पुढे सर्वचि यातींतून । महाराजांचा होतसे कीं सन्मान । श्रद्धा ती सकळांची पूर्ण । महाराजांवरी जडलीसे ।।११६।। याच कालीं श्रेष्ठ अधिकारी जाण । श्रद्धाळू असे की जातीचा यवन । मुक्तदरजंग सुभेदार म्हणून । होऊनि गेलासे येथिचा ।।११७।। महाराजांवरी ती श्रद्धा पूर्ण । सुभेदाराची असे की मनापासून । नित्य महाराजा साक्षेपे भेटून । लीन असे की सर्वदा ।।११८।। महाराज जे जे कां बोलती वचन । ते ते मानी तो आज्ञा प्रमाण । नित्य महाराजांसी सन्मानून । निज गृहासि नेतसे ।।११९।। महाराजही तो सत्भाव जाणून । गृहांसि जाती आपण होऊन । देखताची महाराजा आनंद पूर्ण । सुभेदाराप्रती होतसे ।।१२०।। सुभेदाराचे इच्छी मन । कि

महाराजा ते काहींसे वेतन । करूनि द्यावे ते सरकारातून । आपण होऊन साक्षेपें ।।१२१।। परि महाराजांचे निरिच्छ मन । देखुनिया तैसे ते स्वैर वर्तन । विरक्तता तैसी ती सुभेदार पूर्ण । पाहुनी स्तब्धचि जहालासे ।।१२२।। मग समस्त नगरवासियाची जाण । आज्ञा करी कीं सुभेदार रोखून । कि महाराजांचे करितां कोणी छळण । शासन करूचि त्या निश्चये ।।१२३।। जरी का महाराज कोण्याही दुकानास । जाउनिया करितील नासधूस । तरी त्याही येऊनिया आम्हास । समाचार सर्वही सांगावा ।।१२४।। आम्ही ते स्वयेची पाहुनी त्वरित । भरपाई ती करू समस्त । चिंता न करावी कीं कोणी किंचित । परि शब्द न द्यावा की महाराजां ।।१२५।। असो औरंगाबादवासी । सानथोर । महाराजांच्या भजनी निरंतर । लागुनी वर्णिती गुण साचार । नित्य महाराजांचे सर्वही ।।१२६।। महाराजांचे स्वेच्छाचारी वर्तन । उपाधिपासूनि जे कां अलिप्त पूर्ण । नेणूनिया ते थोरसान । एकसरेची वर्तती ।।१२७।। असो अनुभव येताची सकळांस । भजू लागले ते महाराजांस । पुढील अध्यायी कथा सुरस । येईल सावधान परियेसा ।।१२८।। कथामृत हेचि अमृतसरिता । वासुदेव प्रार्थी श्रोतयां समस्ता । तुम्ही होऊनि सुरगण आता । सेवनालागी बैसावे ।।१२९।।

**इ. श्री. बा. कथामृत सप्तमोध्याय: । श्रीकृष्णार्पणमस्तु ।।७।।**

**हरयेनम: ।**

॥ श्री ॥

## अध्याय ८ वा

श्री गणेशाय नमः । जयजयाजी पुराणपुरूषा । कमलपत्राक्षा कमलाधीशा । कमललोचना ऋषीकेशा । सुरमर्दना कंसारे ॥१॥ तव लीला त्या असती गहन । मर्म न कळेची ब्रम्हादिका लागून । परि मर्म जे कां असे ते सत्भक्तावाचून । न कळेची आणिका कल्पांति ॥२॥ सत्भक्त ते तुज जाणती । किं सत्भक्तां तैसा तूं रमापती । परस्परामाजी तो भाव निश्चिती । अद्वैत सर्वदा असे की ॥३॥ सत्भक्त सांगती हाकारून । किं अवघा असे हा नारायण । यालागी जग संपूर्ण । तुझिया रूपेच देखती ॥४॥ परि नायकती अज्ञानी जन । वेडा पिसा ते म्हणती सत्भक्ता लागून । अज्ञानडोहीं ते आपण बुडून । आणिक बुडविती सहजची ॥५॥ यालागी ते सावधान । असावे कीं रात्रंदिन । नरदेहाचे ते महत्व पूर्ण । विचारेची जाणावे ॥६॥ सत्य विवेक नसता चित्तीं । दर्शन न घडेच कदा कल्पांती । विवेकाविण ती तुझी प्राप्ती । न घडेची सर्वथा ॥७॥ जोवरी नाही ती तुझी प्राप्ती । तोवरी सार्थक नोव्हेची गा श्रीपती । आणिक त्या जन्ममरण पंक्ति । सर्वथाही चुकेना ॥८॥ यालागी संत समागमाची व्हावी प्राप्ती । मग तूं हाता येसी की रमापती । मागुतां ते आत्मादर्शन निश्तिती । सहजची होय सर्वाते ॥९॥ याच रीती ते रात्रंदिन । औरंगाबादवासी सकळ जन । विचारेचि महाराजा ओळखून । भजनी लागले ते सहजचि ॥१०॥ गताध्यायीचे कथन । इतुकेची जहालेसे निरूपण । पुढे ते सर्वच भजती महाराजांलागून । संबंध

यातीचा नसेची ।।११।। महाराजांची ते विदेहस्थिती । सुखदु:खादि जे कां समान मानिती । नित्यनेमें ते ऐशा रीती । निजछंदेची वर्तती ।।१२।। कोणीही भेटता महाराजांलागून । सरळ रीत्या त्यां न करीती कधी भाषण । किती एका ते गालिप्रदान । करिती कारण त्या नसताची ।।१३।। ज्यालागीं महाराज कुशब्दे ताडिती । त्याचा कार्यभाग होय निश्चिती । तैसेचि ताडिता रोगियाप्रती । निरोगी तो होयची तत्काळ ।।१४।। महाराजांचे हे कर्म सतत । दुर्जना वाटे की विपरीत । परी अनुभव तो येथीचा गुह्यार्थ । सत्भक्तचि एक जाणती ।।१५।। तांबूल खावयाची ती रीती । महाराजांची सांगेन तुम्हांप्रती । जितुके कां पदार्थ त्या ठायी असती । तितुके ते घेती स्वहस्ते ।।१६।। सुपारी लवंगादिकरूनी पदार्थ । तंबाखू तपकीरादि वस्तू समस्त । जायफळादि एलची आणि कात । मेळविती सर्वची एकदां ।।१७।। स्तोत्र गातची तो तांबूल कुटुनी । समस्तां खावया देती वाटूनि । परी विकार कैसा तो कवणा म्हणऊनि । ते निरोगी होऊनिया अहर्निशी । अक्षय सुख पावले ।।१९।। ज्यां कोणा जे जे सांगती । तैसीच ये की तया प्रचीती । यायोगे सकळांची ती भक्ती । महाराजांवरी जडलीसे ।।२०।। असो याच काळीं ते दुजे संत । यवन यातीं माजी ते विख्यात । बनेमिया नामे ज्या जाणती समस्त । वासही ज्यांचा तो येथेचि ।।२१।। महाराजा ऐशीच ती पिशाच्चवृत्ती । ठेऊनिया मग ते तैसेची वर्तती । अंतरज्ञानी हे उभयतां असती । परी न दाविती ते आणिका ।।२२।। महाराज ते बनेमियालागून । नित्य भेटावया येती आपण होऊन । परस्पर देखताची तात्काळ धाऊन । येरयेरालागीं ते भेटती ।।२३।। भेटताचि

उभयतां ऐशारीतीं । कितीएकवेळ ते हास्यचि करिती । प्रेमाश्रु ते नेत्रांतून वहाती । बोलती निज गुज ते मागुतां ।।२४।। परी ज्या भाषेमाजी ते बोल बोलती । न कळे भाषा ती कवणाप्रती । पिशुन तितुके टवाळी करिती । विपरीत देखूनिया सहजची ।।२५।। सज्जन जितुके कां असती । अट्टाहासे दर्शनालागी येती । प्रेमे वंदुनिया उभयतां प्रती । मागुता स्वगृहा जाताति ।।२६।। इच्छेनुसार महाराज तेथून । पळतची सुटती न लागता क्षण । स्वैरवृत्ती ती या परी ठेऊन । भ्रमण करिताति । सर्वदा ।।२७।। चौकामाजी प्रसिद्ध दुकान । कापड बाजारीं ते असती तीन । काशीराम आणि रामाजी बजाज म्हणून । इच्छेपरी ते महाराज येऊनि । कोठेही मग ते वैसती ।।२९।। या तिन्हीही दुकानातून । महाराजा जेकां पाहीजे वस्त्र म्हणून । स्वकरेची घेती तें उचलून । देऊनि टाकिती आणिकां ।।३०।। या परी ती वस्त्राची दिडे किती । घेऊनिया मार्गी ते भिरकाविती । घ्यावे घ्यावे म्हणून ओरड करिती । निज छंदेची आपुल्या ।।३१।। देखुनिया ऐसे विपरीत । कोणी न म्हणती कांही किंचित । व्यवहारी ते जोडूनी हस्त । ठाकती तेथे तैसेची ।।३२।। मग जेव्हां कां महाराज आपण होऊन । इच्छेपरी त्या निघती तेथून । व्यवहारी मागतां दुकानी जाऊन । शांत चित्तेचि बैसती ।।३३।। परिसुनिया ऐसे वचन । साशंकित होती श्रोतेजन । शांत चित्ते ते व्यवहारी बैसून । काम कैशा रीती करिताती ।।३४।। तरी ऐकावे आता सावधान । संत भक्ताची पाठी तो रूक्मिणीरमण । राखी सर्वदा आपण होऊन । सांडूनि थोरपण आपुले ।।३५।। सिंहावलोकन करून । मागील पहावेजी अनुसंधान । कि ज्या दुकानीं जाती महाराज

आपणहोऊन । द्विगुणित लाभ होय तयाते ।।३६।। विरक्त ते महाराजांचे मन । हेम मृत्तिका ती वाटे समान । जनी भरलासे जनार्दन । आन त्या किंचित भासेना ।।३७।। ऐशी वृत्ति जहालिया जाण । मग त्यां विवर्तरूप जग संपूर्ण । आपपर कैसे ते त्यालागून । न कळेची सर्वथा ।।३८।। यापरी जे कां असती संत । तेथे वसे तो रूक्मिणीकांत । उणे पडो नेदी कोठे किंचित । भक्तालागी ते आपुल्या ।।३९।। मग व्यवहारी याची भरपायी करितां । संकट नसेचि त्या लक्ष्मीकांता । तयासी तो द्विगुणित लाभ होता । मग चिंता ती कासया करतील ।।४०।। असो किंचितही उपाधीवाचून । महाराज हिंडती ग्रामांतून । शीतउष्णादि काहीच नेणून । स्वानंदेची वर्तती ।।।४१।। कधी ती मध्यरात्र होताचि जाण । महाराज ओरडती शहरांतून । हाकारूनि सांगती की सावधान । अंतरी सर्वदा असा की ।।४२।। दो अर्थि हे महाराजांचे बोल । ऐकूनि घेती जन जे सकळ । परि सत्यभाव नेणूनि सर्वची खळ । दोष देती की महाराजां ।।४३।। महाराजही वेडे चाळे करिती । पिसा बावळा ते म्हणऊनि घेती । कुटिल ते पाहूनि दोष देती । परी खंत ती नसेचि महाराजां ।।४४।। कधी कधी ते जीर्णवस्त्र फाडून । चिंधीलागी ते गळा घालून । जानवे हे म्हणती आम्हांलागून । समस्तांलागी ते दाविती ।।४५।। महाराजांचे ते ऐसे वर्तन । पाहूनी हासती कुटिल जन । सज्जन अथवा दुर्जन । कल्पांती ही कळेना ।।४७।। ऐसे जहालिया एकदा मन । मग कोठे पाहावे ते कर्माचरण । आणिक तैसे ते संध्यास्नान । शुद्धाचरण तैसेची ।।४८।। सकाम कर्मे जे कां करिती । त्यालागी ते नावडे ऐशी स्थिती । नित्य

नवा तो अभिमान चित्तीं । उठे तयांच्या सहजची ।।४९।। अभिमानडोहीं जो कां बंडाला । सत्यासत्य न कळे काही त्याला । दोष देता तो महाराजाला । नवल किंचित नसेचि ।।५०।। अविद्यात्मक ते कर्म जाण । कर्म करितां उपजे तो अभिमान । अभिमानेचि नाश संपूर्ण । शास्त्रीं बोलिला असे कीं ।।५१।। प्रारब्धेची नरदेहा येऊन । ओळखावा तो रूक्मिणीरमण । त्याविण आणिक ते शास्त्रादि पठण । करूनिया सार्थक नोहेची ।।५२।। अभिमान उपजे की जयाचे अंतरी । त्यासी तो दुरावलासे श्रीहरि । परस्परे हा विरोध निर्धारी । दिवस रजनी जैसेकां ।।५३।। त्यालागी ते राखावे सावधपण । निष्कामरीत्याचि ते कर्माचरण । करितां नुपजेचि तो अभिमान । मानसी किंचित कवणाच्या ।।५४।। ऐशिया रीती तो मुळीहून । सर्वचि सांडावा अभिमान । त्या योगेची मग ते विरक्तपण । ठसेल अंगी सहजची ।।५५।। ज्या अंगी बाणलीसे पूर्ण विरक्ति । दुरी नसेची त्या रूक्मिणीपति । योगक्षेम तो तयाचा निश्चिती । चालवी निजांगेचि श्रीहरी ।।५६।। आपपर ते नेणेचि त्या मन । सर्व भरलासे तो नारायण । आपणासी पहातां तो आपण । आन त्या कल्पांती दिसेना ।।५७।। अंतरबाह्य तो त्यासी जाण । सत् चित् आनंदरूप दिसे पूर्ण । कासया पाहिजे मग त्या कर्माचरण । कारण त्या किंचित नसेची ।।५८।। ऐशीच ते महाराजांची स्थिती । म्हणुनिया अद्वैतपणे सदा वर्तती । अशाश्वत हे सर्वचि जाणुनी चित्तीं । अलिप्त असती की सर्वदा ।।५९।। ब्रम्हमय महाराजांची वृत्ती । म्हणूनिया ते भक्त म्हणविती । देवाहूनि जे कां विभक्त नसती । भक्त तेचि असती की निश्चयें ।।६०।। भक्त जे जे कां बोलती बोल । ते ते

सत्यची होय तात्काळ । देव भक्ताचे ते अभिन्नत्व सकळ । हेचि कारण त्या असेकीं ।।६१।। ऐशिया परी ते सहजरीती । महाराज काहीही कवणाते बोलती । बोलापरी ती येता आत्मप्रचीती । विस्मय वाटेचि समस्तां ।।६२।। महाराज जे जे कां लोकां बोलिले । ते ते तयासि अनुभवा आले । किती एक पुढे ते भजनी लागले । महाराजांच्या सहजची ।।६३।। ऐशिया रीती ते महाराजांचे भक्त । होऊनि इच्छिती सेवा सतत । परि महाराज असती सर्वदा अलिप्त । हाता न येती कवणाच्या ।।६४।। भक्तामाजीं तो अग्रणी । रामराव नामे सद्‌गुणखाणी । सुशील तैसा तो सद्‌वर्तनी । द्विजकुलभूषण असे जो ।।६५।। आंबेजोगाई म्हणून । दक्षिणदेशी हे प्रसिद्ध जाण । रामरावाचे ते पूर्वजापासून । वास्तव्य येथेची सर्वदा ।।६६।। परि चाकरी निमित्तेची जाण । औरंगाबादीं राहिलेसे येऊन । पूर्वसुकृत तें पदरी म्हणून । संतसमागम घडलासे ।।६७।। पूर्वपुण्येचि लाधली कांता । काशीबाई नामे ती पतिव्रता । गृहस्थाश्रमीचे मर्म तत्वतां । जाणुनी उभयता वर्तती ।।६८।। कोणी येताचि गृहा अतिथ । यथाशक्ति ते करिती स्वागत । अन्नदानादि कृत्यें ती ऐशी सतत । स्वानंदेचि करिताती ।।६९।। स्वाश्रमीं ती दक्षता ठेऊन । उभयता करिती हरिस्मरण । सर्वाभूतीं तो रूक्मिणीरमण । भाव ऐसाचि ठेविती ।।७०।। पतिपत्नीचे एक चित्त । ज्या गृहीं असेल निश्चित । तेथे वसे लक्ष्मीकांत । लक्ष्मीसहित सर्वदा ।।७१।। हरि तेथे संत वसती । ऐशी आहे ती शास्त्ररीती । म्हणूनी महाराजांची ती प्रीती । रामावरी जडलीसे ।।७२।। रामराम ऐसेचि म्हणत । महाराज गृहासी येती सतत । देखताची उभयता धाऊनि त्वरित । दंडवत घालिती

महाराजां ।।७३।। महाराजांची ती चंचल वृत्ती । असूनिया ते उगेच बैसती । उभयताही मग ते पुढतापुढती । पूजा ती समर्पिती महाराजां ।।७४।। मग जेकां वेळी असेल अन्न । तेचि ठेविती पुढे आणून । महाराज ही तो सत्भाव जाणून । ग्रहण करिती तैसेची ।।७५।। मग वेडे वाकुडे ते वचन । बोलुनि करिती पलायन । मागुती येती फेरा करून । नित्य क्रम तो ऐसा चालेचि ।।७६।। सुख दु:ख सर्वचि प्रारब्धाधीन । परि संतकृपे ती जाती निरसून । शीतज्वर तो रामरावा जडून । बहुत दिवस जहालेसे ।।७७।। नानापरी ते उपचार यत्न । करूनि न जायची ती व्यथा दारूण । नित्यापरि ते महाराज येऊन । अकस्मातचि बैसले ।।७८।। प्रथमारंभी कुशब्देचि ताडण । करूनि म्हणती तूं अंगेचि जाऊन । देई तो मजला तांबूल आणून । खावयालागी येथेची ।।७९।। रामाशी तो भरलासे शीतज्वर । परि तो तैसाची उठला सत्वर । पानदान ते सर्वची आणुनि समोर । ठेवि निजकरेचि आपुल्या ।।८०।। महाराजांची ती विडा पद्धती । करावयाची आहे ती जैसी रीती । श्रोती आठवावे ती आपुले चित्तीं । जे कां कथन जहालेसे ।।८१।। असो विडा कुटुनी तो स्वांगेची आपण । रामाशीं देती खावया लागून । खा खा म्हणती त्या दरडाऊन । समोरा बैसती तैसेची ।।८२।। रामरावाची ती श्रद्धा पूर्ण तात्काळ विडा तो केला भक्षण । तोचि महाराज अंत:पुरी जाऊन । सैरावैरा हिंडती ।।८३।। तो दृष्टीस पडली रामाची भगिनी । क्षयरोग तिजलागुनी । श्रीमुखांत तिच्या ती एकची देऊनी । ऊठ ऊठ म्हणती तियेते ।।८४।। बाईचा तो हस्त धरून । फीर जा म्हणती तिजलागून । बाहेर आणिले ते तियेशी ओढून ।

फराफरा तैसेची निजांगे ।।८५।। मग हास्य करोनिया समोरासमोर । महाराज येती ते मार्गावर । मार्गी ते करिती फेरे अपार । अंत न लागे तो कवणाशी ।।८६।। असो महाराजांच्या प्रसादे करून । दोघांचीही ती व्यथा दारूण । केव्हां कैसी ती गेली निरसून । नकळेची सर्वथा कवणाही ।।८७।। पतिव्यथा ती गेली देखून । काशीबाईस वाटे आनंद पूर्ण । पतिपत्नी ते तेव्हापासून धन्य महाराजा म्हणताती ।।८८।। महाराजांच्या त्या दर्शनाविण । न जायची जो उभयंचा एकही दिन । महाराजही तो अंतरभाव जाणून । नित्य भेटती स्वयेची ।।८९।। पुढे होणारे जे कां भविष्य पूर्ण । महाराज सांगती त्या आधीच येऊन । प्रत्यय येताची ते गहिवरें मन । उभयतांचेही सर्वदा ।।९०।। एके समयीं सायंकाळी अवचित । राम राम ऐसेची हाकारित । महाराज गृहामाजी येऊनि त्वरीत । रामलागीं ते बोलती ।।९१।। म्हणती अश्वारूढ होऊनि । जावयाचे असे की तुम्हालागुनी । स्वस्थ ते ऐशारीती बैसुनी । न चालेचि सर्वथा ।।९२।। प्रयाणसूचक ऐसे ते बोलूनी महाराज तात्काळ गेलेसे तेथूनी । भविष्यार्थ तो नुमजे काहीच मनीं । कवणाच्याही तो किंचित ।।९३।। तोचि राजदूत पुढे येऊन । रामरावाशी तो खलिता देऊन । म्हणे कोठे काही कामानिमित्य म्हणून । जावयां आज्ञा ती असेकी ।।९४।। तोचि खलीत्यामाजी फोडून पाहतां । मजकूर तो देखिला की तत्वतां । की सरकारी कामानिमित्त आता । परभणीस जावे म्हणोनिया ।।९५।। धन्य ते महाराज अंतरज्ञानी । आधिच सुचविला भविष्यार्थ येऊन । पुढे ते ऐशाच रीती गृहा येऊनी । मागुता बोलती साक्षेपें ।।९६।। म्हणतीरे आता पुढे येथून ।

रोजी रूपये ते घ्यावेसे दोन । यावेळी ते रामाचे वेतन । अर्धशतचि असेकीं ।।९७।। असत्य न होय कदा संतवचन । पुढे दरमहा साठ ऐसे ते वेतन । रामरावालागी ते आपण होऊन । जहालेसे कारण नसताची ।।९८।। हे तो संताचे महिमान । न कळेचि कैसे ते विचारेविण । विचार नाही तो नरदेहां येऊन । व्यर्थची माता शिणवली ।।९९।। असो रामराव प्रपंची सदा जागृत । न सांडी तो कदापि सत्पथ । पत्नी ती प्रपंची जाण । सदा सर्वकाळ असेचि ।।१०१।। संसारशकट तो ऐशिया रीती । जयाचा असेल कीं निश्चिती । उणे पडो नेदि त्या तो श्रीपती । पाठी उभा असेची ।।१०२।। रामावरी ती संत कृपा पूर्ण । म्हणुनिया पाठी तो जगज्जीवन । नित्य साक्षेपे उभा राहुन । उणे पडो नेदीच ।।१०३।। संतती आणि संपत्ती जाण । माजी तो विरोध असेकी पूर्ण । परी दोन्हीही लाधलीसे समसमान । रामालागी ते सर्वदा ।।१०४।। कन्या पुत्र जे कां असती । एकाहूनी एक आगळे निश्चिती । सद्वर्तनी ती सकळांची प्रीती । एकसरेची सर्वदा ।।१०५।। पुत्रामाजी तो एक निश्चित । शंकरराव नामे जो विख्यात । पितया ऐसाचि जो मुर्तीमंत । वर्तत संसारी सर्वदा ।।१०६।। महाराजांच्या त्या कृपेचे फळ । म्हणती ते या पुत्रासीच सकळ । वकिलीचा तो व्यवसाय सफळ । संतकृपेचि जहालासे ।।१०७।। प्रथम पत्नी त्या अनुसूये पासूनी । प्रथम पुत्र तो एकचि होऊनी । प्रारब्धेंची साध्वी ती निजधामा निघोनि । सौभाग्यानिशी गेलीसे ।।१०८।। पुत्राचें ते नामाधिकरण । प्रसंगेची पुढे करूं वर्णन । असो पुढे सत्वरचीं ती कुलवधू पाहून । द्वितीयविवाह तो केलासे ।।१०९।। पार्वती नामे ती लाधली कांता । प्रपंची

कुशल आणि पतिव्रता । पूर्वजांचा तो इतिहास तत्वता । आठऊनि उभयता वर्तती ।।११०।। पूर्वजांऐसे ते यथाशक्ति । संसारी उभयता विचारे वर्तती । ज्या योगे ती संतती संपत्ती । लाधलीसे सहजची ।।१११।। सुशील ऐशा ह्या कुटुंबापासुनी । विद्यासंपन्न अपत्ये ती उदया येऊन । अधिकची प्रकाशित हे कुटुंब जनीं । संत कृपेचि जहालेसे ।।११२।। श्रोती परिसावी ती नामाभिधानें । अनुक्रमेचि सांगेन पुढे येथून । जेणे ती संतकृपेची महति पूर्ण । अंतरी सहज ठसवी ।।११३।। ईशसेवा ती घडे ज्यासी । उणे न पडो दे त्या ऋषीकेशी । यथासमयीं तो सुपुत्र कुशी । पार्वतीबाईच्या आलासे ।।११४।। प्रथम पुत्र देखुनी नयनी । आनंद न समायेची सकळांचे मनीं । अनंत ऐसे ते नामाभिधान ठेऊनी । अपूर्व सोहळा केलासे ।।११५।। द्वितीय पुत्र तो दिनकर । दिवाकर तैसा तो तृतिय कुमार । कमलाकर चवथा तो पुत्र साचार । उदरा आलासे साध्वीच्या ।।११६।। पुत्रापरीस त्या कन्या तीन । वाटे सकळा ते कुलभुषण । परस्पर ते प्रेम ठेऊन । स्वानंदेचि वर्तती ।।११७।। एकापरीस त्या एक पुत्र साचार । प्रत्येक असे तो पदवीधर । मातापितयाची आज्ञा ती निरंतर । वंदुनी वर्तती सर्वदा ।।११८।। लेखकें प्रत्यक्ष हे पाहून । कथामृतीं ते केलेसे लेखन । श्रोते ते विवेकेची पहावें आपण । संतमहात्म्य ते ऐसेची ।।११९।। पुत्रादिक ते यापरी विद्यासंपन्न । जहालेसे ते पूर्वपुण्येकरून । संतकृपेचे हे प्रमाण । म्हणून ग्रंथी निरोपिलेचि साक्षेपे ।।१२०।। महाराजांचे पश्चातही ऐशाच रीती । ठेऊनिया अंतरी ती सत्भक्ति । रामरावा ते नित्य यथाशक्ति । सेवा ती करिती सत्भावे ।।१२१।। समाधी कार्य ते

यासी प्रमाण । श्रोती पहावे साक्षेपें जाऊन । याच संतसेवेचे फळ पूर्ण । रामवंशी ते लाधले ।।१२२।। असो सेवा ती घडावी म्हणून । किती एक करिती नाना यत्न । आणिक तैसेचि करिती साधन । परी न घडेची हे सर्वथा ।।१२३।। अनेकासी ते अनेक रीती । महाराजांची ती आलीसे प्रचिती । चमत्कार ऐसे ते अनेक असती । गणना न करवेचि सर्वथा ।।१२४।। पुढील अध्यायी निरूपण । येईल साक्षेपे ते करावे श्रवण । वदता वदविता तो नारायण । वासुदेव त्या निमित्त असे की ।।१२५।।

**इ. श्री. बा. क. अष्टमोध्याय: । श्रीकृष्णार्पणमस्तु ।।८।।**

**हरयेनम: ।**

।। श्री ।।

## अध्याय ९ वा

श्री गणेशाय नम: । जयजयाजी पूर्ण परेशा । पुराण पुरूषा ऋषिकेशी । पुंडलीक वरदा पंढरीशा । भक्तकामकल्पद्रुमा श्रीहरि ।।१।। तुझी प्राप्ती व्हावया कारण । उपाय ते नाना काढिती शोधून । किती एक ते करिती वेद पठण । कोणी ते कर्माचरण करिताती ।।२।। परि इच्छेपरी ते न येची घडून । मग करिताती तीर्थाटन । तेथेही न होता समाधान । उदास होऊनि बैसती ।।३।। तो सवेची म्हणती आता येथून । पुढे करावे तेअन्नदान । मग उठविती ही नाना संतर्पण । परि नयेची हाता तो ते श्रीहरी ।।४।। तरी ऐकावे आता सावधान । ऐशिया उपाये तो नारायण । न भेटेची ऐसे ते शास्त्रवचन । असत्य नोहेचि कल्पांती ।।५।। शास्त्रादिकांचे ते सत्यवचन । असूनिया न कळेचि ते आम्हालागून । कळावया मर्म तो विचार पूर्ण । अंतरी असावा की सर्वदा ।।६।। अविद्येने जे जे कां वेष्टिले । मर्म त्यालागीं ते कधी नाकळे । विचारेविण ते सर्वस्वा मुकले । अर्थ इतुकाचि येथिचा ।।७।। अविचारेचि ते द्वैतभान । विचारे न राहे जे एक क्षण । अद्वैत जहालिया जयाचे मन । सुखदु:ख त्या किंचित बाधेना ।।८।। अंतरी बाणलियां अद्वैतपण । मग कासया पाहिजे त्या तीर्थाटन । व्रत, धर्म, तपादि संतर्पण । करणे न लगेची सर्वथा ।।९।। तीर्थव्रतादि ते अन्नदान । करिता असावे की अद्वैत मन । अद्वैतापाठी तो रूक्मिणीरमण । तिष्ठत असेकी सर्वदा ।।१०।। ऐशापरी हा जगज्जीवन । जहालासे तो भक्ताधीन । भक्त कामना ती

करावया पूर्ण । धाऊनि धावण्या येतसे ।।११।। असो ऐसे जे कां भक्तजन । ते तुज आवडती प्राणाहून । दीनदयाळा पुढे येथून । कथामृतातें बोलवी ।।१२।। गताध्यायीं हेचि कथन । महाराजांचे अद्वैतपण । देखूनिया तेथीचे थोर सान । भजनीं लागले की तयांच्या ।।१३।। महाराजांची ती वृत्ती नसेचि स्थिर । सर्वचि इच्छिती सेवा ती निरंतर । परि यत्नही करीता वारंवार । इच्छित कवणाशी ते साधेना ।।१४।। मग ते चित्तीं निराश होऊन । दर्शनची व्हावया करीती यत्न। महाप्रयत्ने ते येताची घडून । समाधान त्यांतची मानिती ।।१५।। देखूनिया ऐशी ती लोकस्थिती । छायाचित्रकार ते विचार करिती । छायाचित्र त महाराजांचे म्हणती । येऊ सत्वरी आताचि ।।१६।। परि छायाचित्र ते घ्यावया कारण । महाराज जे न सापडती आम्हालागून । मग म्हणती हे त्या पाराजीकडून । कार्य निश्चित साधावे ।।१७।। मग पाराजीस जाऊनी त्वरीत । सांगती सकळ वृत्तांत । किं छायाचित्रे ती दर्शनानिमित्त । घेऊ इच्छिती सर्वची ।।१८।। कोण्याही निमित्तेकरून । महाराजां बैसावावे येथे आणून । निमिषमात्रेची ते कार्य साधून । घेऊ इच्छेपरी त्या आपुले ।।१९।। महाराजांचा तो परमभक्त । पाराजी असेकी विख्यात । चित्रकाराशी तो उल्हासयुक्त । काय बोलिला परियेसा ।।२०।। म्हणे जे कां होते माझिये मनीं । तेचि बोलतसा आपण होऊनी । महाराजांच्या त्या कृपेवाचुनी । न घडेची ऐसे सर्वथा ।।२१।। तरी आपण सज्ज असावे की त्वरीत । महाराज ते येतील क्षणार्धात । ऐशापरी ते बोलताची अकस्मात । महाराज येऊनि बैसती ।।२२।। जैसे कां महाराजां दूताहाती । बोलाऊन आणिलेसे सत्वर गती ।

येऊनिया मग ती पुढतां पुढती । शांतचित्तेचि बैसले ।।२३।। तोचि पाराजी नेत्र संकेतेकरून । चित्रकारासी म्हणे घ्या कार्य साधून । त्यांही मग तो न लाविती क्षण । कार्य ते साधूनी घेतले ।।२४।। ऐशा रीती ते छायाचित्र काढून । घेतलेसे ते त्यां चित्रकारांनी । आनंद तो जहालासे सकळालागुनी । छायाचित्रची देखता ।।२५।। तात्यासाहेब आणि केशव दिनानाथ । चित्रकार उभयतां कुशल बहुत । त्याही ते पराजींचे आभार त्वरित । मानुनिया जाती स्वगृहा ।।२६।। असो जयाचा जैसा कां भाव असे । महाराजही वर्तती तयाशी तैसे । प्रसंग तो ऐसाचि एकदां घडलासे । तोचि आता परियेसा ।।२७।। गेंदाबाईचे सदनीं अवचित । मिळोनिया आले ते साधुसंत । यथाशक्ति ती सुश्रुषा करित । साधुसंतांची सर्वदा ।।२८।। शुद्धभाव ठेऊनि अंतरी । नित्य साधुसंतांची पूजा करी । भोजनालागी ते आमटी भाकरी । बाईने करविलीची सत्वर ।।२९।। महाराजांवरीही श्रद्धा पूर्ण । बाईची असे की ती मनापासून । म्हणे संतांसवे ते महाराजांलागून । भोजन घालावेसे वाटते ।।३०।। परि कैसे बोलवावे जाऊन । कोठेचि नसे ते ठावठिकाण । यालागि ते बाईचे मन । उदास जहालेसे अंतरी ।।३१।। मग ती पात्रे वाढीत असता । कळो आले की तिचिये चित्तां । गृहामाजी ते लवण तत्वतां । किंचित नसेचि वाढाया ।।३२।। घाबरेची निघाली घरांतुन । तो महाराजची अडविती पुढे होऊन । महाराजां पहातां ते समाधान । बाईलागी जहालेसे ।।३३।। महाराजां सांगे प्रीतिकरून । गृही नाही ते किंचित लवण । भोजना बैसविले ते संतजन । आताची जाऊनि येते मी ।।३४।। तोचि महाराज एक ग्रंथिका

काढून । बाईच्या पुढती देती टाकून । ग्रंथी माजी ते बांधूनी लवण । न कळे केव्हा कैसे ते आणिले ।।३५।। दृष्टी पहातां प्रत्यक्ष लवण । बाईचे गहिवरोनि गेले मन । धन्य महाराज अंतरसाक्षी म्हणून । चरणीं मिठी घातली ।।३६।। असो महाराजां सदनी आणून । घातले संतासवे ते भोजन । धन्य ते औरंगाबादवासी जन । ज्याही सुखसोहळा तो ऐसा देखिला ।।३७।। किती एक ती पक्वान्नें रांधून । महाराजापाठी ते लागती रात्रंदिन । परि महाराज ते न गवसती त्यांलागून । कांही केल्याचि सर्वथा ।।३८।। ऐशियासि सहज गाठी पडतां । आनंद वाटे तो याचिये चित्तां । मिष्टान्न पुढे ते आणून ठेविता । महाराज जे गदगदा हासती ।।३९।। स्वकरेची मग ते मिष्टान्न घेऊन । श्वानापुढे ते ठेवती नेऊन । आणिक ते काहीसे अंधपंगुयांसी देऊन । अंगेची टाकिती सर्वही ।।४०।। इच्छेनुसार ते काही अन्न । येथेचि बैसूनि करीती ग्रहण । महाराजातें मिष्टान्न । अभिन्न वाटेचि सर्वदा ।।४१।। अंतरीचा संकल्प जाणुनी । महाराज त्यां भेटती आपण होऊनी । प्रसंगचि ऐसा जो कां आला घडूनि । सांगेन आवडी परियेसा ।।४२।। अच्युतराव नामे द्विजवर । व्यवसाय तो वकीलीचा निरंतर । असतां गृहीं ते पक्षकार । अनेक येताति सर्वदा ।।४३।। त्यामाजीं एक पक्षकार । बाजारी त्या जाऊनि सत्वर । इच्छेपरी ते काहीसे अंजिर । घेऊनिया बिऱ्हाडी आलासे ।।४४।। अंजिरे ती घेताचि संकल्प केला । किं पांच अंजिरे ती महाराजांला । देऊ म्हणूनि तो शोधु लागला । बिंदोबिंदी तो महाराजां ।।४५।। हिंडता बहु जहालासे कष्टी । परी न होय ती महाराजांची भेटी । मग होऊनिया तो हिंपुटी ।

मागुतां बिऱ्हाडी पातला ।।४६।। प्रात:काळी ते समस्तांप्रती । जाणे असे की सत्वर गती । म्हणूनिया बिऱ्हाडे ती आपुले हाती । बांधु लागले सहजची ।।४७।। समस्तें आपापुली ती बिऱ्हाडे बांधून । ठेविली जवळी ती आपुल्या आणून । निद्रागारीं ते मग करिती शयन । जाऊनि एकसरे सर्वची ।।४८।। रात्र जहालीसे प्रहर दोन । कोणी न बोलती कोना वचन । अच्युतराव ते काहीसे पठण । शांतचित्तेचि करिताती ।।४९।। तो ऐशा समयी ते महाराज अवचित । अकस्मात येऊनिया बोलत । अंजिरे ती काढुनी द्यावी म्हणत खावया ।।५०।। ऐकूनि ऐशा त्या वचनोक्तीला । अच्युतासी तो विस्मय वाटला । नम्रवचने तो महाराजाला । प्रतिवचन देतसे ।।५१।। म्हणती अवेळी ऐशा ती कोठून । अंजिरे न मिळती बाजारां जाऊन । प्रात:काळी ती आपणा आणून । देऊ म्हणती साक्षेपे ।।५२।। अंजिरे असूनिया ती तुमचे सदनी । कांहो न देतसा मजलागुनी । वचन ऐकताचि हे अच्युतालागुनी । विस्मय अधिकची वाटला ।।५३।। विस्मयेचि मग तो महाराजा बोलत । काय म्हणता हे अंजिरे सदनांत । तरी नि:शंकपणे ती घ्यावेचि त्वरित । निजकरेचि आपुल्या ।।५४।। परिसुनिया ऐसे ते वचन । महाराज विलोकिती बिऱ्हाडां जाऊन । तो एक पडशी ती तेथील आणून । अच्युतापुढे ती ठेवली ।।५५।। म्हणती यामाजी आहेत की अंजिरे । आता तरी ते काढी कां सत्वर । सोडूनिया पाहती तो साचार । प्रत्यक्ष अंजिरे ती देखिली । तितुकेची घेती ते स्वहस्तें ।।६०।। पाहुनिया ऐशी ती सकळ रीती । विस्मय तो जहालासे सकळां चित्तीं । महाराज सदनाबाहेर पडती । शब्द न बोलताची

आणिकां ।।६१।। पक्षकाराशीं ती अंतरीची खुण । प्रत्यया येताची गहिवरे मन । धन्यवाद तो महाराजां देऊन । वचन बोलत आणिक ।।६२।। म्हणे जो जो कां संकल्प केलासे मनीं । तो तो सांगितलासे तुम्हालागुनी । संकल्पा ऐसे ते महाराज येऊनी । हेतु पूर्ण तो केलासे ।।६३।। मग ऐकूनि पक्षकाराचा वृत्तांत । सद्गदित जहालेसे सकाळांचे चित्त । ईश्वर अवतारची म्हणती हे साक्षात । प्रचीत आलीसे ती आपणा ।।६४।। महाराजांची ती चंचल वृत्ती । इच्छेपरी ते सदा वर्तती । किती एकाते कुशब्दे ताडिती । ताडण ते तैसेचि अनेकां ।।६५।। गंगाधर गोपाळ याचिये सदनीं । अनंत चतुर्दशीचिये त्या दिनीं । प्रतीवर्षी तो उत्सव म्हणुनी । नियमानुसार होतसे ।।६६।। दिवसाते ब्राम्हण भोजन । रात्री पुराणादिकथा कीर्तन । तैसेचि ते श्रीहरी भजन । नियमित सर्वचि होतसे ।।६७।। न करिताचि ते पाचारण । अचूक येती ते महाराज होऊन । इतुकाची काळ तो कथा कीर्तन । बैसुनिया ऐकती ।।६८।। मग मागुती भजन । अंगेची ते आपण होऊन । भजन होताचि जाती निघोन । न बोलता किंचित कवणाशी ।।६९।। ऐशा परी ते निघता क्षणीं । गंगाधर गोपाळ तो पुढे होऊनी । महाराजांच्या त्या चरणीं । ठेवी मस्तक प्रीतीने ।।७०।। तो महाराज म्हणती त्या लागून । वाया तू करिशी काय बैसुन । उद्योग चाकरी ती केल्याविण । राहु नयेचि सर्वथा ।।७१।। लोटताचि येथून सप्तदिन । चाकरी ती मिळेल तुजलागून । बोलता चापटी ती मुखी चटकन । मारूनिया तेथुनी निघती ।।७२।। सत्य करावया संतवचन । पाठीं उभा असे तो नारायण । भक्तवचन ते असत्य म्हणून । होऊन नेदीच कल्पांती

।।७३।। लोटताची मग ते सप्तदिन । किंचितही न करितां तो यत्न । गंगाधर गोपाळ यासी पाचारण । आपण होऊनी आलेसे ।।७४।। महाराज कोणाशी करिती ताडण । कीं कोणा करिती गालिप्रदान । परी जे जे का घडे तो शुभ शकुन । मानुनी समाधान मानती ।।७५।। सहजरित्या महाराज बोलती । परी सत्य करी तो रूक्मिणीपती । सत्यासत्य ते महाराज नेणती । विदेह स्थिती म्हणोनिया ।।७६।। जेथें नाही ते देहाचेचि भान । मग दुजे ते कैसे कळे त्यालागुन । देहाभिमानेचि षड्विकार पूर्ण । पाठीं लागती सहजची ।।७७।। जयासी विकारचि तो कैसा कळेना । होईल कैसे त्या सुखदु:खाची कल्पना । कल्पना नाही त्या खटाटोप नाना । वृथा कासया पाहिजे ।।७८।। महाराजांची ती वृत्ती ऐशीच जाण । नाहीं कोठे ते ठावठिकाण । आसनावसनादि भूक तहान । नाठवेचि कधी महाराजां ।।७९।। वेळी जे जे का मिळे अन्न । ते ते स्वानंदेचि करिती ग्रहण । उत्तम अथवा वाईट म्हणून । व वाटेचि महाराजां ।।८०।। मिळालिया न वाटेची सुख । किंवा न मिळतां न वाटेची दु:ख । सुखदु:खाशी तो ठाव देख । महाराजाजवळी नसेची ।।८१।। असो महाराजांचे ते विरक्तपण । कितीसे करावे ते वर्णन । हेममृत्तिका ती समसमान । महाराजां वाटे की सर्वदा ।।८२।। स्वच्छंदि हे महाराजांचे वर्तन । हाते न सापडीत प्रयत्नें करून । परि जैसा कां जयाचा तो भाव जाणून । महाराज त्या वर्तती तैसेची ।।८३।। ऐसे असती बहुत जन । कि ज्यांचा महाराजांवरी भाव पूर्ण । आणिक ती सेवा रात्रंदिन । महाराजांची इच्छिती ।।८४।। राजाराम पंत नामे करून । सत्कर्मी सर्वदा असे जो निपुण । दुज्या नामें ते

बाबासाहेब म्हणून । सर्वची म्हणती पंताते ।।८५।। पंताचा तो सत्भाव जाणुनि । महाराज एकदां ऐसेची अवचित । येऊनी हाकारिती पंत पंत । शब्द तो महाराजांचा परिसुनी त्वरित । पंत बाहेरी आलेसे ।।८७।। महाराज दृष्टी पडताचि जाण । पंत साष्टांगे करिती नमन । मागुती तैसेची कर जोडून । महाराजा पुढे ठाकती ।।८८।। तो महाराज पंतासी बोलती । घे घे म्हणूनिया तो पैसा देती । पैसा तो प्रसादचि म्हणून चित्ती । हर्ष वाटलासे मानसी ।।८९।। तो पैसा अत्यादरेंकरून । देव्हारी मग ठेविलासे नेऊन । नित्य तयाचे ते पूजन । प्रसाद म्हणुनी होतसे ।।९०।। अल्पची काळ तो ऐसा लोटतां । पुढे मामलेदार म्हणूनिया नेमिले पंता । महाराजांचा हा प्रसाद आठविता । विस्मय तो वाटेचि समस्तां ।।९१।। उच्चस्थितीमाजी ते पंतालागून । यावया जहालेसे हेचि कारण । ऐसे हे संत भक्ताचे महिमान । ब्रम्हादिकाही कळेचना ।।९२।। महाराज ते एकदां होऊनि । अवचित आलेसे या पंत सदनी । सदनी प्रवेशताची नयनी । पंतानुजासि देखिले ।।९३।। भगवंता ऐसेचि ओरडून । भाकरीचा तुकडा तो दिधला भिरकाऊन । दीर्घस्वरेचि मग हास्य करून । पळती एकदाचि तेथुनी ।।९४।। शुभ शकुन तो ऐसा देखुनि । सकळांलागनी तो आनंद मनी । वाटला तोचि तिसरे दिनी । चाकरी मिळालीसे भगवंता ।।९५।। यापरी अनेक असती प्रमाण । सर्वचि कथावया लागी तें नसे प्रयोजन । परि कळावयालागी ते संतमहिमान । प्रमाण ते श्रोती परिसावे ।।९६।। अनेक सत्भक्त ते महाराजा असती । जे का श्रद्धा ती महाराजांवरी ठेविती । श्रद्धायोगे ते फळ निश्चिती । सहज पावती सर्वदा ।।९७।। किशनदास नरसीदास नामे

करून । औरंगाबादवासी जो का श्रद्धाळू पूर्ण । अनुकूल भार्या ती तया लागून । प्रपंच लाधलीसे प्रारब्धें ।।९८।। रूक्मिणीबाई ते तिज नाम बोलती । कुटुंब जातीने असे हे गुजराथी । महाराजांची ती कृपा इच्छिती । मनापासूनि सर्वदा ।।९९।। इच्छेपरि त्या एके दिनी । महाराज आले ते अकस्मात सदनीं । म्हणती रे काही तरी भोजन मज प्रती । आताचि देई आणुनी ।।१००।। प्रसंगी जे का होते सदनी । आणून देती महाराजालागुनी । महाराज ते प्रीतीकरूनी । ग्रहण करिती ते स्वानंदे ।।१०१।। भोतनोत्तर निघती तेथूनि । निघता त्या पैसे ते देती दोन । किसनदासाचे ते उल्हासे मन । प्रसाद हा मिळताचि निजकरी ।।१०२।। प्रसाद मिळाला तेव्हापासून । भरभराटीस आले हे कुटुंब पूर्ण । पुढे व्यंकटीदास या नामे करून । सुपुत्र उदरी आलासे ।।१०३।। समयोचितचि त्या लाधली कांता । देवकाबाई ती पतिव्रता । स्नुषा पुत्र ऐसे हे सद्वर्तनीं देखतां । मातापिता ते तोषिती ।।१०४।। पुढे देवकाबाईपासून । प्रथम जहालासे ललितमोहन । नंदकुमार तैसा तो द्वितीय जाण । सुपुत्र उदरीं आलासे ।।१०५।। चंद्रकुमार नामें तो तिसरा सुत । एकाहूनी एक असती आगळे बहुत । नित्य संस्थानी उत्सवादिकादि निमित्त । सेवा ती होतसे येथूनी ।।१०६।। दिवसेंदिवस ऐशियारीती । अनुभव आलेसे लोकाप्रती । या योगे ती सकळांची दृढ भक्ति । महाराजांवरी जडलीसे ।।१०७।। महाराजांचे ते किती बोल । सार्थ असती ते सकळ । अनेकालागि ते बोलाचे फळ । प्रत्यक्ष प्रत्यया आले ते ।।१०८।। एकदा ऐसेचि आले घडून । नित्यापरी ते महाराज करिती भ्रमण । तो सहजची एका वृक्षातळी

जाऊन । नेणो कैशारीती बैसले ।।१०९।। तोचि श्रीनिवासनाना गृहांतून । कचेरी लागी ते जावया कारण । निघता पंथी ते महाराजांलागुन । देखती दुरूनिया सहजची ।।११०।। दृष्टी देखतां महाराजांस । वृक्षातळी तो आलासे श्रीनिवास । मस्तक चरणी ते ठेवावयास । धाव घेतही प्रीतीने ।।१११।। तोचि महाराज उठती सत्वर । म्हणती रे शिऊ नको आम्हा साचार । चालू असे रे तो प्रेत संस्कार । नेणूनिया आम्हां शिवतोसि ।।११२।। ऐसिया रीती ते बोले बोलुन । महाराज गेलेचि न लागता क्षण । इकडे ते नानांचे अंत:करण । दु:खार्णवी बुडालेसे ।।११३।। श्रीनिवासनानाची ती श्रद्धा पूर्ण । महाराजावरी असे कीं मनापासून । हे तो मागेची जहालेसे कथन । आठव हा मानसी असो द्या ।।११४।। असो ऐकूनिया महाराजांचे वचन । दचकले नानाचे ते अंत:करण । म्हणे न कळेचि हा अनर्थ कोण । ओढुनिया आलासे पुढती ।।११५।। असत्य नोव्हे ते संतवचन । यालागीं नानांचे ते उद्विग्न मन । म्हणे प्रारब्धाची ती गती गहन । ब्रम्हादिकाही कळेना ।।११६।। पुढे चार दिवसची ऐसे ते लोटता । तो टपाल एक पडलेसे येऊनि हातां । मानसी ते फोडावया आतुरता । जहालीसे ती अंतरी ।।११७।। तो अकस्मात महाराज येऊनी । म्हणती फोडा पत्र रडा तैं वाचनी । महाराजांचे ते वचन ऐकुनी । कोणां काही ते नूमजेची ।।११८।। मग ते पत्र पाहतां फोडून । सकळ तो वृत्तांत आलासे कळून । किं नानांचे त्या पितयालागून । देवआज्ञा ती जहालीसे ।।११९।। महाराजांचे अंतरज्ञान । कळो आले ते सकळांलागुन । नानालागीं ते पत्र वाचून । आठव तो सर्वचि जहाला ।।१२०।।

किं ज्या दिवशीं जहाले ते प्राणोत्क्रमण । त्याच दिवशी महाराज आपणा भेटून । दहन संस्काराची ती वेळ जाणून । खूण आपणाते दाविली ।।१२१।। महाराजांचे ते बोल विपरीत । आपणा वाटले कीं समस्त । परी पत्र पाहतां ते सर्वची यथार्थ । कळो आले ते सहजची ।।१२२।। असो महाराजांचे जे जे कां अघटित । घडे ते सर्वांचि वाटे विपरीत । परी अनुभव येताचि ते यथार्थ पाहुनी विस्मय वाटेचि ।।१२३।। आणिक जे जे का असती अनुभव बोल । पुढील अध्यायीं ते ते येतील सकळ । वदविता निश्चयेचि तो तमालनील । वासुदेव या निमित्त असेचि ।।१२४।।

**इ. श्री. बा. कृ . नवमोध्याय: । श्रीकृष्णार्पणमस्तु ।।९।।**

**हरयेनम: ।**

## ।। श्री ।।

## अध्याय १० वा

श्री गणेशाय नम: । जयजयाजी पुरूषोत्तमा । सगुणरूपा मेघश्यामा । भक्तरक्षका रघोत्तमा । रघुकुलभूषणा सितापते ।।१।। माया लाघवी तू जगदीश्वर । न कळे तो तुझा महिमा अपार । अंगेची नटूनिया चराचर । जगदाकार जहालासी ।।२।। मायेचे काढिता आवरण । मग तू अवघाची अससी नारायण । यालागीं तुज जनीजनार्दन । संत सज्जन म्हणताती ।।३।। मिथ्या भ्रम तो मायेपासून । हे मर्म जाणती ते भक्तजन । किं भक्तमहिमा तो तुजवाचून । न कळेचि आणिकां ।।४।। निज भक्ताचे ते वचन । पाळिशी तूं अंगेचि जगज्जीवन । आणिकां दाविसी ते सत्य करून । निजकृपेचि आपुल्या ।।५।। भक्त कथा तुज आवडती । भक्तालागीं ते आप्तेष्टादि गोत । एक असती कीं प्रेमळ भक्त । भक्ताचा तो आवडी मनोरथ । न सांगताचि पुरविशी ।।७।। भक्त जेथे कां तुझे वसती । तेथे तूं अससी की रमापती । तैसाचि तुझा विरह चित्तीं । भक्त न साहतीच सर्वथा ।।८।। ऐसे हे देवभक्ताचे महिमान । न कळे ब्रह्मादिकांलागून । तुझा तूं जाणता एक रूक्मिणीरमण । मर्म ते आणिकां कळेना ।।९।। सारासार पाहतां विचारून । मर्म ते इतुकेच येथिचे जाण । तूं सर्वस्वे झालासे भक्ताधीन । निज कृपेचि आपुल्या ।।१०।। यालागी ती भक्तसेवा । नित्य घडवी कीं केशवा । तेणे तूं निजकृपेचि माधवा । हातां येसी सहजची ।।११।। देवभक्ताचे अभिन्नपण । न कळे ते तुझ्या कृपेविण । असो कृपें तू बोलवी कथामृतलागून ।

माझिया निमित्तेची येथुनी ।।१२।। सिंहावलोकनें करून । श्रोती पहावे ते अनुसंधान । किं महाराज फिरती ते शहारांतून । इच्छेनुसार सर्वदा ।।१३।। एकदां ऐसेचि विपरीत आले घडूनि । महाराज चालिले ते सराफ्यातुन । तों अकस्मात एका माडीवर जाउनी । ठाकले स्वच्छेचि आपुल्या ।।१४।। तो त्या ठायी प्रतिष्ठानवासी जाण । दिनकरराव नामें सत्पात्र ब्राम्हण । उतरलासे त्या ठायी येऊन । निजकार्यार्थ आपुल्या ।।१५।। तो महाराजासी दृष्टी देखतां । प्रतिष्ठनवासी ब्राम्हण तत्वतां । उठोनिया महाराजांच्या धरूनिया हाता । अत्यादरेचि बैसवी ।।१६।। समयोचित आदरातिथ्य करून । महाराजां विनवी कर जोडून । म्हणत सायंसंध्यादि येथेचि सारून । फराळालागी ते बैसवी ।।१७।। तो महाराज म्हणती गंगास्नान केल्याविण । न करू आम्ही फराळादी भोजन । ऐकूनी ऐसे हे महाराजांचे वचन । विस्मय तो सकळासी वाटला ।।१८।। तोचि महाराज तत्काळ उठून । जिन्यामाजीं ते त्वरे येऊन । मध्येच हरगंगे हरगंगे म्हणून । मागुता वरी ते आलेसे ।।१९।। निथळत्या अंगानिशी महाराजांना देखुनी । सकळांसी विस्मय वाटला । तो धूतवस्त्र घेऊनि सर्वांगाला । किती एक उठोनि पुसताती ।।२०।। तो आणिकें जिन्यामाजीं जाऊनी । विलोकिता जलबिंदु हि न दिसे नयनीं । यालागी अधिकची आश्चर्य मनीं । देखुनिया वाटे ते समस्तां ।।२१।। करणी ती ऐशीविलोकून । धन्य म्हणती महाराजांलागून । महाराजही किंचितसा फराळ करून । बाहेर पडती तैसेची ।।२२।। नाना चमत्कार ते ऐशिया रीती । नित्य लोकातें अनुभवा येती । या योगे ती महाराजांवरती । श्रद्धा ती

सकळांची जडलीसे ।।२३।। आता ऐका सावधान । कृष्णाजीपंत नामें ब्राम्हण । महाराजांवरी तो विश्वास पूर्ण । अंतरी असे कीं सर्वदा ।।२४।। चंपावती नामे नगरांत । पंतांचे असे ते वित्त गोत । असूनियापंतांचा तो चरितार्थ । चाकरीवरी तो चालेचि ।।२५।। दुज्या नामें त्या बीड म्हणती । वडिलोपार्जित पंतांची तेथे वस्ती । आणिक तैसे आप्तइष्ट असती । पंतालागी ते येथेची ।।२६।। असो पराधीनता अतिकठीण । त्यामाजी ते अधिकारी यवन । हांजी हांजी करिता ते पंतांचें मन । विटले असेचि सर्वदा ।।२७।। परी कुटुंबवत्सल म्हणुनी । इच्छा नसतां ती किंचित मनीं । चाकरी करिती निशिदिनी । नानाक्लेशाते साहुनी ।।२८।। परावलंबी ते जिणे व्यर्थ । म्हणुनिया उद्विग्न पंतांचें ते चित्त । म्हणती स्वतंत्रपणे तो चरितार्थ । चालेल ऐसेचि करावे ।।२९।। सहज विचार करिता एकेदिनीं । निश्चिय तो ठाम केलासे मनीं । की छापखाना तो काढावा पुढे येथुनी । चरितार्थालागी तो आपुल्या ।।३०।। तो कोणाशीच न कळवितां कांही । औरंगाबादी ते आलेसे लवलाही । महाराजांवरी तो विश्वास पाही । अंतरी असे कीं सर्वदा ।।३१।। आधी महाराजांचे ते आशीर्वचन । मिळावे वाटेसे पंतांलागून । म्हणूनिया ते घ्यावया दर्शन । नगरामाजी हिंडती ।।३२।। तो अकस्मात एका दुकानीं । महाराजां देखिले नयनीं । तो तात्काळची महाराजांपुढे जाऊनी । ठाकलेसे पंत मौनेची ।।३३।। परि महाराज ते धरूनिया मौन । काहीं ती खटपट करिती दुकानीं बैसून । इकडील वस्तु ती तिकडे ठेऊन । उगेच बडबडती मानसी ।।३४।। सहज दृष्टी करिता वर । तो पंत दिसती उभे समोर । त्यां देखताची महाराज

सत्वर । कुशब्देंशी ताडण करिताती ।।३५।। महाराजांचे कुशब्दें ताडण । पंता वाटलासे शुभशकुन । तोचि महाराज एक कागद उचलुन । जवळी घेती आपुल्या ।।३६।। त्याचे करोनिया भाग दोन । एकावरी काहीसे अक्षरे लिहून । दुजा भाग तो त्यावरी ठेऊन । दाविती निजहस्तेचि आपुल्या ।।३७।। दोन्ही भाग ते कागदाचे घेऊनी । पंतासमोर देती भिरकाऊनी । म्हणती घरी जा तुं येथूनी । काम करी कां तूं ऐसेचि ।।३८।। प्रसाद मिळताची पंतालागुनी । आनंद जहालासे मनांतून । वाटे न बोलताची हेतु ओळखून । प्रसाद आपणासी तो मिळाला ।।३९।। मग साष्टांगे करूनि नमन । पंत तत्काळ निघाले तेथून । बीडग्रामीं ते स्वगृहा येऊन । निज कार्यार्थी पहाती ।।४०।। पुढे बीडमाजी तो छापखाना सत्वरी । उघडूनिया नाम त्यां दिधले जोगेश्वरी । सहज सुटली ती तेथून चाकरी । संत कृपा ती म्हणोनिया ।।४१।। संतांचे ते आशिर्वचन । असत्य नोहेची कल्पांती जाण । पुढे याच व्यवसायीं भरभराट होऊन । पंत सुखी ते जहालेसे ।।४२।। याचरीती भगवंत गोविंद नामे ब्राम्हण । प्रतिष्ठानवासी सत्भक्त पुर्ण । तोडेवाले ज्या म्हणती सकळजन । उपनावेची सर्वदा ।।४३।। कालमानेचि भगवंताकडून । पित्याने करविले ते पुत्राचें अध्ययन । राजभाषा ती फारशी इत्यादि म्हणून । अवगत झालीसे भगवंता ।।४४।। ज्यायोगे ती आपण होऊन । चाकरी मिळालीसे भगवंतालागून । परि उद्विग्न सदा ते भगवंताचे मन । अंतरी असेचि सर्वदा ।।४५।। परि महाराजांवरी तो भाव पूर्ण । सहज जहालेसे एकदां दर्शन । तोचि महाराज धरून मौन । येऊनिया ठाकती सामोरा ।।४६।। तो एक

कागद उचलोनिया तेथें । महाराज घेती तो आपुल्या हस्तें । त्यावरी कुंडली रेखुनी ग्रहांदिकाते । त्यामाजी भरती स्वेच्छेची ।।४७।। याचपरी ते काही अंक भरून । भगवंताकरी ते देती होऊन । करावे ऐसेची म्हणती पुढे तेथून । जावे जावे म्हणताती ।।४८।। मौनेचि साष्टांगे नमून । भगवंत तो निघालासे तेथून । पुढील भविष्यार्थ तो काय म्हणून । चिंताग्रस्त जहालासे मानसीं ।।४९।। परि महाराजांचा तो प्रसाद म्हणून । कागद ठेविलासे तो सांभाळून । अल्पचि काळ तो लोटता जाण । भविष्यार्थ उदया आलासे ।।५०।। सहज भगवंता वाटले होऊन । किं ज्योतिष शास्त्राचे करावे अध्ययन । इच्छेपरी त्या सर्वची आलेसे घडून । निपुण त्यामाजी तो जहालासे ।।५१।। धन्य महाराज त्रिकाळज्ञ पूर्ण । भविष्यार्थ तो सुचविला आपण होऊन । सुख सुपत्ती ते भगवंता लागुनी । लाधलीसे तो संतप्रसाद म्हणुनी । प्रपंच जहालासे नेटका ।।५३।। पुढे भगवंतानी महाराज चरित्र । गद्यामाजीं ते लिहिलेसे साचार । ज्याचा घेऊनिया तो आधार । सांप्रत कथामृत जहालेसे ।।५४।। दत्तात्रयबुवा चरित्र नायकाचे वंशस्थ । यानी ही गद्याची एक प्रत । मजलागीं देऊनि सकळ वृत्तांत । निज मुखेचि कथियेला ।।५५।। किं ओवीबद्ध असावे हे चरित्र । ऐशी इच्छा असे की निरंतर । परि योगायोग नसेचि साचार । काही केल्याचि सर्वथा ।।५६।। कर्ता करविता तो रूक्मिणीपती । मग ती चिंता कासया करावी चित्तीं । प्रत्युत्तर ऐसे ते बुवाप्रती । देऊनिया समाधान केलेसे ।।५७।। तोचि पुढे होऊनिया सत्भक्त । म्हणे हो न दवडिला काळ किंचित । अवश्य कार्यारंभ तो आता त्वरित । श्रीहरीस्मरणेंची करावा ।।५८।।

ऐसी मजलागी ते मिळतां स्फूर्ती । तोचि मी हे कार्य घेतलेसे हातीं । कार्यारंभाचे ते श्रेय निश्चिती । त्या सत्भक्ताचे असे कीं ।।५९।। सत्भक्त हा ऐसा कोठील कोण । सहज वाटेल ते श्रोतया लागून । तरी प्रसंगेची करू ते निवेदन । विश्वास मानसी असो द्या ।।६०।। बेंबळीकर उपनावें त्या म्हणती । एवढाच आठव तो असो द्या चित्ती । प्रपंचामाजी तो परमार्थ निश्चिती । साधिला जेणें सहजची ।।६१।। असो जरी कां सत्कार्य घेतले हाती । परि विघ्ने त्यामाजी धाव घेती । तरी त्याची ही खंत चित्ती । करूं नयेचि सर्वदा ।।६२।। कथामृताचे करितां लेखन । वृत्तांत तो ऐसाचि आलासे घडून । श्रोती निजप्रीती तो करावा श्रवण । अनुभवसिद्ध असे कीं ।।६३।। प्रस्तुत लेखकाचे ते जीवन । चाकरीमाजी ते गेलेसें विरोन । या योगे नित्य भ्रमण । करावे लागे सहजची ।।६४।। परभणी हे जिल्ह्याचे ठिकाण । त्यामाजी ग्राम ते मानवत जाण । तेथे एक मुख्य अधिकारी नायब अमीन । कर वसूलीचा असेचि ।।६५।। अधिकारी आणि प्रजाजन । या माजी वैतुष्ट्य आलेसे काही घडून । त्या निमित्येची लेखका मुख्य अधिकारी जाण । नेमुनिया पाठविलेसे येथेची ।।६६।। लेखके अधिकार तो जाणुनी मनीं । एकसरेची वागविले सकळांना लागुनी । या योगेचि संतोष सकळांचिये मनीं । एकसरेची जहालेसे ।।६७।। पाहुनिया सकळांचे समाधान । दुर्जना क्षोभ आलासे दारूण । काहीतरी विपरीतचि करावे म्हणून । तळमळ करिती मानसी ।।६८।। असो बुद्धि बहिर्मुख जहालियावरी । मग तो कोणीही करू नये ते करी । याच रीती मूळ चरित्राची प्रत चोरी । गेलीसे लेखकापासुनी ।।६९।। नानापरी यत्न

करितां । मूळ प्रत ती नयेचि हातां । लेखनामाजीं हा विक्षेप । तत्वतां घडूनिया आलासे अवचित ।।७०।। लेखनामाजी हे विघ्न । यावया न कळे तें काय कारण । चिंताग्रस्त ते लेखकाचे मन । प्रकार ऐसा हा देखूनी ।।७१।। असो ईश्वरी इच्छा ती म्हणुनी । लेखक उद्विग्न जहालासे मनीं । म्हणे सेवा ती महाराजांलागुनी । घेणे नसेची सर्वथा ।।७२।। किं लेखनामाजी दोष बहुत । देखुनी विटले महाराजांचे चित्त । म्हणुनिया विघ्न हे रूक्मिणीकांत । जे जे होणारे ते निश्चित । होईल न टळेचि सर्वथा ।।७४।। श्रोती शंका ती न घ्यावी किंचित । असाक्षी नोहे हा वृत्तांत । यासी साक्ष तो एक पंढरिनाथ । अंतर्बाह्य सर्वथा असेची ।।७५।। व्यवहारदृष्ट्या साक्ष साचार । जरी कां पाहिजे म्हणती श्रोते चतुर । तरी गोपाळ गणपत नामे द्विजवर । समक्ष येथेचि असेचि ।।७६।। उपनावे त्या दिक्षित म्हणती । कर्ममार्गी जो निपुण अति । शाक्त उपासनेचि प्रत्यक्ष मुर्ती । कलियुगामाजी जो निश्चियें ।।७७।। यापरी दुष्कृत्याते विलोकून । दिक्षितांचे कळवळले ते मन । कळवळ्यापाठीं तो जगज्जीवन । अंगेची ठाकलासे येऊनि ।।७८।। ईश्वरलीला ती अघटीत । नेणो त्या दुर्जना काय आलीसे प्रचित । त्यांही ती मूळ चरित्राची प्रत । होऊनिया पाठविलीसे दीक्षितां ।।७९।। धन्य ते दिक्षितांचे कर्मानुष्टान । वश केलासे जगज्जीवन । प्रतदेखताची दिक्षिताचे मन । आनंदले त्या पार नसेचि ।।८०।। तोचि स्वानंदे पत्र लिहून । लेखका कळविला वृत्तांत पूर्ण प्रत ती तैसीच दिधली पाठऊन । लेखकालागी ते मागुती ।।८१।। असो ग्रंथ व्हावयालागी तो पूर्ण । दिक्षित जहालेसे त्या कारण । म्हणूनिया लेखनाचे यश संपूर्ण ।

दिक्षितालागी असेचि ।।८२।। असो किती एक महाराजांप्रती । नवस करिताती अति प्रीती । मतितार्थ तेथिचा सांगावया निश्चिती । येवढाचि असे तो परियेसा ।।८३।। महाराजांचें नवसादि जेकां म्हणून । करूनि फिटती ब्राम्हणादि भोजन । या व्यतिरिक्त ते आणिक साधन । नवसादिफिटाया नसेचि ।।८४।। परि एके नवस केलासे अघटित । किं महाराजां वस्त्रादिभूषण समस्त । लेवऊनी मिरविन शहराआंत । कार्य सिद्धी ती जहालिया ।।८५।। भाग्य नगरीचा तो सत्भक्त । जयाने नवस केलासे विपरीत । त्याचा हेत तो पुरताची त्वरीत । आला नवस फिटाया ।।८६।। महाराजांची ती वृत्ती पाहून । खिन्न जहालासे तो सत्भक्त जाण । म्हणे नवस फिटाया तो उपाय कवण । अंतरी न सुचेचि सर्वथा ।।८७।। नवस तो केलासे ऐशारीती । किं वस्त्रादी अलंकार महाराजाप्रती । लेवऊनि कोणत्याही त्या वहानावरी । बैसऊन मिरविन एकदां ।।८८।। परि ऐसे घडणे बहु कठीण । किं महाराजांची वृत्ती ती चंचल पूर्ण । शांतरीती ते कोठे ही म्हणून । हाता न गवसती कवणाच्या ।।८९।। नवस पूर्ण व्हावया कारण । उपाय तो न सुचेचि त्यालागुन । उद्विग्न होऊनिया लोका ते साधन । सांगा सांगा हो म्हणतसे ।।९०।। तोचि एकसद्‌गृहस्थ पुढे होऊनी । म्हणे चिंता न करावी आपुले मनीं । तुम्ही आताची पाराजीलागुनी । जाऊनि वृत्तांत कळवावा ।।९१।। ऐसें वचन पडताचि कानीं । गृहस्थ तात्काळ निघाला तेथुनी । तो तात्काळ पाराजीलागी ते भेटून । वृत्तांत सर्वचि कथियेला ।।९२।। गृहस्थाचा तो सत्भाव देखून । पाराजी करितसे ते समाधान । म्हणे हो चिंता ती न करावी येथून । सवेचि

होईल निश्चये ।।९३।। यापरी मिळताचि आश्वासन । गृहस्थाचे आनंदले मन । तात्काळ करविले वस्त्रादि भूषण । घेऊनिया चालिला निजांगेची ।।९४।। येऊनिया पाराजीचे दुकानाप्रती । सर्वची दाखविले त त्यां निजप्रीती । देऊनिया पाराजीस म्हणे निश्चिती । उपकार न फिटेची हा कल्पांती ।।९५।। तो पाराजी म्हणे गृहस्थालागुन । येथची असावेही आता आपण । उदईक महाराजां कैसेही गाठून । आणीन येथेचि निश्चयें ।।९६।। तो अकस्मात दुसरिये दिनीं । महाराज आले ते आपण होऊनी । पाराजीस आनंद वाटलासे मनीं । बैसवी महाराजां प्रीतीने ।।९७।। धन्य म्हणे महाराज औतारी पूर्ण । मनीचा हेतु तो आजि जाणून । आले ते प्रात:काळीच आपण होऊन । भक्त कामना ती पुरवाया ।।९८।। ऐसे बोलता ते मनापासून । गहिवरले ते पाराजीचे मन । आनंदाश्रु ते नयनांतून । घळघळा ते वाहताती ।।९९।। असो तात्काळ नापिका बोलाऊन । स्मश्रुविधी तो महाराजांचा करवून । मग घालिती मंगळस्नान । वाद्य गजरेचि सर्वही ।।१००।। ज्यां ज्यां कोणा ही कळता मात । तो तो येई तेथे धावत । सत्वरिच समुदाय तो अगणित । जमलासे त्या ठायीं ।।१०१।। इतुके शांत बैसता महाराजांपाहीं । कोणी देखिले कां ते ऐकिले नाहीं । देखुनिया शांत वृत्तिते सर्वही । आश्चर्य करिताति मानसीं ।।१०२।। असो संधि ही पाहुनी । सर्वचि कार्य करिती तेथें येऊनी । मंगलस्नानसमयीं ते कोणी उटणी । महाराजां लाविती स्वानंदे ।।१०३।। किति एक सुगंधी तेलाते आपुले हातीं । महाराजांच्या अंगाते लाविती । तो उष्णोदक ते घेऊनि घालिती । निज प्रीतीच महाराजां ।।१०४।। यापरी

होतसे ते मंगलस्नान । वाद्ये ती वाजती अपार येऊन । वाद्यगजरे ते शहर गजबजून । गेले असे ते सर्वची ।।१०५।। मग स्नान विधी तो आटोपून । महाराजा लेवविती वस्त्रें भूषण । भालीं लाविती सुगंधी चंदन । एकसरेची सर्वही ।।१०६।। रेशमी धोत्र नेसविले महाराजांला । लाल अंगरखा वरी तो घातिला । पैठणी पागोटे ते शिरकमलाला । सर्व मिळोनिया घालती ।।१०७।। पायीं पुणेरी ते पादत्राण । भरजरी शाल ती अंगावरी घालून । सुवर्णमुद्रिका ती करांगुळीतून । शोभायमान दिसतसे ।।१०८।। तुळसी रूद्राक्ष माळा आणुनी । कंठी घालिती त्यां साक्षेपे करूनी । गुलाल बुक्कादि द्रव्यें उधळुनी । अंगावरी टाकिती ।।१०९।। आणिक फुलहार तैसे ते आणुनी । महाराजा घालिती प्रीती करूनी । फुले गजरे ते मनगटी बांधुनी । चौरंगी बैसविले ते महाराजां ।।११०।। मग म्हणती आतां आणावे काही तरी वाहन । त्यावरी बैसवावे महाराजांलागुन । तो किती एक म्हणती ऐसेचि धरून । मिरवावे ते महाराजां ।।१११।। नेणो म्हणती ती उडी तेथुनी । केव्ह घेतील न कळे कोठुनी । या लागी ते मिरवावे ऐसेचि धरूनी । निश्चय तो हाचि ठरवावा ।।११२।। सर्वानुमतें तो विचार करूनी । दंडातें धरिती दोही बाजूनी । यापरी ते मग शृगांर करूनी । मार्गी आणिती महाराजां ।।११३।। मार्गी आणिताची महाराजांला । अगणित समुदाय तो तेथे लोटला । श्रीफळ उदबत्यादि कापराला । सीमा नसेचि तेथीच्या ।।११४।। मग एकचि जय जयकार करून । महाराजां मिरवती शहरांतून । फुलाहार तैसे ते अगणित येऊन । महाराजांच्या गळां पडताती ।।११५।। किती एक ते पंचआरत्या घेऊन । महाराजां ओवाळती

पुढे होऊन । वाद्य गजर तो चोहोकडून । एकसरेचि होतसे ।।११६।। तेथील शोभा ती वर्णावी किती । कुंठित जहालीसे माझी मती । ऐशी ती मिरवणूक नाही म्हणती । देखिली कधीही या ठायां ।।११७।। इतुक्याही समाजांमधून । महाराज करू पहाती पलायन । परी न चले तो काही यत्न । म्हणूनी शांतचि राहती ।।११८।। असो सबंध नगरांतून । वाद्य गजरेची महाराजांलागून । मिरविलेसे ते घटीका तीन । आणुनी पुर्वस्थळा बैसविले ।।११९।। असो मिरवणूक संपताचि जाण । महाराज तात्काळ पळाले तेथून । काढूनि तैसेचि वस्त्रें भूषण । देऊनि टाकिती आणिकां ।।१२०।। पूर्ववत महाराज मोकळे होऊनी । वस्त्राविण फिरती ग्रामातुनी । स्वैर वृत्ती ती ऐशी म्हणवून । हाता न येती ते कवणाच्या ।।१२१।। सर्वचि धन्यवाद देती महाराजांस । म्हणती फेडूनि घेतले त्या नवसास । एरव्ही महाराजांतें शांत कवणास । दिसले नाही ते आजवरी ।।१२२।। आणिक जे जे कां अनुभव शेष । पुढील अध्यायी येतील सुरस । श्रोतीं परीसावे ते सावकाश । शांत चित्तेंचि सर्वही ।।१२३।। संत कथा ती अति गहन । परि वदविता तो रमारमण । वासुदेवाचिये निमित्ये चरित्र पुर्ण । करविता श्रीहरि असेची ।।१२४।।

**इ. श्री. बा. क. दशमाध्याय: । श्रीकृष्णार्पणमस्तु ।।१०।।**

**हरयेनम: ।**

॥ श्री ॥

## अध्याय ११ वा

श्री गणेशाय नमः । जयजयाजी देवकीनंदना । वसुदेवसुता कंसकंदना । गोकुळ वासिया मुरमर्दना कृष्णा विष्णो जगत्पते ॥१॥ तू असूनि या सर्वाभूतीं । मायायोगें ती सकळासी भ्रांती । पडूनिया तुज सकळचि धुंडिती । नाना रीती जगदीशा ॥२॥ अविद्यात्मक त्या कर्मानुष्टाने । तुज आकळु म्हणती मूढपणे । आणिक वेदाध्ययनादि ती साधनें । अट्टाहासेचि करिताती ॥३॥ जैसा का जन्मांध ग्रामाभीतरी भिक्षामिषे तो हिंडे घरोघरी । चिंतामणी तो लागतांची पाये दुरी । अंधत्वे लोटोनिया देतसे ॥४॥ यापरी ते सकळजन । अज्ञानडोहीं गेलेसे बुडून । वायाच उफराटे करिती यत्न । विवेक तो सांडूनी सर्वथा ॥५॥ गंध असूनिया नाभिस्थानीं । मृग तो हिंडे रानोरानीं । तैसे स्वरूपातें नेणूनि प्राणी । वायाचि भटकती अज्ञानें ॥६॥ ऐशारीती जिवाप्रती । भोगाव्या लागती जन्ममरण पंक्ति । अज्ञानीचे ते सर्वदा निश्चिती । जन्म मरण चुकेना ॥७॥ नाना शास्त्रांचे करिता अध्ययन । मर्म ते नेणूनिया वावरे मन । शब्दजाळवनीं ते जिवा भ्रमण । सैरावैरा घडेकीं ॥८॥ तरी तर्क कुतर्कादि सांडुनी । रत व्हावे ते सत्यचरणी । आणिक तैसे ते ईश्वर भजनीं । सादर असावे की सर्वदा ॥९॥ सत्यचरणी रमता जयाचे मन । त्याचे ते कुंठले येथेचि भ्रमण । चित्तशुद्धि ती न लागता क्षण । यत्नेविण होतसे ॥१०॥ चित्तशुद्ध जहालियावरी । मग तू नसेची गा श्रीहरि दुरी । परि हे न घडेचि निर्धारी । सत्याविणेची

सर्वथा ।।११।। जो का लागलासे सत्याचरणीं । मग त्या तू गवससी चक्रपाणी । सत्याविण ते आणिकां साधनीं । पडु नये सर्वथा ।।१२।। सत्य म्हणजे हरिरूप जाण । त्याविण न दिसेचि पदार्थ आन । अंतरबाह्य तो भरलासे पूर्ण । सत्यस्वरूप श्रीहरी ।।१३।। अंतरमुख जहालिया इंद्रियगण । मग तू त्या अवघाचि नारायण । आपणासी तो पहाता आपण । तुजविण त्या आन दिसेना ।।१४।। ऐशी जहालिया जयाची वृत्ति । मग त्यालागीच ते संत ऐसे म्हणती । संतलक्षण ते ऐशाचि रीती । शास्त्रादिक बोलिले ।।१५।। जेणें कां ओळखिले तुज हरि । तोचि संत जाणावा निर्धारी । सांडुनिया तू सकळ थोरी । स्वांगेची रक्षिसी त्यालागीं ।।१६।। त्याचा योगक्षेम सर्वचि जाण । अंगेचि पहासी तू धाव घेवुनी । संतकाजीं ती आवडी पूर्ण । कराया तुज ती असेची ।।१७।। संत करिती तुझेच चिंतन । तुज ते आवडे संत महिमान । दीनदयाळ पुढे येथुन । कथामृत बोलवी ।।१८।। त्रिकाळ ज्ञानी महाराज पूर्ण । कळले ऐसें ते सकळालागून । नवसादिक करिती ते आपण होऊन । निज कार्यार्थ सर्वदा ।।१९।। गताध्यायी ते हेचि वर्णन । अघटित लीला त्या केल्यासे लेखन । कथामृताचा तो कळस पूर्ण । एकादशाध्याय हा असे कीं ।।२०।। असो सिंहालोकने करून । मागील पाहावे अनुसंधान ।। महाराजांची वृत्ती समसमान । एकसरेचि वर्तती ।।२१।। वर्णाश्रमधर्मादि जे कां जाण । काहींच नेणे ते महाराजांचे मन । नेणुनी थोर यातिहीन । समान वर्तती एकसारा ।।२२।। यवनांच्याही त्या यातीतून । अनेक भजती ते महाराजांलागून । यालागी ते सचिंत मन । किती एकाचे जहालेसे ।।२३।। म्हणती शेवटी होईल

कैसी गती । ती न सांगवेचि आम्हांप्रती । अंत्यविधीलागी ते यवन निश्चिती । आड येतील किं साक्षेपे ।।२४।। परस्परामाजी तो विचार करून । म्हणती आधिच व्हावे ते सावधान । संकटा आधी उपाय योजून । सर्वांनुमतें तो ठेवावा ।।२५।। पुढे ते होऊ नयेची कांही विघ्न । म्हणुनी महाराजा दिधलेसे संन्यास ग्रहण । चतुर्थाश्रमाची ती दीक्षा देऊन । निर्भय मानसी जहालेसे ।।२६।। ये-हवी महाराजां संन्यास ग्रहण । द्यावया नसेचि कारण । परि अतरांचा तो सत्भाव जाणुनि । महाराज तैसेचि वर्तती ।।२७।। शके अठराशे एकोणिस । पौषशुद्धनवमी दिवस । दीक्षा ती दिधली महाराजांस । सर्वांनुमतेची एकदां ।।२८।। परि महाराजांचे पूर्ववत् वर्तन । ढळले नाही ते किंचित जाण । महाराजांचे ते स्वच्छंदि मन । ब्रम्हानंदी मुरलेसे ।।२९।। प्रारब्धेची ही देहप्राप्ती । तैसीच सुखदु:खे ती प्राप्त होती । तेथे उणे अधिक करावया निश्चिती । अधिकार नसेचि हा कवणासी ।।३०।। हे जाणुनी संत भक्त । सदासर्वदा असती विरक्त । सुख दु:खाचा तो आनंद किं खंत । नेणूनी वर्तती सर्वदा ।।३१।। काम्यकर्म करिता ते प्रीती । इच्छे परी होय ती तया प्राप्ती । ये विषयी तो कथा भाग निश्चिती । सांगेन तुम्हासी परियेसा ।।३२।। परि शास्त्रवचनीं विश्वास पूर्ण । असावा कीं तो मनापासुनी । मग काळांतरे ही ती इच्छा जाण । पूर्ण होय निश्चयें ।।३३।। विश्वासेचि करिता कर्म सतत । काळांतरेचि जहालासे फल प्राप्त । परिसावा तो सकळ वृत्तांत । अनुभवसिद्ध जो का असे की ।।३४।। धाराशिव जिल्हा दक्षिणप्रांती । बेंबळी ग्राम हे त्यांमाजी निश्चिती । तेथे सुंदरराव नामें तो कर्मठ अति । श्रद्धाळू

सात्विक वसतसे ।।३५।। राधाबाई नामे ती कांता सुंदर । सुंदराशी लाधलीसे सेवातत्पर । पतिव्रता धर्म तो लक्षुनी साचार । साध्वी वर्तत स्वानंदे ।।३६।। नित्य नैमितिक आचार विचार । कर्मानुष्ठानीं तो भाव निरंतर । समयोचितचि तो अतिथी सत्कार । उभयता करिती निजप्रीती ।।३७।। नित्य हरिकथा पुराण श्रवण । सुंदरासी आवड ते मनापासून । हरिविजयग्रंथाचे ते अंगेची पठण । अखंड करी जो सर्वथा ।।३८।। गताध्यायीचा तो आठव मनीं । श्रोतीं आणावा तो साक्षेंपें करूनी । किं ग्रंथारंभ हा तो करावया लागुनी । कारण जो कां जहालसे ।।३९।। सुंदररावाचे ते संचित म्हणुनी । पुत्र ऐसा हा लाधलासे जाण । संसारी राहूनी विरक्त पूर्ण । अंबुज जीवनीं जैसे कां ।।४०।। बापुराव नामे हा सद्गुणखाणी । योगसाधनीं जो मुगुटमणी । संतभक्तांचिया त्या ठिकाणीं । आवडी सर्वदा असेचि ज्यां ।।४१।। अस्तेय व्रताचे संसारी पालन । नित्य करूनिया ते मनापासुन । तैसेचि ते सर्वदा कथा कीर्तन । आवडी श्रवण करितसे ।।४२।। पुत्र ऐसा हा देखुनि सद्गुणी । मातापितया तो आनंद मनीं । होऊनि वर्तती सदा सदवर्तनीं । निजप्रीती ते आपुल्या ।।४३।। पतिपत्नीचे ज्याठायी एक चित्त । त्या ठायीं वसे लक्ष्मीकांत । इच्छेपरी ते मनोरथ । न सांगता पुरवित सर्वदा ।।४४।। उचित काळी ते पुत्रालागुनी । पूर्वपुण्यचि लाभलेचि गृहस्वामिनी । मातापितयाते ती स्नुषा देखुनी । अत्यानंद जहालासे ।।४५।। पार्वतीबाई ऐसे नामाभिधान । सासूश्वशुर ते ठेविती प्रीतीकरून । जी नित्य पतिसेवापरायण । प्रपंची असे सर्वदा ।।४६।। संसार म्हणजे दु:ख सागर । संकटे येती ती वारंवार । परि सुंदराचे ते चित्त

निरंतर । हरिस्मरणी असे की ।।४७।। प्रसंग कैसाही तो आलिया पाही । हरि विजयाचा तो पाठ चुकला नाही । वीसवर्षाचा तो काळ सर्वही । अखंड यापरी गेलासे ।।४८।। कलियुगामाजी ते हरिस्मरण । साधनामाजी ते श्रेष्ठ साधन । हरिप्राप्ती ती सकळांलागुन । सहजा सहजी होतसे ।।४९।। ऐसाचि सुंदराचा तो प्रपंच जाण । परमार्थरूप जहालासे पूर्ण । पोटी पुत्र दैदिप्यमान । अनुकूल जाया ती सर्वदा ।।५०।। हरिविजय ग्रंथाचे ते पठण । वीस वर्षे ती जहालीसे पूर्ण । तेथे शुद्ध जहालिया ते अंत:करण । नवल नोहेची सर्वथा ।।५१।। शुद्ध सत्वांश तो श्रीहरि । नित्य वसे त्यां शुद्धांतरी । ऐशियांचे ते कार्य निर्धारी । सहज रीत्याचि होतसे ।।५२।। पुढे पुत्रापोटी ते पुत्र संतान । इच्छितसे सुंदराचे मन । सत्भक्ताचा तो मनोरथ पूर्ण । कराया तिष्ठत श्रीहरी ।।५३।। हरिकृपे तो सुयोग ऐसा साधिला । श्रावण मास कृष्णाष्टमी त्या जन्मवेळां । पुत्रापोटी तो सुपुत्र जहाला । वाटे श्रीकृष्णाचि अवतरला ।।५४।। नातवाचा तो जन्मकाळ पाहुनी । आजोबांचे ते सुखावले अंत:करण । धन्य हरिविजय पाठाचे तें फळ पूर्ण । म्हणूनि आजि आम्हां लाभले ।।५५।। कृष्णाजन्माची ती वेळा म्हणून । कृष्ण त्यां ठेविलेचि नामाभिधान । आनंदले ते सकळांचे मन । सुयोग ऐसा हा देखुनी ।।५६।। असो किती एक ते असती उदास मनीं । म्हणती व्यर्थ जन्म आमुचा संसार करूनी । संसारयोगेची त्यां परमार्थ मुकोनी । गेलोसे आम्ही सर्वथा ।।५७।। ऐशिया जनीं ते अवश्य करोनी । घेतले असेचि निजप्रती ।।५९।। लेखके सर्वचि प्रत्यक्ष पाहुनी । बेंबळकरांचे चरित्र हे केले लेखन । श्रोती दोष तो न ठेवावा जाणुन ।

किं वदविता एक श्रीहरि ।।६०।। असो मूळ विषयाचे ते अनुसंधान । महाराजां दिधले संन्यास ग्रहण । परि महाराजांचे ते मन । आश्रमादि काही नेणेची ।।६१।। पुढे एक संवत्सर ही न लोटता । शरीर यष्टी ती क्षीण जहीलीसे तत्वता । महाराजांचे भ्रमण ते येथुनी पुढतां । खुंटले सहजची या रीती ।।६२।। महाराजांचा तो सत्भक्त साचार । मार्तंड रामाजी नामे सुवर्णकार । गुलमंडी समीपची तो निरंतर । राहे आपुल्या निजगृहीं ।।६३।। आश्विन वद्य द्वितीयेस । ज्वर भरलाचे महाराजांस । म्हणती प्रारब्ध न चुके ते कवणास । मग विचार कासया पाहिजे ।।६४।। त्याच दिनी ते मार्तंडाचे गृहांस । राहिले ते येवुनी पूर्ण दिवस । तेथेचि बसुनिया ते निजभक्तास । सांगती निजगुज प्रीतीनें ।।६५।। म्हणती उदयीक अकरावाजेतो पर्यंत । तुम्हा समस्तांसवे ती देऊनी साथ । उपरी ती महायात्रा निश्चित । करणे असे हो मजलागीं ।।६६।। ऐसे वचन ते पडता श्रवणीं । मार्तंडादि ते रडती धाय मोकलुनी । महाराज ते तयांचे समाधान करूनी । बोल बोलती निजप्रीती ।।६७।। म्हणती का बैसला हो वायाची रडत । दिवस पूर्ण मी तुम्हास सोबत । असूनिया मग तो हा शोक व्यर्थ । करू नयेची सर्वथा ।।६८।। आणिक म्हणती ज्या देहानें आजवरी । तुम्हासी ते कष्ट दिधले येथवरी । तुम्ही क्षमा करा वा न करा परि । मी तो त्या सांडुनी जाईन ।।६९।। ऐसे सरळरीत्या भाषण । कधी कोणी नाही ते केले म्हणुन । वायुवेगे हे सगळे वर्तमान । श्रुत जहालेसे समस्तां ।।७०।। अल्पची काळ लोटता ऐशा रीती । लोक समुदाय तो जमला अति । कि मार्तडाचिये त्या गृहा प्रती । मार्ग न मिळेची जावया ।।७१।। तो

दिनमणी अस्तासि गेला । ठायीं ठायीं तो भजन मेळा । ठाकुनिया गाती या हरिलीलेला । एकसरेची सर्वही ।।७२।। टाळ मृदंगाचा तो गजर । ज्या योगे दुमदुमले सर्व नगर । चौघडे तैसे ते वाजंत्री अपार । येउनिया वाजती ।।७३।। निशिमाजीं तो चार प्रहर । होतसे एकची नाम गजर । इकडे उदया आलासे भास्कर । नित्य नेमेची आपुल्या ।।७४।। प्रात:काळ होताची महाराजांजवळी । असंख्यात जमलीसे भक्त मंडळी । शोकाकुल होताति हृदयकमळीं । प्रकार ऐसा हा देखुनी ।।७५।। आश्विन वद्य तृतीयेचा दिवस । दुख:प्रद वाटलासे सकळांस । कामकाज ते सांडुनी महाराजांस । पहावयालागीं ते धावती ।।७६।। कितीएक ते पूजासाहित्य घेऊन । धाव घेती ते मार्गावरून । तो किती एक म्हणती कैसेही करून । व्हावे दर्शन आताची ।।७७।। समुदायामाजी ते थोर सान । चौवर्णांचे ते असती सकळ जन । केवळ दर्शनालागी ते ठाकती येवुन । विसरूनिया निजकार्या ते आपुल्या ।।७८।। असो अकराचा तो समय जाहला । महाराज म्हणती त्या समुदायाला । हरिनामचि ते आता येथुनी बोला । नारायण नारायण ऐसेचि ।।७९।। यापरी समस्तासी बोलून । मागुता म्हणती नारायण । तिसऱ्या हया नारायणीं महाराज लीन । होऊनिया शांतचि जहाले ।।८०।। यापरी शके अठराशे वीस । आश्विन वद्य तृतियेचा तो दिवस । महाराजांचा आत्मा तो हरिस्वरूपास । जाऊनिया शांत जहालासे ।।८१।। लवण जळी ते घालिता । अभिन्नपण जैसे कां तत्वता । तैसी ते ज्योतीमाजी ज्योत मिळता । आन न राहे ची किंचित ।।८२।। महाराज शांत जहालेसे पाहुनी । एकची आकांत जहालासे सर्व जनीं ।

कितीएक ते अंग टाकुनीधरणीं । आक्रोश करिती सारिखा ।।८३।। तो कोणी महाराजांचे गळां पडूनी । हंबरडा फोडिती दीनवाणी । आजि तो प्राणचि आमुचा गेला म्हणुनी । वक्षस्थळ बडविती धबाधबा ।।८४।। महाराज शांत जहाल्याचे ते वृत्त । नगरामाजी ही पसरलीसे मात । वार्ता ती ऐकुनी लोक समस्त । शोक सागरी ते बुडालेसे ।।८५।। काम धंदा तो सोडुनी सर्व । महाराजांकडे ते घेती धाव । परि अफाट समुदायीं तो वाव । न मिळेची जावया ।।८६।। व्यवहारी ते दुकानें बंद करूनी । आले सर्वची दर्शनालागुनी । चाकर वर्ग तितका तो रजा घेऊनी । तिष्ठत तेथेचि दर्शना ।।८७।। मिरवणूक ती काढावी म्हणून । सर्वची झटती ते आपण होऊन । पुष्पविमान तेव्हा ते तयार करून । आणिलेसे त्या ठाया ।।८८।। केळीचे स्तंभ ते त्यावरी लावूनी । पुष्पमाळा त्या बांधिल्यासे चोहोकडोनी । तो लष्करी पुरभय्ये ते सर्वचि जमुनी । आलेसे ते त्या ठाया ।।८९।। शिरी वस्त्रें ती गुंडाळुन । गुलाल तैसा तो भाळी लाऊन । श्री बाळकृष्ण नामाचा घोष करून । सज्ज जहालेसे ते मिरवाया ।।९०।। त्यां ही मार्तंड सदनीं तो प्रवेश केला । सर्वचि पार्थिव देह तो उचलला । आणुनी तात्काळ विमानीं बैसविला । तो आकांत एकची जहाला ।।९१।। महाराज महाराज सर्वची ओरडती । वक्षस्थळे ती धबाधबा पिटती । किती एक ते बेशुद्ध पडती । मार्गावरी ते तेथेची ।।९२।। ऐसा एकची हाहा:कार जहाला । कोणी न पुसती कोणाला । इकडे बनेमिया ते अंधेरा जाहला । म्हणुनी ठायीच ओरडती ।।९३।। असो मिरवणूक ती ऐशा रीती । निघतां ते वाजंत्री अपार वाजती । बॅन्ड तुतारे

ताशादि ती गणती । न करवेची सर्वथा ।।९४।। मिरवणूक काढिता रस्तो रस्ती । सडे संमार्जन जे लोक करिती । रांगोळ्या गुलालादि ते वरी घालिती । अत्यादरेचि सर्वही ।।९५।। सुपारी हनुमान मंदिरापासोनी । तो मछीखडक मार्गे चौकातून । मिरवणूक निघताचि ते चोहोकडून । पुष्पवृष्टी होतसे ।।९६।। किती एक मौल्यवान वस्त्रेची आणून । महाराजालागीं ते करिती अर्पण । अनेक ते करिती महाराजांचे पूजन । अत्यादरेचि येऊनी ।।९७।। ठायी ठायीं स्त्रिया त्या पंचारती । आणुनिया महाराजां ओवाळती । फुलहारांची ती नसेचि गणती । हिशेब लाविताही कळेना ।।९८।। उदबत्यांचा घमघमाट अति । चोहोकडे तैसा तो कापुर जाळिती । अगणित श्रीफळें ती मार्गी फुटती । मित न करवेचि सर्वथा ।।९९।। तैशाच रीती मिठाया आणुन । मार्गी उधळती महाराजांवरून । चौल्या पावल्यांचा तो पर्जन्य पूर्ण । एकसरेचि होतसे ।।१००।। खोबरे खारीक बदामादि वस्तू । महराजांवरूनी उधळती समस्त । गुलाल बुक्का अगरजादि पदार्थ । तैसेचि उधळती स्वानंदे ।।१०१।। दु:खप्रदर्शित करूनिया यवन । पुढे चालती उदास होऊन । शोकभरेचि ते मर्शीया गीत गाऊन । शांत चित्तेचि चालती ।।१०२।। पुढे मिरवणूक ती सराफ्यातुनी । शहागंज मार्गेची मिरविती झणीं । राजाबाजारी ती येताचि दिनमणी । अस्ताचलासी तो गेलासे ।।१०३।। तो पेटऊनिया मशाली अगणित । अंधकार घालविलासे समस्त । पुढे मिरवणूक ती किराणचावडी पर्यंत । येऊनिया शांतचि चालली ।।१०४।। पानदरीब्यामाजीं ती मिरवणूक । येतेचि हवया नळे ती सकळिक । उडवू लागले ते तेथे अनेक । स्वेच्छेनेची आपुल्या ।।१०५।।

येथूनी मिरवणूक ही निघाली । तो सुपारी हनुमान मंदिरा आली । हवया नळ्याची ती गर्दी जहाली । एकसरेचि सर्वही ।।१०६।। असो मिरवणूक ती औरंगपुऱ्यातुन । नागेश्वरा समीप ती ठेपलीसे येवून । तो साडेदहा वाजण्याचा समयपूर्ण । जहाला असेचि त्या ठायां ।।१०७।। त्याठायी वक्षस्थलापर्यंत जाण । उकरिताचि लागले वाळुमय जीवन । कीं गंगा ती प्रत्यक्ष महाराजांकारण । आली वाटलेसे सकळांची ।।१०८।। असो समाधीकार्य ते संपताची जाण । सर्वोपर पूजा ती करिती समर्पण । मागुता शेवटचे ते दर्शन । सर्वचि घेती एकदां ।।१०९।। समाधी ती देती महाराजाप्रती । आठव झालीसे ती लोकांप्रती । ह्रदयविदारक ते हुदंके येती । शोक तो नावरेची सर्वथा ।।११०।। या रीती समाधीचे ते कार्य उरकुनी । स्वगृहा जाया निघाले सर्व तेथुनी । अश्रु वहातााती ते नयनातुनीं । येरयेराशीं ते बोलवेना ।।१११।। असो पश्चातही महाराजभक्त पुढे जहालेसे अगणित । जैसे त्यां घडे ती सेवा सतत । येऊनिया साक्षेपे करितााती ।।११२।। श्रोती ऐकावे ते सावधान । यासी असे ते एकची कारण । पश्चातही अनेकालागुन । अनेकानुभव आलेसे ।।११३।। पुण्यतिथीलागीं ते सकळजन । प्रति वर्षी ते झटती आपण होऊन । साहित्यादि ते सर्वचि आणून । किती एक देताति साक्षेपें ।।११४।। पुण्यतिथी उत्सव हा समीप येता । कारभारी तो सुचवी समस्तां । मग जैसे कां घडे ज्यां तो न सांगता । आणुनिया स्वच्छेचि देतसे ।।११५।। मग कितीही काळ येता कठिण । होणारे ते होतसे अन्नदान । तेथें उणे पडो न देतो नारायण । अनुभव येथिचा असे हा ।।११६।। अंनत रूपे ती धरूनिया निर्धारी

। भक्ताचिया गृहीं तो कामें करी । उणे पडताचि ते बरोबरी । करी निजांगेची सर्वदा ।।११७।। एकदा पुण्यतिथीनिमित्त । अनेक जमले ते महाराजभक्त । सेवा ती करिती न सांगता सतत श्रद्धा ती ठेऊनि अंतरी ।।११८।। त्या माजी एक श्रद्धाळु ब्राम्हण । नारायणराव नामे जो श्रीमंत पूर्ण । उमरावजी जयाचे वस्तीस्थान । उत्सवा निमित्तेची जो आलासे ।।११९।। श्रीमंत असूनिया हा द्विजवर । सेवेलागीं तो सदा तत्पर । अंतरी सत्भाव तो निरंतर । असे जयाच्या सर्वदा ।।१२०।। असो पुण्यतिथीचा तो दिवस येता । साहित्यादि मेळामेळ सर्व पाहतां । म्हणती सर्व आहे परि तेलचि तत्वता । यत्न करीताही मिळेना ।।१२१।। कांही ते अट्टाहासेचि बोलती । दत्तात्रयबूवाते सांगु म्हणती । तोचि एक बाई येऊनी पुढती । काय बोलता समस्तां ।।१२२।। म्हणे तेलाची ही घागर । भरूनि पाठवलेसे मज सत्वर । उतरोनी घ्यावी हो साचार । जाणे असेची मजलागी ।।१२३।। तो नारायण पुढे होऊन । बाईस म्हणती ही आणली कोठून । कोणी पाठवली मोल किती ते म्हणून । सविस्तर कळोद्या आम्हासी ।।१२४।। ऐसे ऐकताची ते वचन । बाईने उत्तर दिधलेसे जाण । म्हणे मी तो असे एक मोलकरीण । अन्य काहीच नेणे मी ।।१२५।। बुवांची ती आज्ञा जहाली । म्हणुनिया मी ही घागर आणिली । माझी मजुरी ती मज मिळाली । वृत्त तुम्हां हे कळोद्या ।।१२६।। यापरी देऊनिया प्रत्युत्तर । बाई ती गेलीसे सत्वर । इकडे गृहामाजी ते परस्पर । येर येराते बोलती ।।१२७।। म्हणती दत्तबुवा बाजारी जाऊन । पाठवले दिसते हे तेल घेऊन । तोचि बुवा ते येता दुरून । देखिले कीं सकळकी ।।१२८।। बुवा येताची

गृहाभीतरी । म्हणती अहो तेलाची ती घागरी । पाठविली तुम्ही जी देऊनि मजुरी । येवुनिया आताच पोहचली ।।१२९।। परिसुनी ऐसा हा वृत्तांत । बुवांचे मन ते जहालेसे चकित । म्हणे मी घागरी की तेल किंचित । पाठविले नसेचि सर्वथा ।।१३०।। कोठील बाई ही कोण म्हणुन । अट्टाहासे शोधिती तिजलागुन । परी नाना रीती करिता प्रयत्न । शोध सर्वथा लागेना ।।१३१।। पाहुनिया प्रकार तो ऐशा रीती । आश्चर्यचकितची जहाले ते सकल चित्तीं । संत महिमा तो नेणवेची म्हणती । अज्ञानेचि आम्हा सर्वथा ।।१३२।। दत्तात्रयबुवा हे सकळाशी परिचित । मागेचि जहालेसे तुम्हाशीं श्रुत । किं प्रत्यक्ष महाराजांचे हे वंशस्थ । कारभार तो पहाती येथिचा ।।१३३।। बुवा हे असती श्रद्धाळू अति । पेठेमाजी चालिले ते त्वरित गती । समस्तांलागी ते साक्षेपे पुसती । सांगुनिया वृत्तांत सर्वही ।।१३४।। तो सर्वची कर्णी ठेऊन हात । प्रत्युत्तर ते बुवाशी देती समस्त । नेणो म्हणती हा प्रकार किंचित । घडला कैसा तो कळेना ।।१३५।। मग त्याच पाऊली घरी येऊन । बुवा ते सांगती सकळांलागून । वृत्तांत सांगता ते नयनांतून । अश्रु वहाती घळाघळा ।।१३६।। तो नारायणराव पुढे होऊन । बुवांचे करीतसे कीं शांतवन । धन्य धन्य म्हणती हा जगज्जीवन । भक्तांकित जहालासे ।।१३७।। छायाचित्रा परी ती पाषाण मूर्ती । नारायणराव ते महाराजांची करविती । खर्च जितुकां तो जहालेसे होऊनी देती । न सांगताची आणिकां ।।१३८।। मूर्ती ती संस्थानी देऊन । पादुकाठायीं ती केलीसे स्थापना । श्रोती विलोकावे ते साक्षेपे जाऊन । असत्य नोहेचि सर्वथा ।।१३९।। सकळांची ती श्रद्धा ऐशिया रीती । पश्चात

ही जडली ती महाराजांवरती । जैसे कां ज्या घडे तो तैशा रीती । साह्य करीत सर्वदा ।।१४०।। त्यामाजी अल्पची परि रसभरित । एका सत्भक्ताचा तो वृत्तांत । जेणे का प्रपंच करूनि परमार्थ । मार्ग सहजची साधिला ।।१४१।। साष्ट पिंपळगांव गोदातीरी जाण । शनैश्वराचे जेथे जवळीच स्थान । असुनिया येथेचि पुण्य पावन । श्रीमंत घराणे जहालेसे ।।१४२।। जमिनदार घराणे अति विख्यात । ज्यालागी ते जाणती लोक समस्त । चुन्नीलाल नामे जो सद्‌गृहस्थ । जन्माआलासे प्रारब्धे ।।१४३।। जैन धर्माचा जो अनुयायी असून । सर्व धर्मासि वृत्ती समसमान । ठेऊनि नित्य जो ब्राम्हण भोजन । घालीत स्वानंदे सर्वदा ।।१४४।। पूर्वसुकृते जया कामिनी । लाधली असे ती सद्‌गुणखाणी । सदा नम्र जी का पतिचरणी । सत्कर्मी रत सर्वदा ।।१४५।। गंगुबाई ते नामाभिधान । सार्थ शोभे ते बाईलागून । गंगेचे जैसे का निर्मळ जीवन । मन ते बाईचे तैसेचि ।।१४६।। शुचिर्भूत जेथे ऐसे पितामाता । या परी ती पतिव्रता । मग सदाचारी अपत्यें उदरी येता । नवल ते किंचित नसेचि ।।१४७।। श्रोती ऐकावे सावधान । द्वितीय पुत्र तो जहालासे दैदिप्यमान । गौरवर्ण तेज:पुंज पूर्ण । उदरी आलासे सहजची ।।१४८।। सुपुत्र देखुनी ऐसा नयनी । उभयतांचा आनंद न समायें मनीं । कचरदास ऐसे नाम ठेऊनी । सोहळा अपूर्व केलासे ।।१४९।। पितया ऐसे ते ठेऊनी वर्तन । नित्य हव्यकव्यादि संतर्पण । करूनिया सत्कर्मे ती वेचित धन । सन्मान सर्वत्र होतसे ।।१५०।। पुढे ते सेठ कचरदास म्हणुनी । नाम जहालेसे प्रसिद्ध जनीं । भूतमात्रीं ती दया ठेऊनी । स्वानंदेचि वर्तत ।।१५१।। पूर्वकर्मेचि लाधली कांता मैनादेवी ती पतिव्रता ।

प्रपंची ठेऊनिया ती दक्षता । अद्वैतपणेचि वर्तत ।।१५२।। प्रपंच करिता जी सर्वदा जाण । मानी पतिवचनाते प्रमाण । पति आज्ञेविण ते आणिक साधन । नेणेंची सर्वथा मानसीं ।।१५३।। प्रसंगेचि पुढे औरंगाबादी जाण । सुशील कुटुंब हे राहिले येऊन । समागम तो यारीती होऊन । महाराजांवरी श्रद्धा जडलीसे ।।।१५४।। सत्कर्मी लोटता यापरी काळ । लाधले महाराजांच्या त्या कृपेचे फळ । पहिला पुत्र तो रमणलाल । संतकृपेचि जहालासे ।।१५५।। द्वितीय पुत्र त्या सुरेशचंद्राला । पाहुनी आनंद तो सकळाशी जाहला । प्रकाशचंद्र हा शेठजीस आगळा । तृतीय पुत्र तो जहालेसे ।।१५६।। तैसीच प्रथम कन्या ती हेमलता । पाहुनी शोभा ती द्वितीय तत्वता । प्रभा ती देखुनी तृतीय चित्तां । आनंद जहालासे उभयतां ।।१५७।। पुढे अनुक्रमेचि विद्या उषा जाण । जाहल्या असे त्या कन्या दोन । कन्या सुपुत्र ऐसे देखून । आनंदा पार नसेची ।।१५८।। यथासमयी पुत्रविवाह करून । स्नुषा ती आणिली गृहलक्ष्मी पूर्ण । शांत सुस्वभावी कुलभूषण । सौभाग्यशाली सर्वदा ।।१५९।। शांताबाई ते नामाभिधान । सार्थ शोभे तिज लागून । ईशकृपा ती होताचि जाण । प्रथम पुत्र तो जहालासे ।।१६०।। शरदचंद्र त्या नामाभिधान । दुसरा तो दिलीप नामे कुलभुषण । तैसी तिसरी ती कन्या रत्न । दुर्गा नामे जहालीसे ।।१६१।। शेठजीचे ते शुद्धाचरण । म्हणुनिया संतती संपत्ती सुख पूर्ण । लाधले सर्वची संतकृपा म्हणून । कारण त्या अन्य नसेचि ।।१६२।। अद्वैतपणे ते धर्मदान । शेटजीस घडे ते रात्रंदिन । ज्यायोगे दानवीर धर्मवीर म्हणून । सर्वत्र ख्याती जहालीसे ।।१६३।। असो सविस्तर

करिता दानाचे वर्णन । व्यर्थचि वाढेल चरित्र लेखन । सत्कार्यी कोठेही पडता उणे ते होऊन । दान देती त्या साक्षेपे ।।१६४।। समाधीपुढे तो सभामंडप पूर्ण । शेटजीने दिधलासे बांधुन । ऐशापरी संस्थानी जें जें का म्हणून । लागे ते ते पुरविती स्वानंदे ।।१६५।। असो बाकलीवाल घराणे पुण्यशील । म्हणूनिया संतकृपेचि लाधले फळ । मग इहपर सुख मिळता नवल । त्यांमाजी किंचित नसेचि ।।१६६।। असो मूळ गद्याचे चार भाग पूर्ण । तेचि पद्यामाजी केलेसे निरूपण । श्रीहरिकृपे ते कथामृत लेखन । संपविलेची सत्भावें ।।१६७।। आणिक अनुभव तितुके ते सकळ । संस्थान चालकांचे तैसेचि बोल । सत्यकथा त्या तितुक्याची केवळ । कथामृतीं लिहिल्यासे ।।१६८।। मागे नवरत्नाचे करूनिया पठण । अनेक अभिप्राय ते मजलागून अनेकी पाठविले ते आपण होऊन । इच्छेनुसार ।।१६९।। तितुकेही साग्र ते निवेदन । करावया ते येथे नसेची कारण । परि नवरत्नी जै कां भासले अपूर्ण । पूर्णता या ठायी ती केलीसे ।।१७०।। दामूअण्णा नामें तो सत्पात्र ब्राम्हण । नित्य नैमित्तिक कर्ममार्गी निपुण । शाक्त उपासकामाजीं जो पूर्ण । मुगूटमणी हा वाटेची ।।१७१।। बीड जिल्ह्याचिये माझारीं । वस्तीस्थान जयाचे ते खालापुरी । ती अपूर्णता पुरी । करावया मजलागी बोधिले ।।१७२।। कीं प्रत्येक अध्यायाचा मतितार्थ । ग्रंथा शेवटी तो यावा यथार्थ । अण्णाच्या हा मनीचा भावार्थ । बिंबला अंतरी माझिया ।।१७३।। तीच आज्ञा शिरी वंदून । कथामृतासि ते करीन पूर्ण । कर्ता करविता तो नारायण । निश्चय मानसी हा असो द्या ।।१७४।। आता तुम्ही श्रोते सावधान । ऐकावे अनुक्रमेची ते विवरण । संक्षेपे रीत्याचि परि

ते सार पूर्ण । पृथक पृथकची ते केलेसे ।।१७५।। प्रथमध्यायी ते निरूपण । आधी वंदिलेसे गौरीनंदन । मागुता सरस्वतीते प्रार्थून । कुलदैवताप्रती नमियेले ।।१७६।। तैसेचि गुरू माता पिता । यांचे चरणी ठेऊनि माथा । आणिक तैसे ते ऋषिगण संता । आठविलेसे मानसीं ।।१७७।। उपरी नाटुभट्टजीचा विस्तार । ग्राम गोत्रादि वृत्ती सविस्तर । सांगुनिया सर्वची परिवार । प्रथमाध्याय संपविला ।।१७८।। चरित्र नायकाचे ते जन्म कथन । बाललीला आणि मौजी बंधन । करूनिया गुरूगृही ते वेदाध्ययन । मागुता स्वगृहा त्यां आणिले ।।१७९।। बाळकृष्णाचे स्वंच्छंदी वर्तन । नित्य नेम पूजादि देवदर्शन । यापरी सविस्तर ते वर्णन । द्वितीयध्यायी केलेसे ।।१८०।। गंडांतरे निरसावयालागून । करविले बाळकृष्णासि ते पुरश्चरण । पुरश्चरणें ती होताचि तो बाळकृष्ण । तीर्थाटन निमित्तेचि गेला निघून । तृतीयाध्यायी कथन हेचि पै ।।१८१।। पुढे काशी प्रयागादि तीर्थे करून । भाग्यनगरां ते राहीलासे येऊन । वृत्तऐकताचि तो पिता जाऊन । मागुतां आणिले त्या स्वगृहा ।।१८२।। तोचि एक महापुरूष येऊन । बाळकृष्णालागीं ते भेटुन । भेट होतां तो बाळकृष्ण निघून । गेलासे तो तेथूनी ।।१८३।। पिशाच्च वृत्ती ती ठेऊन । औरंगाबादीच राहिलासे तो बाळकृष्ण इकडे माता निजधामा गेलीसे निघून । चतुर्थाध्यायी कथन हे केलेसे ।।१८४।। पंचमाध्यायी बाळकृष्णास । कारागृही तो जहालासे वास । सुटका ती दाविता चमत्कारास । जहाली असे येथेचि ।।१८५।। महाराजांची ती स्वैरवृत्ती । सहज कोणा काही बोलती । तैसी ती अनेका प्रचीती । षष्टमाध्यायी आलीसे ।।१८६।। सात आठ

नऊ दहापर्यंत । चमत्कार ते महाराजांचे समस्त । अनुभवा येऊनिया ते अनेक भक्त । महाराजांलागी जहालेसे ।।१८७।। प्रचंड मिरवणूक ती नगरांत । काढिली ती येथेचि नवसानिमित्त । ऐसा हा सरस वृत्तांत दशमाध्यायीच कथियेला ।।१८८।। कथामृताचा तो पूर्ण कळस । एकादशध्याय असे हा सुरस । समाधीवर्णन त्या समारोपात । करूनिया लेखना सारिले ।।१८९।। संतचरित्र ते अति गहन । परि त्याचा तो वदविता रूक्मिणीरमण । माझिया निमित्तेची कथामृत पूर्ण । बोललासे तो श्रीहरि ।।१९०।। ग्रंथ वदविता तो नारायण । म्हणुनिया अवश्य करावे ते पठण । वासुदेव प्रार्थी हा कर जोडून । दासानुदास तुमचा ।।१९१।।

**इ. श्री. बा. क. एकादशोध्यायः । श्रीकृष्णार्पणमस्तु ।।११।।**

**हरयेनमः ।।। श्री ।।**